# अश्लीलता

## एक परिसंवाद



MR
176.8
K 149 A

MR
176.8
K149A

साहित्य संघ प्रकाशन • मुंबई ४.

# अश्लीलता

## ( एक परिसंवाद )


डॉ. इरावती कर्वे

ॲ. सुशील कवळेकर

प्रा. गंगाधर गाडगीळ

प्रा. वा. ल. कुळकर्णी

प्रा. ग. प्र. प्रधान

बॅ. विठ्ठल नरहर गाडगीळ



**मुंबई मराठी साहित्य संघ प्रकाशन**

डॉ. भालेराव मार्ग, मुंबई—४

प्रथमावृत्ती
६ एप्रिल १९६४

1964
Library IIAS, Shimla
MR 176.8 K 149 A
00055397
MR
176.8
K149A
55397
11.11.76

संपादक
वा. रा. ढवळे

मुद्रक
लक्ष्मीबाई नारायण चौधरी
निर्णयसागर प्रेस
डॉ. वेलकर स्ट्रीट
मुंबई-२

मुखपृष्ठ
श्री. बाळ ठाकूर

मूल्य
दोन रुपये

प्रकाशक
श्री. बापूराव नाईक
संयुक्त कार्यवाह
मुंबई मराठी साहित्य संघ
डॉ. भालेराव मार्ग
मुंबई-४

# संपादकीय निवेदन

जवळ जवळ दोन वर्षांपूर्वी म्हणजे दि. ९ व १० एप्रिल १९६२ रोजी साहित्यसंघाच्या वतीने 'अश्लीलता' या विषयावर एक परिसंवाद घेण्यात आला होता. तत्पूर्वी डॉ० इरावती कर्वे, अॅड्व्होकेट सुशील कवळेकर व प्रा० गंगाधर गाडगीळ यांना अनुक्रमे समाजशास्त्र, कायदा, वाङ्मय व कला यांच्या दृष्टिकोनातून अश्लीलतेच्या स्वरूपासंबंधी आपले विचार प्रबंधरूपाने लिहून पाठविण्याची विनंती करण्यात आली होती. त्यांच्या त्या प्रबंधांच्या संदर्भानेच अश्लीलतेचा सर्वांगीण विचार करण्यासाठी उपरिनिर्दिष्ट परिसंवाद घेण्यात आला होता. हा परिसंवाद प्रा. वि. ह. कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेने झाला व त्या परिसंवादात अॅ. सुशील कवळेकर व प्रा० गंगाधर गाडगीळ यांच्या बरोबरच प्रा० वा. ल. कुलकर्णी, प्रा० ग. प्र. प्रधान व बॅ. विठ्ठल नरहर गाडगीळ यांनी भाग घेतला होता.

इरावती कर्वे, कवळेकर व गाडगीळ यांचे प्रबंध व त्यांच्या संदर्भात जो परिसंवाद आयोजित करण्यात आला त्यात प्रकट झालेले विचार मिळून ही पुस्तिका आज प्रसिद्ध होत आहे. याच पुस्तिकेत 'वाङ्मय आणि अश्लीलता : एक तात्त्विक विचार' हा प्रा० वा. ल. कुळकर्णी यांचा स्वतंत्र लेखही समाविष्ट करण्यात आला आहे. आज साहित्यसंमेलनातून व इतरही अनेक व्याख्यानातून अश्लीलतेसंबंधी विचार चालू आहे व अश्लीलतेला आळा घालण्यासाठी कोणते उपाय योजावे यासंबंधी विविध पातळीवर प्रयत्न चालू आहेत. कायद्यामध्येही कांही सुधारणा

घडवून आणाव्या किंवा कसे याचाही विचार होत आहे. अशा वेळीं अश्लीलतेसंबंधी विचारवंतांकडून सर्वांगीण चर्चा होऊन मराठी वाचकांच्या विचाराला चालना मिळणे अत्यंत आवश्यक आहे. या दृष्टीनेच प्रस्तुत प्रकाशनाचे महत्त्व आहे.

कोणत्याही प्रश्नांच्या बाजूने अगर विरुद्ध युयुत्सु आघाडी उभारणे हे साहित्य संस्थांचे कार्य असू नये. वाचकांच्या वाचनाला खाद्य पुरवून त्यांच्या विचारांना चालना देणे एवढ्या पुरतेच त्यांचे कार्य मर्यादित असावे. कारण अनेक विचारांचे, मतांचे, पंथांचे लोक साहित्य संस्थांचे सभासद असतात. त्यामुळे एकाच विचाराचा अगर मताचा पाठपुरावा करीत न बसता एखाद्या वाङ्मयीन अगर कलाविषयक प्रश्नाचे जे विविध दृष्टिकोन आहेत, त्यांची मोकळेपणाने नि निर्भयपणाने चर्चा करणे इष्ट असते. अश्लीलतेसारखे जे इतरही अनेक प्रश्न अगर विषय आहेत त्यांचीही चर्चा घडवून आणावी व या चर्चेचा वृत्तान्त सारांश रूपाने वेळोवेळी अशा प्रकारच्या प्रकाशनांच्या रूपाने प्रसिद्ध करावा असा एक संकल्प आहे.

वाचकांच्या सहकार्यावरच या प्रकाशनाचे यश अवलंबून आहे.

वा. रा. ढवळे

६ एप्रिल १९६४

डॉ० इरावती कर्वे, एम्.ए. पी.एच्.डी.

# समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अश्लीलता

" अश्लीलता हा कोणत्याही लेखाचा, चित्राचा किंवा इतर वस्तूचा गुण नसून, तो फक्त तसा आरोप करणारांच्या मेंदूचा गुण होय "

हें वाक्य कै. रघुनाथ धोंडो कर्वे आपल्या " समाजस्वास्थ्य " मासिकाच्या पहिल्या पृष्ठावर ठळकपणे छापीत असत. त्यांचा उद्देश असा दिसतो कीं हिरवा, पिवळा, तांबडा; लांब-रुंद, उंच-ठेंगणा; कडू-आंबट गोड वगैरे गुण वस्तुनिष्ठ असतात. त्याप्रमाणे अश्लीलता हा गुण नसून तो केवळ अनुभवणाऱ्या मनाचा विकार आहे. त्यांना असें म्हणायचें आहे, कीं अमकी एक कृति अश्लील आहे असें जो म्हणतो त्याचें मनच अश्लील असतें. ह्या म्हणण्यांत एका दृष्टीने तथ्य नाही, आणि एका दृष्टीने आहे. कोठच्याही वस्तूच्या गुणधर्माचा विचार करताना अगदी पूर्णतया शास्त्रीय दृष्टीने विचार केला तर परिमाण कदाचित वस्तूचाच गुण म्हणून म्हणता येईल. पण रंग, चव, वगैरे अगदी वस्तुनिष्ठ भासणारे गुण सुद्धा वस्तुनिष्ठ नसून व्यक्तिनिष्ठ-निदान ज्या जीवनकोटींतील व्यक्ति असते त्या कोटीच्या शरीररचनेवर व मेंदूच्या ग्रहणशक्तीवर अवलंबून असतात. माझ्या बागेंतील अमक्या एका फुलाचा रंग तांबडा आहे असें जेव्हा मी म्हणतें, तेव्हा ह्याचा अर्थ इतकाच कीं त्या फुलावरून परिवर्तन होणाऱ्या कांही लांबीच्या प्रकाशलहरी माझ्या ( मनुष्याच्या ) डोळयांना तांबड्या भासतात. त्याच वेळीं त्याच बागेंत भ्रमण करणाऱ्या मधमाशीला तेंच फूल मुळीच तांबडें दिसणार नाही.—ही झाली अगदी वस्तुनिष्ठ समजल्या जाणाऱ्या गुणांची गोष्ट. इतर गुण तर बहुतेक अंशी व्यक्तिनिष्ठ

किंवा समाजनिष्ठच असतात. चांगलें-वाईट, सुंदर-कुरूप, इष्ट-अनिष्ट हे गुण आपण वस्तूंना सारा वेळ चिकटवीत असतों. ते वस्तूंत नसून व्यक्तीच्या मनाचेच असतात. आणि व्यक्तीचें मन बहुतेक अंशी समाजाने घडविलेलें असतें. ह्या गोष्टींना गुण शब्दा-ऐवजीं "मूल्य" हा शब्द जास्त योग्य ठरेल. प्रत्येक व्यक्ति सारा वेळ मूल्यांच्या जगांत वावरत असते. हीं मूल्यें व्यक्तिनिष्ठ किंवा समाजनिष्ठ आहेत म्हणून तीं खरीं मूल्येंच नव्हेत किंवा तीं मुळी खरोखरीचीं अस्तित्वांतच नाहीत हें म्हणणे अतिशय चूक आहे. बाहेरील जगांत असलेल्या वस्तूंच्या गुणधर्मांवर मनुष्याचे व्यवहार ज्याप्रमाणे आधारलेले असतात, त्याचप्रमाणे सामाजिक मूल्यें पण मानवी व्यवहाराला जरूर आहेत. तीं असल्या-शिवाय समाज राहूं शकत नाही आणि समाजाशिवाय व्यक्ति ही कल्पनासुद्धा अशक्य कोटीतील आहे. अगदी साध्या साध्या सुद्धा व्यवहारांत समाजाचे अलिखित नियम मनुष्य पाळीत असतो. जीवनोपयोगी वस्तूंची देवाण घेवाण, एकत्र राहाणे, शेजारी-शेजारी राहाणे, खेळणे, कुटुंब ह्या नांवाखाली येणारे अनंत व गुंतागुंतीचे व्यवहार करणे, ह्याशिवाय राज्यसंस्था, शासनसंस्था, धर्मसंस्था ह्यांच्यांत भागीदार असल्यामुळे करावे लागणारे व्यवहार ह्या सर्वांनाच बंधनें व नियम लागू आहेत. ह्या बंधनामुळे आणि नियमामुळे कांही तऱ्हेचे व्यवहार योग्य समजले जातात व कांही अयोग्य समजले जातात. योग्य असलेल्या व्यवहारांची अधिकृत यादी फार करून आढळत नाही. पण अयोग्य व्यवहारांची यादी बहुतेक साक्षर समजांतून कायद्याच्या नांवाखाली केलेली आढळते. अयोग्य व्यवहार कायद्याच्या कक्षेंत झाल्यास त्याबद्दल शासन काय असावें हेंही बहुतेक साक्षर समाजांत नमूद केलेलें असतें. पण कायद्यांत न सांगितलेले किंवा ज्यांच्याबद्दल शासन स्पष्ट तऱ्हेने दिलेलें नाही असेहि अयोग्य व्यवहार पुष्कळच असतात. व त्याबद्दल समाज किंवा त्यांतील कांही भाग आपली नापसंती निरनिराळ्या तऱ्हेने व्यक्त करीत असतो.

व्यवहारांतील योग्यायोग्यता ही जीवनांतील कांही विशिष्ट महत्त्वाच्या विभागालाच लागू आहे असें नाही. अगदी क्षुल्लक बाबतीत सुद्धा वागण्याच्या मर्यादा असतात. किती खावें, किती वेळा खावें; काय खावें, काय ल्यावें कसें ल्यावें; काय बोलावें, कसें बोलावें; चालणें कसें असावें; दृष्टि कशी असावी, येथपासून तों लग्नाच्या बायका किती असाव्या, लग्नाबाहेरचे संबंध असावे कीं नसावे, असल्यास कुठच्या प्रमाणांत; सुंदर बायकोच्या सौंदर्याचा उपयोग नोकरींत बढती मिळण्याकरता कितपत करावा की मुळीच करूं नये, देवभक्ती करीत असतानाहि आचारांतील कडकपणा किती ठेवावा; स्वतःच्या आचारावर कितपत बंधनें घालावींत; कुटुंबीयांच्या आवडीनिवडी शरीरस्वास्थ्य व मनःस्वास्थ्य ह्यांना कितपत किंमत द्यावी; ह्या सर्व गोष्टींना लिखित, व त्यापेक्षाही अधिक प्रमाणांत अलिखित मर्यादा असतात. ह्या मर्यादा समाजांतील निरनिराळ्या व्यक्तींना निरनिराळ्या असूं शकतात. कुमारिकेच्या वागण्याबद्दलचे नियम, सौभाग्यवतीच्या वागण्याचे नियम, व विधवेच्या वागण्याचे नियम हे बरेच वेळा निरनिराळे असतात. एवढेच नव्हे तर एकाच

तऱ्हेच्या नियमांची तीव्रताही निरनिराळी असूं शकते. त्याचप्रमाणे निरनिराळ्या वयाप्रमाणेही वागणुकीचे नियम निरनिराळेहि असतात व त्यांच्या अंमलबजावणीच्या कडकपणांतही फरक पडतो. निरनिराळ्या वर्गांतील किंवा जातींतील लोकांबद्दलचे नियम निरनिराळे असतात. सर्व तऱ्हेच्या लहानमोठ्या नियमांचें उल्लंघन निरनिराळ्या व्यक्तींकडून होत असतें व त्या व्यक्तींना बरेचदा ह्या नाही त्या रूपांत समाजाकडून धिक्कार, उपहास, किंवा प्रत्यक्ष दंड अशा निरनिराळ्या प्रकारच्या शिक्षा भोगाव्या लागतात. व्यवहारांतील सर्वच नियम व त्यांबद्दल वाटणारी आस्था हा एका दृष्टीने संस्कृतीचा पाया आहे व दुसऱ्या दृष्टीने संस्कृतीचें कार्य आहे. समाजरचनेच्या मुळाशी असलेल्या सर्वच लहानमोठ्या नियमांना धर्म अशी संज्ञा देणे अयोग्य नाही. समाजधारणेचा पाया म्हणून आणि समाजधारणा अव्याहत चालावी म्हणून जे कांही लिखित आणि अलिखित नियम आहेत त्या सर्वांना व्यापक दृष्टीने धर्म म्हणता येईल. त्याच व्यापक अर्थाने लग्नाच्या बायकोशी वागताना कोणत्याही समाजधर्माचें उल्लंघन करणार नाही, अशी शपथ "धर्मे च अर्थे च कामे च नातिचरामि" ह्या वाक्याने घेतलेली दिसते. ह्या वाक्यांत "धर्म" ह्याचा अर्थ वरील व्याख्येइतका व्यापक नसून आपण नेहमी "धर्म" हा शब्द वापरतों तसा संकुचित आहे. पण "अतिचर" ह्या क्रियापदांत समाजाने घालून दिलेल्या मर्यादेचें उल्लंघन हा अर्थ अभिप्रेत आहे. "अतिचार" म्हणजे काय हा वादाचा विषय होतो. व समाज सारखा बदलत असल्यामुळे, समाजाचीं मूल्यें बदलत असतात आणि आचार व अतिचार यांच्या मर्यादाही मागेपुढे होत असतात. समाजाच्या कांही अवस्थांमध्यें आचार व अनाचार ह्यांच्या मर्यादा स्पष्ट असतात. कांही अवस्थांमध्यें त्या बऱ्याच अस्पष्ट होतात. एका समाजाचा परकीय समाजाशी कोणत्याही तऱ्हेने निकट संबंध आला म्हणजे आचारविचारभिन्नतेची तीव्र जाणीव होऊन ह्या मर्यादा पुसट व्हायला लागतात. उदाहरणेंच द्यायचीं तर आपल्या स्वतःच्या समाजांतील देता येतील. "जाईन उभ्या विदी । न दिसे उजवी बुज ॥ राखील कुळ तुझं" ह्या ओवींत मर्यादशील स्त्रीने पदर कसा घ्यावा हें सूचित केलें आहे. आजकाल कित्येक कुलवानांच्या मुली व वधू ह्यांचा पदर मुळी एकाच खांद्यावर असतो. तेव्हा ही मर्यादा बदलण्याचें कारण ज्या समाजांत स्त्रिया दोन्ही खांदे उघडे टाकतात अशा समाजाशी संबंध आला हेंच आहे. पूर्वीच्या काळीं लग्नाच्या दोन बायका असणें, हें अप्रतिष्ठेचें लक्षण नव्हतें. आता ती गोष्ट गुन्ह्याच्या सदरांत जाऊन बसली आहे. हाही परिणाम संस्कृतिसंगमाचाच आहे.

प्रत्येक समाजामध्ये आचाराचे जे नियम असतात ते सर्वच्या सर्वच अगदी निरपवाद असे नसतात. कांही प्रसंगी ते नियम सैल होतात किंवा कांही वेळापुरते अजीबात नाहीसे होतात. उदाहरणार्थ, होळीच्या दिवसांत गोवरी-लाकडांची चोरी करणें पूर्वी क्षम्य मानलें जाई. तसेंच एरवी सभ्य वागणारे लोक त्या दिवसांत मन मानेल तसा गलिच्छपणा व शिव्यागाळीही करीत असत. कांही प्रसंगी एरवी कानाला न रुचणारा

विनोद आणि थट्टा क्षम्य समजली जाई. बहुतेक सर्व समाजांतून सर्वसाधारणपणे न खपणारें वर्तन कांही विशिष्ट प्रसंगी करण्याची मुभा असे आणि ही मुभाहि सर्वांना नसून कांही विशिष्ट वयाच्या व तऱ्हेच्या व्यक्तींना असे. हिंदू समाजांतील शिमगा किंवा ख्रिस्ती समाजांतील कार्निव्हल हे अशा प्रकारचे बंधनें शिथिल करायचे सण आहेत. ही बंधनांची शिथिलता सुद्धा कांही तरी नियमांत बसलेली असते. ज्यावेळी कुठच्याच तऱ्हेचे नियम राहात नाहीत, कुठचें योग्य, कुठचें अयोग्य, कुठचें कर्म, कुठचें अकर्म, हें समाजांतील बहुसंख्य व्यक्तींना कळेनासें होतें, तेव्हा व्यक्तीच्या जीवनांत किंवा समाजाच्या जीवनांत भयंकर क्रांती होते. सर्व तऱ्हेचीं जीवनमूल्यें विस्कटून गेलेलीं आहेत. कशाला प्रमाण म्हणून राहिलें नाही. अशा अवस्थेंत समाज किंवा व्यक्ति दोन्हीहि जगूं शकत नाहीत. जुनीं प्रमाणें नष्ट होऊन नवीन प्रमाणें सर्वमान्य होईपर्यंत जो वेळ जातो तो व्यक्तीला किंवा समाजाला दोघांनाहि अतिशय कष्टाचा असतो.

ह्याच अनुषंगाने वाङ्मय, कला व संप्रदाय ह्यांचा विचार होणें आवश्यक आहे. वाङ्मयाच्या इतर कार्यांबरोबरच एक महत्त्वाचें कार्य म्हणजे जें साधारणपणे मिळत नाही तें मिळाल्याचा भास उत्पन्न करणें. "बोलाचीच कढी, बोलाचाच भात, खाऊनिया तृप्त होई कोण ?" असें जरी तुकारामबोवा म्हणाले तरी थोड्याबहुत प्रमाणांत बरोबर तेंच कार्य वाङ्मय, कला आणि धर्म करीत असतात. त्याशिवाय भिकाऱ्याला राज्यपद मिळाल्याच्या गोष्टी सर्व जगांतील वाङ्मयांतून दिसल्याच नसत्या. जातिनिष्ठ समाजामध्ये चोखामेळासारख्याला प्रत्यक्ष लाथाच मिळतात. पण धर्माने त्याला मरणानंतर संतपद दिलें व वैकुंठाची प्राप्ती करून दिली. बायबलमध्ये बरोबर असेंच सांगितलें आहे, कीं देवाच्या राज्यांत पृथ्वीवरील उपेक्षितांना खास जागा राखून ठेवलेली असते. प्रत्येक कादंबरी, कथा किंवा काव्य हें वाचतांना साधारण मनुष्य त्यांतील कलामूल्यांचा विचार करीत नाही. वाचक त्यावेळेपुरते स्वतःला त्या त्या प्रसंगांतील नायक किंवा नायिका कल्पितो. जितका कलेचा दर्जा खालचा तितक्या प्रमाणांत अशा तऱ्हेने स्वतःचें समाधान करणें जास्त सोपें जातें. विशेष म्हणजे हें समाधान किंवा सौख्य वीट येणारें नसतें. इतकेंच काय, अशा तऱ्हेचें सौख्य लाभायला व कंटाळा टाकायला उपाय म्हणून कलाकृति जास्त जास्त भडक व्हावी लागते. मनुष्य खाऊन खाऊन तात्पुरता कां होईना, तृप्त होतो. कामेच्छा कितीही प्रबळ असली तरी तृप्तीचा क्षण प्रत्यक्ष कामपूर्तीनंतर येतोच. कितीही ताकदवान असलें तरी स्वतः खेळत असताना मनुष्य दमतेंच. पण चविष्ट जेवणाचीं वर्णनें वाचून किंवा शृंगाराचें वर्णन वाचून किंवा प्रत्यक्ष डोळयांनी बघून सौख्य झालें तरी तृप्ती मिळत नाही आणि ब्रेबर्न स्टेडियमवरती खेळणाऱ्याने कितीही श्रमाने धावा काढल्या तरी पहाणाऱ्याचे पाय दुखत नाहीत. ह्यासाठी शृंगार जास्तजास्त भडक करण्याकडे वाङ्मय किंवा चित्रपट ह्यांची प्रवृत्ति होऊं लागते. कलेचें सर्वच क्षेत्र वासनेचा सौदा करायलाही फार सोईचें ठरतें.

योग्यायोग्यतेचे नियम कलेला लागू झाले तर कलावंताच्या स्वातंत्र्यावर गदा येते, कलेंत आविष्कार होणाऱ्या सर्जन शक्तीला बाध येतो असें कांहींचें म्हणणे आहे. आणि खरोखर अश्लील काय व अश्लील काय नाही हें ठरवण्याची अडचण खरी हीच आहे. कलावान, मग तो लेखक, चित्रकार, शिल्पी किंवा चित्रपटनिर्माता कोणीही असो, नवनिर्मिति करण्याचें त्याचें कार्य एका दृष्टीने जग निर्माण करणाऱ्या परमेश्वराच्या कार्यासारखेंच आहे. ज्याप्रमाणे विश्वाचा विचार करताना त्याला मानवी मूल्यांची कसोटी लावणे वेडगळपणाचें ठरेल, त्याचप्रमाणें थोड्या अंशाने रोजच्या व्यवहारांतील योग्यायोग्यतेची कसोटी कलेला लावणेही सर्वस्वी योग्य होणार नाही "थोड्या अंशाने सर्वस्वी योग्य होणार नाही" ही शब्दयोजना मी सहेतुक केलेली आहे. कला हा जरी व्यक्तीच्या भावनांचा, बुद्धीचा व कल्पनाशक्तीचा आविष्कार असला व कलावंताला स्वतःला तो अगदी सर्वस्वी व्यक्तिनिष्ठ वाटला तरी कलेचें रूप, कलेचीं मूल्यें; कलावंताचें जीवन हीं सर्वत्र समाजाने घडवलेलीं अशीं असतात. शिवाय कलेचें पांघरूण घेऊन कलावान नसलेल्या लोकांना कलेप्रमाणें भासणारें असें कांहीतरी बनवून त्यापासून लोकांकडून पैसेही काढता येतात. अश्लील वाङ्मयाबद्दल कांही वर्षांपूर्वी बोलताना एक पोलीस अधिकारी म्हणत होते कीं असें वाङ्मय निर्माण करणारी पुण्यांतील कांही मंडळी थोड्या अवधींत इतका पैसा मिळवतात कीं मोठमोठे दंड भरूनहि वर्षानुवर्ष त्यांना आपला धंदा चालवता येतो. ह्यासाठी कलेच्या स्वातंत्र्याचा पुकारा करून अश्लीलतेला उत्तेजन दिल्यामुळे लोकांच्याबरोबर कलेचीही हानी होते असें मला वाटतें.

अश्लीलता नेमकी कशांत आहे हें ठामपणाने बोट ठेवून सांगता येत नसलें, तरी तो वस्तूचा गुणधर्मच नाही म्हणून अशी कांही गोष्टच नाही असें म्हणणें म्हणजे वस्तुस्थितीचा विपर्यास करणें आहे. अश्लीलतेचा विचार करतांना ती निर्माण करणाऱ्याचा हेतू, ती ज्यांच्यापर्यंत पोचते त्यांची संख्या व जितका वेळ पोचत राहाते तो काळ ह्या तिन्ही गोष्टी लक्षांत घ्याव्याच लागतात. संस्कृत ग्रंथांतून उत्तान-शृंगारिक वर्णनें असलीं तरी एक तर तीं आनुषंगिक असतात, इतर दुसऱ्या गोष्टींबरोबर ओघाओघाने आलेलीं असतात, व दुसरें, सामान्य मनुष्याला तीं मिळत वा समजत नाहीत. फारच थोड्या लोकांपर्यंत तीं पोंचतात. अशा एखाद्या ग्रंथाचें भाषांतर करतांना त्यांतील इतर सृष्टि बाजूला ठेऊन फक्त उत्तान-शृंगाराचाच भाग चवीचवीने भाषांतरित करून पैसे मिळवण्याच्या हेतूने लोकांच्या हातांत पडेल असें केलें तर हा आचार गर्ह्य व दंडनीयच समजला पाहिजे. दंड करणारी व्यक्ति किंवा संस्था कोणची असावी व दंड किती असावा हें ठरवणेही कठीण आहे. केवळ शिष्ट लोकांना किंवा खऱ्या रसिकांना असंमत म्हणून अशा गोष्टींचा खासगी रीत्या किंवा सार्वजनिक रीत्या धिःकार करून भागत नाही. कारण ह्या ना त्या उद्योगाने पैसा मिळवणाऱ्या लोकांच्यावर सार्वजनिक धिःकाराचा परिणाम होत नाही. त्यांच्या विरुद्ध शासन संस्थेचीच मदत घ्यावयास पाहिजे. ह्या उलट एखादा

कलाकार आपल्या कलानिर्मितीत उत्कटतेच्या भरांत–ती उत्कटता नुसती उपभोगाच्या आनंदाची नसून धिःकाराचीही असूं शकेल—लोकांना अश्लील वाटणारी निर्मिति करून गेला तर धिःकार हें प्रभावी शस्त्र ठरूं शकेल. किंवा त्याची निर्मिति पहिल्या दर्जाची कलाकृति असली तर लोकांचा धिःकार हास्यास्पद ठरेल. कांही झालें तरी ज्या युगांत लोक हजारोंनी–स्त्री, पुरुष, तरुण मुलें–मुली अशी सरसकट–चित्रपटासारखी एखादी गोष्ट नेहमी पाहूं शकतात, किंवा रेडियोवरचीं गाणीं ऐकूं शकतात, किंवा १–२ आण्याला उत्तान, भडक वर्णनें वाचूं शकतात अशा युगांत सर्वांनी मिळून वाचणें, ऐकणे, पहाणे, ह्या कुठल्याच गोष्टींत अतिचार न होण्याची खबरदारी घेतली पाहिजे.

व्यक्तिस्वातंत्र्य हें मूल्य ऐकायला किंवा उच्चारायला जितकें गोड आणि सोपें तितकेंच आचरणांत उतरवायला दुष्कर आहे. हें स्वातंत्र्य कशाचें? चोरी करायचें, एखाद्याला ठार मारायचें, बायकोचा खून करावयाचें किंवा तिला चोप द्यायचें? ह्या बाबतींत स्वातंत्र्य असावें असें म्हटलें तर सर्वच त्या माणसाला वेड्यांत काढतील. लहान मुलांना चोरी करायला शिकवणे किंवा इतर तऱ्हेने कुमार्गाला लावणे हेंही स्वातंत्र्य कोणी कबूल करणार नाही. कांही वर्षांपूर्वींपर्यंत अगदीं हीच गोष्ट धनसंचय करण्याच्या बाबतीत होती. पण आता कोठचीही राजसंस्था व्यक्तीला अनिर्बंध धनसंचय करूं देत नाही. ह्या गोष्टींमध्ये जितक्या उघडपणें समाजाचीं बंधनें प्रतीत होतात तितक्या उघडपणें जरी तीं इतर गोष्टींत प्रतीत झालीं नाहीत तरी तीं असतातच. समाजाला नवी दृष्टि देणाऱ्या कलाकाराला हीं बंधनें मोडण्याची इच्छा असली, तर त्याबद्दल होणाऱ्या दंडालाही त्याने तयार असलें पाहिजे. व उत्कृष्ट कलाकार ह्याप्रमाणे दंड सहनही करतात. व्यक्तिस्वातंत्र्य म्हणजे मूल्यहीनता व सार्वत्रिक बंधमुक्तता खासच नाही. व्यक्तीच्या व्यवहारावर अती दडपण नको ह्यासाठी व्यक्तीची धडपड सदैव चाललेली असते. दुसऱ्या बाजूने व्यक्तीला कह्यांत ठेऊन समाजाचें नुकसान न व्हावें अशी धडपड समाजाची चाललेली असते. समाज म्हणजे कांही हातांत शस्त्र घेऊन भांडणारा विराट पुरुष नव्हे. तर समाजाच्या मूल्यांना जपणाऱ्या व्यक्ति समाजाच्या वतीने भांडत असतात. ह्याच झगड्यांत जुनें बदलत असतें व नव्याची स्थापना होत असते. तेव्हा, व्यक्तिस्वातंत्र्याच्या नांवाखाली वासनांच्या अमर्याद परिपोषाशिवाय ज्यांत कसलाही दुसरा उद्देश नाही, अशा तऱ्हेच्या निर्मितीला मोकळीक देणे कधीही रास्त ठरणार नाही.

●

ॲड्व्होकेट सुशील कवळेकर, एम्. ए. एलएल. बी.

# कायदा आणि अश्लीलता

कायद्याच्या क्षेत्रांत अश्लीलतेची काय व्याख्या आहे अथवा अश्लीलता हा केव्हा गुन्हा होऊं शकतो याविषयी मी आपणासमोर थोडक्यात दिग्दर्शन करणार आहे. नैतिक, सामाजिक अथवा साहित्यिक दृष्ट्या अश्लीलतेचा विचार करणे मला प्रस्तुत नाही.

कायदा म्हणजे सर्वसामान्य माणसाचें व्यवहारज्ञान अशी कायद्याची सुटसुटीत व्याख्या आहे. समाजांतील नैतिक व अनैतिक प्रवृत्तींचा विचार करूनच कायदा घडविण्यांत येत असतो. या दृष्टीने कायदा म्हणजे सामाजिक सदसद्विवेकबुद्धीचा आरसा समजण्यांत येतो. म्हणजे पर्यायाने ज्यावेळी कायद्याच्या क्षेत्रांत अश्लीलतेचा विचार होतो त्यावेळी या विचारांत नैतिक आणि सामाजिक दृष्टिकोणाचें प्रतिबिंब पडल्याशिवाय रहात नाही. साहित्यिकांचा दावा असा आहे कीं, साहित्य हा समाजाचा वास्तववाद आहे म्हणजे समाजाचें प्रतिबिंब दिग्दर्शित करण्यांत साहित्य व कायदा दोन्ही सहभागी आहेत.

लोकशाहीमध्ये कायदा म्हणजे लोकशाहीचें अधिकृत मत आहे. इण्डियन पीनल कोड म्हणजे फौजदारी कायदा ज्यावेळी घडविला गेला त्यावेळी आपल्या देशांत लोकशाही नव्हती. या कायद्याचें प्रथमतः संकलन १८३७ मध्ये झालें. त्यावेळी इण्डियन लॉ कमिशनचे अध्यक्ष लॉर्ड मॅकॉले व सभासद मॅक्लोड अँडर्सन व मिलेट होते. या कमिशनने हा कायदा संकलित केला. त्यामध्ये पुनः फेरफार होऊन शेवटी १८५७ मध्ये हा कायदा पूर्णपणें संकलित झाला व ६ आक्टोबर १८६० मध्ये त्यावेळच्या विधानसभेत हा कायदा पास झाला. भारत स्वतंत्र झाल्यावरही हा कायदा भारताने तसाच चालू ठेविला

आहे. म्हणजे हा कायदा आता भारतीय लोकशाहीचा कायदा आहे असें म्हटल्यावाचून गत्यंतर नाही.

या कायद्याच्या चाळीसाव्या कलमांत गुन्हा या शब्दाची व्याख्या केली आहे. कायद्याने जी बाब सजेला अथवा शिक्षेस पात्र आहे ती 'गुन्हा' अशी व्याख्या आहे. फौजदारी कायद्याच्या १४ व्या अध्यायांत सार्वजनिक स्वास्थ्य व सोय, नीतिमत्ता व सभ्यता याविषयीं कायदे करून कोणत्या बाबी गुन्हे आहेत त्याचें वर्णन केलें आहे व कलम २९२ मध्ये पुढीलप्रमाणे गुन्ह्याला सजा सांगितली आहे.

"जो कोणी कोणत्याही प्रकारचें अश्लील पुस्तक अथवा पुस्तिका, पेपर, ड्राइंग, चित्र आकृति, रेखाकृति अथवा वस्तु विकील अथवा भाड्याने देईल अथवा प्रदर्शन मांडील अथवा प्रसार करील अथवा अशा तऱ्हेच्या उद्देशानिमित्त आपल्याकडे अशी वस्तु ठेवील अथवा या उद्देशाने बाहेरून अशी वस्तु मागवील अथवा बाहेर निर्यात करील अथवा या उद्देशानिमित्त अशा प्रकारची वस्तू तयार करण्याच्या अथवा विकण्याच्या अथवा निर्यात करण्याच्या अथवा प्रदर्शन करण्याच्या अथवा प्रसार करण्याच्या धंद्यांत किंवा व्यापारात भाग घेईल वा त्यामध्ये नफा मिळवील अथवा कोणातरी इसमाकडे अशी वस्तु मिळेल अशा प्रकारची जाहीरात करील किंवा वरील प्रकारचीं कृत्यें करण्याचा प्रयत्न करील तो तीन महिने सजा आणि/अथवा दंडास पात्र होईल!"

याला अपवाद म्हणजे धार्मिक कारणासाठी उपयोगांत येत असलेलें पुस्तक, पुस्तिका चित्र अथवा पेंटिंग किंवा देवळांत कोरलेली शिल्पकृति अथवा पेंटिंग अथवा रेखाकृति अथवा मूर्ति वाहणाऱ्या रथावर कोरलेलं अथवा ठेवलेलें चित्र अथवा आकृति हा एकच होय. अशा वस्तु अश्लील समजण्यांत येणार नाहीत.

२९३ कलमांत वरील प्रमाणे वस्तु जर कोणी २० वर्षांखालील व्यक्तीस विकली असेल. अथवा भाड्याने दिली असेल अथवा कोणत्याही तऱ्हेने त्याच्या ताब्यांत दिली असेल तर सजा तीन महिन्यांवरून ६ महिन्यांची होईल असें नमूद आहे.

२९४ कलमांत नमूद केलं आहे कीं:-

जो कोणी इतरांना त्रास देण्याच्या हेतूने सार्वजनिक जागेत कोणत्याही प्रकारचें अश्लील कृत्य करील अथवा अश्लील कविता अथवा गाणें गाईल किंवा उच्चारील किंवा अश्लील शब्द उच्चारील त्याला तीन महिने सजा व दंड होईल.

सबंध फौजदारी कायद्यांत अश्लीलतेसंबंधी जे नियम आहेत ते वरील प्रमाणे आहेत. कोर्टापुढे ज्यावेळी अशा तऱ्हेचे आरोपी येतात त्यावेळीं अश्लीलता म्हणजे काय याचा कोर्टास कायदेशीर निकाल द्यावा लागतो.

जिनेव्हा येथे अश्लील लिखाणाच्या प्रसारास व व्यापारास बंदी घालण्यासाठी जो आंतरराष्ट्रीय ठराव झाला, त्यावर हिंदुस्थान सरकारच्या वतीने १२ सेप्टेंबर १९२३ रोजीं सही झाली व त्यानंतर १९२५ साली वर सांगितलेल्या कलमांत नमूद केल्याप्रमाणे

कायदा पास करण्यांत आला. जिनेव्हा ठरावांत ज्या बाबी निषेधार्ह मानल्या आहेत त्याच बाबी वरील कलमांत नमूद करून फौजदारी कायद्यांत दाखल करण्यात आल्या आहेत.

गुन्हेगार इसम याने जें ' अश्लील ' कृत्य केलें असेल त्यावरूनच त्याचा मानस काय होता तें कळूं शकतें व तो मानस म्हणजे समाजाचीं मनें विकृत करून सार्वजनिक नीतिमत्ता बिघडविणें हा होय. आपला उद्देश चांगला होता हा बचाव पुरेसा होत नाही. त्या इसमाचें कृत्यच त्याला गुन्हेगार ठरविण्यास पुरेसें आहे.

कोणतेंही लिखाण अश्लील आहे कीं नाही हें ठरविताना पुष्कळ अडचणी निर्माण होतात. उदाहरणार्थ, एखादें पुस्तक सर्व चांगलें असेल पण फक्त एखादें वाक्य अथवा वाक्यसमूह अश्लील असेल तर तें सर्व पुस्तक अश्लील धरावें काय ? फक्त त्या वाक्याकडे लक्ष दिलें तर तें अश्लील होईल पण एकंदर साकल्याने व संदर्भाने विचार केला तर तें सभ्य गणण्यांत येईल. तरी अशा वेळी हें सर्व लिखाण गुन्ह्यास पात्र होतें काय ? यासंबंधी इंग्लीश कोर्टामध्ये पुष्कळ वेळ मतभेद झाले आहेत. अगदी पहिल्या पहिल्याने कोर्टाचा असा कल होता कीं पुस्तकांतील कांही भाग जरी अश्लील असला तरी सबंध पुस्तक अश्लील समजण्यांत यावें याला Single Passage test म्हणतात. त्यानंतर कोर्टाचा कल बदलला व General purport test सुरू झाली म्हणजे एखादा भाग जरी अश्लील असला तरी साकल्याने विचार करून निर्णय ठरविला पाहिजे व साकल्याने पुस्तक चांगलें असेल तर एखादा दुसरा दोष गर्ह्य समजण्यात येऊ नये. नंतर कोर्टाचा कल परत बदलला व परत एकदा पूर्वीचाच निर्णय मान्य होऊन Single Passage test सुरू झाली म्हणजे साकल्याने निर्णय न करता एखादा दुसरा भाग जरी अश्लील असला तरी सबंध पुस्तक अश्लील समजलें पाहिजे. १९५९ सालीं इंग्लंडमध्ये जो कायदा पास झाला आहे त्यांत दोन्ही विचारांचा सुवर्णमध्य घेतला आहे.

अश्लीलतेसंबंधी इंग्लिश कोर्टांत काय निकाल झाले आहेत तें पहाणे फायदेशीर आहे. कारण हिंदुस्थानांतील सर्व कोर्टांनी निकाल देताना इंग्लिश कोर्टांतील निकालाचा आधार घेतलेला आहे.

१८६८ मध्ये जज्ज कॉकबर्न यानी इंग्लंडमध्ये निकाल दिला या केसला ' हिक्लीन ' केस असें म्हणतात. हा निकाल फार महत्त्वाचा मानण्यांत येतो व या निकालावरच आज सुद्धा कोर्टात अश्लीलतेची व्याख्या करण्यांत येते. या केसमध्यें हिक्लीन या इसमाने एक पुस्तिका प्रसिद्ध केली होती व त्यांत रोमन कॅथॉलीक धर्मांत पाद्र्यांचा नैतिक अधःपात व विशेषतः कबुली जबाबांच्या वेळीं काय प्रकार घडतात त्या सर्व घटनांचें अश्लील वर्णन होतें. मॅजिस्ट्रेट कोर्टाने ही पुस्तिका अश्लील ठरविली पण वरच्या कोर्टाने तो निकाल फिरविला. नंतर हायकोर्टांत हें प्रकरण गेलें व त्यावेळी पहिल्या कोर्टाचा निकाल कायम झाला व पुस्तिका अश्लील ठरविण्यांत आली. कॉकबर्न यानी निकालांत

सांगितलें कीं ज्यांच्या मनावर विकृत परिणाम होऊं शकतो व ज्यांच्या हातांत हें पुस्तक पडण्याचा संभव आहे त्यांच्यावर असा विकृत परिणाम होऊं शकेल तर तें पुस्तक–जें असा परिणाम घडवूं शकेल–अश्लील समजण्यांत यावें. सर्व पुस्तकांत एखादा दुसरा अल्प भागसुद्धा अश्लील असेल तर सबंध पुस्तकच अश्लील समजण्यांत यावें. लेखकाचा हेतु सत्यस्थिती वर्णन करण्याचा होता अथवा लोकात पसरलेलें अज्ञान दूर करणे हा होता असा बचाव निरर्थक आहे. विकृत मनोवृत्ति उत्तेजित होतात हा परिणामच त्या इसमास गुन्हेगार ठरविण्यास समर्थ आहे. या केसमध्ये हिक्लीनचा उद्देश सत्यस्थिती दाखवून अंधार दूर करणें हा फार चांगला होता. पण तरीसुद्धा पुस्तिका अश्लील ठरलीच !

१८७२ मध्ये इंग्लिश कोर्टांत जॉर्ज मॅकी या इसमावर अश्लील पुस्तिका विकल्याबद्दल खटला झाला. त्या खटल्यांत ती पुस्तिका पुरावा म्हणून सादर करण्यात आली. या खटल्याचा ज्या इसमाने रिपोर्ट दिला त्याने सर्व कोर्टांतील घटना व ती पुस्तिका उद्धृत करून॰ रिपोर्ट प्रसिद्ध केला. वास्तविक कोर्टातील केसचा रिपोर्ट देणे याबद्दल कसलीहि जबाबदारी नसते; पण जर त्या रिपोर्टांत कोर्टांत दाखल झालेल्या अश्लील लिखाणाचें पुनर्मुद्रण झालें तर तो गुन्हाच होय.

१९३२ मध्ये ज्ञि मोटाक या इसमाने हस्तलिखिताची सहा पानें एका छापखान्याच्या मालकाकडे छापण्यास दिलीं. या हस्तलिखितांत कविता होत्या व त्या अश्लील होत्या. छापखान्याच्या मालकाकडे अश्लील हस्तलिखित देणें म्हणजे प्रसिद्धीकरण होय असें मानून कोर्टाने या इसमास दोषी ठरविलें.

१९५४ मध्ये मार्टीन सेकर या इसमाने Philanderers नांवाची कादंबरी प्रसिद्ध केली. या कादंबरीत त्यावेळेचें न्यूयॉर्क मधील जीवन दाखविण्यांत आलें होतें व स्त्री पुरुषांमधील लैंगिक संबंधाचीं वर्णनें होतीं. खटला जज्ज स्टेबल समोर चालला. त्यानी ज्यूरीला केस समजून देताना जीं विधानें केलीं त्यामध्ये अश्लीलतेसंबंधी कांही विधानें आहेत व त्या विधानांचा आधार घेऊन ज्यूरीने तें पुस्तक अश्लील म्हणून मान्य केलें नाही. स्टेबल यानी सांगितलें कीं १८६८ मध्ये हिक्लीन केसमध्ये अश्लीलतेचें जें मोजमाप केलें आहे तेंच मोजमाप सर्व ठिकाणीं लागू शकत नाही. १८६८ सालानंतर सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक व सांस्कृतिक सर्व फेरबदल लक्षांत घेऊन, ह्या पुस्तकाचा सद्यः–परिस्थितींतील तरुणतरुणींवर काय परिणाम होतो तें लक्षांत घेतलें पाहिजे. तसेंच एखादा दुसरा भाग अश्लील आहे एवढ्यानेच भागणार नाही तर पुस्तकाचा साकल्याने विचार झाला पाहिजे व पुस्तकाचा प्रधान हेतू काय तें पाहिलें पाहिजे. साहित्य फक्त बालवाचकांकरताच आहे असें न समजता, सद्यःस्थितींत समाजांत सभ्य संस्कृतींत वाढलेली १४ वर्षांची मुलगी त्या पुस्तकाकडे कशा तऱ्हेने आकर्षित होईल, हें ध्यानांत घेतलें पाहिजे.

याच वर्षी चीफ जज्ज गोडार्ड यानी आणखी एक निकाल दिला. रेटर व इतर कांही इसमानी ७ पुस्तकें प्रसिद्ध केलीं व तीं अश्लील कीं काय हा कोर्टापुढे प्रश्न होता. त्यावेळी परत एकदा गोडार्ड यानी सांगितलें कीं हिक्लीन केसमधील निर्णय आजच्या परिस्थितीलाही लागू आहे. कारण आजच्या परिस्थितींतील तरुणतरुणींवर विकृत परिणाम होतो कीं नाही हें पहाणें आपलें कर्तव्य आहे.

इंग्लंडमध्यें Obscene Publications Act 1959 हा १९५९ मध्ये कायदा पास झाला आहे. या कायद्यांत असें नमूद आहे, कीं जर लिखाणाचा परिणाम अथवा लिखाणांतील कोणत्याही भागाचा परिणाम तें लिखाण अथवा तो भाग साकल्याने विचार करता ज्या इसमांच्या हातांत सर्व परिस्थिती लक्षांत घेऊन तें लिखाण पडण्याचा अथवा तो मजकूर दृष्टिपथात अथवा श्रवणपथात पडण्याचा संभव आहे त्या इसमांना विकृत व विचलित करण्याकडे होईल तर तें लिखाण अश्लील समजण्यांत यावें.

इंग्लिश कायदा अश्लीलतेसंबंधी काय म्हणतो त्याचें हें संक्षिप्त दिग्दर्शन आहे.

आपल्याकडे सर्व कोर्टांनी हिक्लीन केसमधील अश्लीलतेसंबंधीं जो निर्णय आहे तोच आधारभूत धरला आहे. सर्व कोर्टांचे सर्व निर्णय लक्षांत घेता पुढील सारांश काढता येईल.

. अश्लीलतेची फौजदारी अथवा इतर कोणत्याही कायद्यांत व्याख्या केलेली नाही. वृत्तपत्रांत एखाद्या नोकराने जर अश्लील जाहिरात अथवा लिखाण छापलें असेल तर फक्त तेवढ्यावरून मालक दोषी होत नाही. मालकांच्या संमतीने हें कृत्य झालें असा पुरावा आल्यास मालक दोषी होतो. जर लिखाण अश्लील असेल तर लेखकाचा हेतू काय होता हा विचार अप्रस्तुत आहे. हेतूचा विचार फक्त शिक्षेच्या वेळीच योग्य होय. जो इसम कोणतेही कृत्य करतो त्याचे परिणाम तो जाणतो हें गृहीत धरलें जातें व तोच नियम अश्लील लिखाणांना लागू आहे. बेकायदेशीर कृत्य हेतू चांगला होता म्हणून कायदेशीर होत नाही.

जें लिखाण सर्वसाधारण इसमास विकृत करतें अथवा मनामध्ये विकृत लैंगिक व कामी विचार निर्माण करतें तें अश्लील होय. परिणाम सर्वसाधारण माणसांवरून आकारला पाहिजे. अपवादात्मक व्यक्ति लक्षांत घेतां कामा नये. लिखाण अथवा वस्तू अश्लील आहे कीं नाही तें सर्व परिस्थिती लक्षांत घेऊन कोर्टाने ठरवावें लागतें. कोर्टाला स्वतःचें ज्ञान व मत वापरणे आवश्यक आहे. अश्लीलतेचें एकच कायमचें असें मोजमाप नाही. भिन्न भिन्न वेळी आणि भिन्न भिन्न देशांत अश्लीलतेच्या कल्पना वेगवेगळ्या असूं शकतात.

अश्लील पुस्तकाचा बचाव करतांना इतर अशाच तऱ्हेचीं पुस्तकें समाजांत वावरतात, हा बचाव उपयोगी नाही. सार्वजनिक नीतिमत्ता अथवा सभ्यता ज्या लिखाणामुळे भंग पावते तें लिखाण अश्लील होय. प्रत्येक असभ्य अथवा सदभिरुचिता धरून नसलेलें

लिखाण अश्लील असतेंच असें नाही पण प्रत्येक अश्लील लिखाण असभ्य व सदभिरुचि विरुद्ध असतें. अश्लील भाग असलेल्या पुस्तकांत इतर कांही भाग उच्च नैतिक मूल्यांचे आहेत हा बचाव उपयोगी नाही. एखादें नग्न चित्र फक्त नग्न आहे म्हणून अश्लील नव्हे तर त्या चित्राचा उठाव कसा आहे, उभारणी कशी आहे, त्यांत काय सूचकता आहे व कोणता उद्देश आहे या सर्व आनुषंगिक बाबी लक्षांत घेऊन अश्लीलतेचा विचार करावा लागतो. पुराणांत अश्लील प्रसंग आहेत म्हणून अशा सर्व अश्लील प्रसंगांची जंत्री करून स्वल्प किंमतींत सर्वांना मिळूं शकेल असें पुस्तक छापलें तर तें अश्लील ठरेल. पुराणांत हे प्रसंग आहेत हा बचाव निरुपयोगी आहे. मजकूर कोणत्या तऱ्हेने लिहिला तें पहाणें आवश्यक आहे. कारण एकच विचार अश्लीलतऱ्हेने प्रकट करतां येतो व सभ्य प्रकारेंही प्रकट करतां येतो. प्राचीन प्रसिद्ध लेखकाची ही साहित्यकृति आहे व ती कांही जप्त झाली नाही. तेव्हा त्या साहित्यकृतीचा सर्वांना लाभ व्हावा म्हणून स्वल्प किंमतीत अनुवाद केला आहे व तो अश्लील असला तरी ती प्राचीन साहित्यकृति आहे असा बचाव उपयोगी पडत नाही. धार्मिक वादग्रस्त मुद्यांच्या स्पष्टीकरणासाठीं आपण ही पुस्तिका लिहिली आहे व ती अश्लील असली तर उपयोगी व उद्बोधक आहे हाही बचाव उपयोगी पडत नाही. भाषेमध्ये अगदी ओबड धोबड स्पष्ट वक्तेपणा असूं शकतो पण तो अश्लील आहे असें ठरत नाही. अश्लीलतेचा अगदी कोशांतला अर्थ घेतला तर जें लिखाण विनयशीलतेला अथवा सभ्य संस्कृतीला मारक आहे तें अश्लील होय. आपल्या कोर्टांतील सर्व निकालांचा हा सारांश आहे. कोर्टांत हे खटले कसे गेले यांचा क्रमवार सारांश सुद्धा उद्बोधक आहे.

१८८१ साली अलाहाबादला हायकोर्टांत जज्ज स्ट्रेटसमोर एक खटला चालला. मुरादाबाद येथे मुसलमानांनी हिंदुधर्माविरुद्ध कांही आक्षेपार्ह विधानें केली होती. त्यांना उत्तर म्हणून आरोपी इंदरमन याने 'हमला-इ-हिंद' व समूसमे-इ-हिंद' दोन पुस्तकें प्रसिद्ध केली. या पुस्तकांत अश्लील मजकूर होता. आरोपीने सांगितलें कीं मुसलमानांना उत्तर म्हणून धार्मिक वादविवाद स्पष्ट करण्यासाठी हीं पुस्तकें प्रसिद्ध करणें आवश्यक होतें. कोर्टाने हा मुद्दा अग्राह्य धरला व हिक्लीन केसप्रमाणें अश्लीलतेचें मोजमाप विकृत मनोवृत्ती उत्तेजित करणें हेंच होय व एकही भाग अश्लील असेल तर सर्व पुस्तक अश्लील होतें या नियमाप्रमाणें आरोपीस दोषी ठरविलें. ( ३ अलाहाबाद ३७ )

१८९५ मध्ये मुंबई हायकोर्टांत न्यायमूर्ती रानडे व जार्डिन यांचेसमोर एक खटला निघाला. परशराम यशवंत या आरोपीने ४ नग्न स्त्रियांचीं चित्रें जवळ बाळगिलीं. या आरोपावर हा खटला होता. कलाकृति केव्हां अश्लील होते हें मोजमाप हिक्लीन केसप्रमाणे ठरविण्यांत आलें. सभ्य संस्कृतीतील जी कलाकृति पोषक नाही ( Indecent ) ती अश्लील असें समजण्यांत आलें व आरोपी दोषी ठरला. ( २० मुंबई १९३ )

१९०४ सालीं अमीरअली व ग्रँट या न्यायमूर्तीसमोर कलकत्ता हायकोर्टमध्ये शरचंद्र घोषवर खटला चालला. या इसमाने पोस्टांतून छापील पोस्टकार्डें पाठविलीं होतीं. या कार्डांवर पेटंट औषधें लैंगिक तक्रारीवर कशीं गुणकारी आहेत तें अश्लील भाषेंत लिहिलें होते. या केसमध्ये सुद्धा हिक्लीन केसचा निर्णय आधारभूत मानला गेला (३२ कलकत्ता २४७)

१९०५ सालीं अलाहाबाद हायकोर्टांत बानर्जी न्यायमूर्तीसमोर एक खटला चालला. आरोपी हरीसिंग याने ' इत्र कोरानी ' ही पुस्तिका लिहिली होती. कुमारी मेरीचा निष्पाप गर्भसंभव ज्यासंबंधी ख्रिस्ती लोकांना आदर आहे या विषयावर कुराणातील संदर्भ देऊन अश्लील मजकूर लिहिला होता. हेतू गैरलागू आहे. फक्त परिणाम पाहिला पाहिजे, हें हिक्लीन केसमधील तत्त्व लागू करुन आरोपीला दोषी ठरविण्यांत आलें.

[ २८ अलाहाबाद १०० ]

१९११ साली कलकत्ता हायकोर्टांत चतर्जी न्यायमूर्तीसमोर १९०५ सालीं पंजाब हायकोर्टांत मुख्य न्यायाधीश क्लार्क यांचेसमोर खटला चालला. मीरन बक्ष या इसमाने लाहोरला रिफा-इ-आम या छापखान्यांत ' झरिया-इ-शदमानी ' हें अश्लील पुस्तक छापलें होतें. त्याबद्दल मीरन बक्ष दोषी ठरला. पण खटला छापखान्याच्या मालकावर म्हणजे आरोपी मुमताझ अलीवर चालला. न्यायमूर्तीनी निकाल दिला कीं नुसता मालक असल्याने दोषी ठरत नाही. मालकाच्या संमतीने पुस्तक छापलें गेलें हा पुरावा आला तरच गुन्हा शाबीत होईल. [ ? क्रिमिनल लॉ जर्नल ७१७ ]

१९११ साली कलकत्ता हायकोर्टांत न्यायमूर्ती चतर्जी यांचेसमोर खेरोदचंद्र या आरोपीवर खटला चालला. या इसमाने 'नातुचोरी' हें पुस्तक प्रसिद्ध केलें होतें. राधा व कृष्ण या दोहोंच्या संबंधावर उडीया भाषेंतील प्राचीन हरिवंश या कृतीवर आधारलेली २८ लोकांची ही साहित्य निर्मिती होती. भाषा सौम्य व उत्प्रेक्षात्मक होती. यांत कांही अश्लील अथवा आक्षेपार्ह मजकूर होता. पण कोर्टाने ठरविलें कीं प्राचीन धर्मग्रंथ अथवा पुराणांना अथवा प्राचीन साहित्य कृतीला अश्लीलतेचा आक्षेप लागत नाही. या ठिकाणीं एक मुद्दा विशद करणें जरुर आहे, कीं मद्रास हायकोर्टाने दुसऱ्या एका खटल्यांत निराळ्या तऱ्हेचा सूर काढला आहे. तें पुढे दाखविलें आहे. ( ३९ कलकत्ता ३७७ )

१९१२ सालीं मुंबई हायकोर्टांत बॅचलर व राव न्यायमूर्तीसमोर विष्णु कृष्ण पुराणिक विरुद्ध खटला चालला. धूतपापेश्वर येथे तयार होणाऱ्या औषधांची माहिती देणारें 'व्यवहार वैद्यक' पुस्तक आरोपीने प्रसिद्ध केलें होतें. या पुस्तकांत लैंगिक दुर्बलता, मुष्टिमैथुन व इतर मैथुनांचा शारीरिक प्रकृतीवर काय परिणाम होतो व कोणत्या औषधाने टाळता येतो त्याचें वर्णन होतें. कोर्टाने ठरविलें कीं अश्लीलता ठरविताना कोणती भाषा वापरली आहे तें पाहिलें पाहिजे. तसेंच कांही भाग उच्च नैतिक पातळीचा आहे. हा बचाव निरुपयोगी आहे. भाषेंतील ओबड धोबड स्पष्टवक्तेपणा म्हणजे अश्लीलता नव्हे. सर्व गोष्टींचा साकल्याने विचार करून कोर्टाने आरोपीस निर्दोषी ठरविलें. ( १५ बॉंबे लॉ रिपोर्टर ३०७ ) .

१९१६ सालीं मद्रास हायकोर्टामध्ये एलींग व शेषगिरी अय्यर न्यायमूर्तींसमोर खटला चालला. त्यांत आरोपी मार्केंडेलु याने 'विदीनाटकम्' पुस्तक प्रसिद्ध केलें यांत अश्लील व आक्षेपार्ह भाग होता. बचाव असा होता कीं, १५ व्या शतकांतील प्रसिद्ध लेखक श्रीनाद याच्या तेलगू साहित्यकृतीचा हें पुस्तक अनुवाद होता. मूळ पुस्तक आक्षिप्त ठरलेलें नाही. या पुस्तकांत एका उच्छृंखल माणसाचें एका विवाहित स्त्रीवर प्रेम व तन्निमित्ताने निरनिराळे प्रसंग यांचें वर्णन आहे. बचाव असा होता कीं प्राचीन साहित्यकृति प्रचलित आहे. तरी साहित्य या दृष्टीने या कृतीचें मूल्य महत्त्वाचें आहे. शिवाय वर्णनशैली सर्व लोकाना समजेल अशी नाही. पण हा बचाव मान्य झाला नाही. प्राचीन साहित्याचा अनुवाद सर्वांना मिळू शकेल अशा आवृत्तीने केला गेला व तो जर अश्लील असेल तर प्राचीन म्हणून अथवा लेखक ख्यातनाम म्हणून बचाव होत नाही. प्राचीन काळीं छापण्याची कला नव्हती. पुष्कळ लोकांच्या हाती साहित्यकृती जाण्याचा संभव नव्हता. पण आजच्या परिस्थितींत फरक आहे व हिक्लीन तत्त्वाप्रमाणें अनुवाद जर विकारजनक असेल तर तें पुस्तक आक्षेपार्ह होईल. तसें या केसमध्यें ठरविण्यांत आलें ( १८ क्रिमिनल लॉ जर्नल १५३ )

१९१९ साली मुंबई हायकोर्टांत शहा व हेवर्ड न्यायमूर्तींसमोर खटला चालला. दाऊदी बोहरा जमातींत दोन तट होते. एका तटातील इसम आरोपी रहिमतअल्ली मुल्ला याने दोन पत्रकें 'याजीदकी ईद' व "शराफअल्ली मामूजीका मर्सीया" या नांवाने प्रसिद्ध केलीं. त्यामध्ये विरुद्ध तटातील बोहरा लोकांविषयी व मुख्य धर्मपंडितांविषयी आक्षेपार्ह व अश्लील विधानें होतीं. मजकूर अश्लील आहे कीं नाही याबद्दल न्यायमूर्तींमध्ये मतभेद झाला. पण दोघांही न्यायमूर्तीनी हिक्लीन केसमधील तत्त्व आधारभूत धरलें. न्यायमूर्ती शहा यानी पत्रकांमध्यें दोन तीन कविता अश्लील असू शकतील पण विकृत मनोवृत्ती उत्तेजित करत नाही असा शेरा दिला. पण न्यायमूर्ती हेवर्ड यानी भाषा घाणेरडी व अश्लील आहे, सर्व पत्रकाचा साकल्याने विचार केला तर विकृत मनोवृत्ती उत्तेजित होतील अशी परिस्थिती आहे, इतर भाग चांगला असला व कांही भाग अश्लील असला तरी गुन्हा कायम होतो असें मत दिलें. ( २२ बॉंबे लॉ रिपोर्टर १६६ )

१९१६ व १९१७ सालीं पंजाब हायकोर्टांत अश्लीलते संबंधी दोन खटले चालले. पहिला खटला जॉन्स्टन व लरोसिनॉल या न्यायमूर्तींसमोर चालला. दोन इसम ठाकूर दत्त व देवीचंद आरोपी होते. "देश उपकारक" या वृत्तपत्रांत " रोग व त्यावर उपाय " या संबंधी अश्लील लिखाण या आरोपीनी प्रसिद्ध केलें. बचाव असा होता कीं हें वृत्तपत्र फक्त ४८५ वर्गणीदारांकडे जातें, व वैद्यक हें शास्त्र असल्याने असलें लिखाण उपकारक आहे. कोर्टाने असें मत दिलें कीं भाषा मनोवृत्ती विकृत करणारी नसून आरोग्याला उपयुक्त अशी माहिती देणारा मजकूर आहे. हिक्लीन केसमधील तत्त्व लक्षांत घेतलें तर हा मजकूर मनोवृत्ती वाईट तऱ्हेने उत्तेजित करत नाही. आरोपीना निर्दोषी ठरविण्यांत आलें. ( १८ क्रि. लॉ. ज. १२६ )

त्यानंतरचे वर्षी त्याच हायकोर्टात दुसरा खटला चालला. मुख्य न्यायमूर्ती जोन्स्टन समोर हा खटला चालला. ' अल्मुनीर ' वृत्तपत्राचा संपादक गुलाम हुसेन आरोपी होता. रमझान उपोषणाविषयी काही धर्मग्रंथातील उताऱ्यांचे आधार देऊन या वृत्तपत्रांत अश्लील मजकूर आला होता. कोर्टाने ठरविलें कीं धर्मग्रंथात एखादा उतारा आहे या सदराखाली तोच उतारा वृत्तपत्रांत आला तर निर्दोषी होत नाही. ज्या वृत्तपत्रांत तो उतारा आला आहे तो कोणत्या कारणासाठी व त्याचा सर्व साधारण मनावर काय परिणाम होतो तें पाहून अश्लील कीं सभ्य हें ठरवावें लागेल. वरील उतारा अश्लील ठरून आरोपीस दोषी ठरविण्यांत आलें [ १८ क्रि. लॉ ज. ५०५ ]

१९३० सालीं जॅक व मित्तर न्यायमूर्तीसमोर कलकत्ता हायकोर्टात कैलासचंद्र अचर्जी याजवर खटला चालला. आरोपीने ' रमेशदार आत्मकथा ' हें पुस्तक लिहिलें होतें. या पुस्तकांत रमेश या इसमाची आत्मकथा व त्याजवर आलेले प्रसंग, संभोगाचीं वर्णनं व बंगालमधील कांही ख्यातनाम इसमांचीं कुलंगडीं या सर्वांचें वर्णन होतें. बचाव असा होता कीं सत्यस्थिती वर्णन करून तरुणांना सावध करणें हा उद्देश असल्याने हे पुस्तक अश्लील ठरत नाही. पण पुनः एकदा हिक्लीन केसमधील निर्णयाप्रमाणे हेतू गैरलागू म्हणून आणि विकृत मनोवृत्तींना पोषक असें लिखाण आहे, असें ठरवून आरोपीला दोषी ठरविण्यांत आलें. [ ६० कलकत्ता २०१ ]

१९४० सालीं याच हायकोर्टात हेंडरसन व अक्रम न्यायमूर्तीसमोर एक खटला चालला. श्रीराम सक्सेना हा आरोपी होता. या इसमावर नग्न स्त्रियांचे फोटोग्राफ विकल्याचा आरोप होता. कोर्टाने ठरविलें कीं नग्न चित्र आहे, या एवढ्याच मुद्द्यावर अश्लीलता ठरत नाही. आनुषंगिक गोष्टी, उठाव, सूचकता, कोणाच्या हातीं पडण्याचा संभव वगैरे सर्व गोष्टी पहाणें आवश्यक आहे. हे फोटो मूळ, तीन पुस्तकांतून "Perfect womanhood", 'Eve in the Sunlight' and 'Sun bathers' घेतले होते व तीनही पुस्तकें प्रचलित होती. शिवाय सरकारतर्फेही या पोस्टकार्डांना असा आक्षेप घेतला गेला नव्हता, कीं सभ्य संस्कृतीस धक्का देण्यासारखें या कार्डांत कांही तरी आहे. आरोपीला निर्दोषी ठरविण्यांत आलें. [ १९४० कलकत्ता २९० ]

१९४७ सालीं लाहोर येथे कॉर्नेलीयस व फालशा न्यायमूर्तीसमोर खटला चालला. आरोपी हरनामदास होता. ' हदायतनामा खावंद ' हें उर्दू पुस्तक आरोपीने प्रसिद्ध केलें होतें. या पुस्तकांत विवाहित लोकांना संभोगसुखासाठी आरोग्यदृष्ट्या आवश्यक गोष्टी काय आहेत त्याची चिकित्सा होती. लैंगिक ज्ञान देण्यासाठी कांही पुस्तकें आवश्यक आहेत व भाषा जर दोषास्पद नसेल तर अशा पुस्तकांना कांही एक हरकत नाही असें फालशा न्यायमूर्तींनी मत दिलें व आरोपीला निर्दोषी ठरविण्यांत आलें. ( ४८ क्रि. लॉ. ज. ९१० )

१९५१ साली कलकत्ता हायकोर्टांत मुखर्जी व चतर्जी न्यायमूर्तीसमोर खटला चालला. आरोपी सुमंत हलदर होता. 'नरनारी' बंगाली मासिकाचा हा संपादक. हें मासिक लैंगिक

ज्ञान प्रसृत करण्यासाठी आहे असा बचाव होता. व देवळांतील शिल्पकलांच्या कांही आकृति उद्धृत केल्या होत्या. कोर्टानें ठरविलें कीं भाषाप्रयोग, प्रसंगाची निवड व इतर आनुषंगिक गोष्टी पहाणें आवश्यक आहे. या लिखाणांतील मजकूर मुख्य विषयास गैर लागू असून अश्लील शब्दांत लिहिलेला होता. शिवाय शिल्पाकृतीचे नमुने उत्कृष्ट असे न निवडता उद्दीपक असेच दुय्यम स्वरूपाचे निवडलेले होते. यामुळे लिखाण आक्षेपार्ह ठरविण्यांत आलें. ( १९५२ क्रि. लॉ. ज. ५७५ )

१९५३ साली मद्रास हायकोर्टांत सोमसुंदरम् न्यायमूर्तींसमोर खटला चालला. पांडुरंगन् हा आरोपी होता व त्याने 'कामलीला' हें पुस्तक प्रसिद्ध केलें होतें. पुस्तकांत संभोगासनांचे निरनिराळे फोटो होते. कोर्टाने मत दिलें कीं अश्लीलता या शब्दाची कायद्यांत व्याख्या नाही. पण ऑक्सफर्ड व वेब्स्टर शब्दकोशांप्रमाणें अशुद्ध अथवा विकृत विचारांना उद्दीपक व विनयशीलता आणि सभ्यता यांना मारक असें जें कांही तें अश्लील होय. या केसमध्ये बचाव असा होता कीं अशा तऱ्हेचें लिखाण पुष्कळ ठिकाणी प्रसिद्ध झालेलें आहे. व तसा पुरावा सादर करण्यांत आला. पण हा बचाव कोर्टाने मान्य केला नाही. ( १९५३ क्रि. लॉ. ज. ७६३ )

१९५४ सालीं म्हैसूर कोर्टांत बाळकृष्णय्या व मलप्पा न्यायमूर्तींसमोर खटला चालला. आरोपी राममूर्ती हा 'कामकला' मासिकाचा संपादक होता. या मासिकाच्या निरनिराळ्या अंकांतून लैंगिक रोग व उपचार यांविषयीं अश्लील लिखाण आलें होतें. आरोपीने एक डॉक्टर व एक साहित्यिक असे साक्षीदार उभे केले. डॉक्टरने सांगितलें कीं लिहिलेला मजकूर अश्लील नसून वैद्यकीय विद्यार्थ्यांनाही उपयुक्त आहे. साहित्यिकाने सांगितलें कीं तरुणींच्या हातांत असलें लिखाण देण्यास कांही हरकत नाही. कोर्टाने ठरविलें कीं साक्षीदारांना सर्व दोषार्ह भाग न दाखविता प्रश्न विचारण्यांत आले. शिवाय कोर्टाला स्वतःचें असें कांही मत आहे. अश्लीलतेच्या कल्पना भिन्न काळीं व भिन्न देशांत निरनिराळ्या आहेत. एकच मोजमाप कायमचें असें नाही. लैंगिक ज्ञानाबद्दल प्रत्येक जिज्ञासूला कुतूहल असणें स्वाभाविक आहे. पण त्या कुतूहलाचा गैर वापर करण्याकरता दोषार्ह लिखाण करणें हा गुन्हा आहे. हिक्लीन केसमधील तत्त्व हें आधारभूत मानण्यास हरकत नाही. परिणाम सर्वसाधारण माणसाच्या मनावर काय होतो तें पहाणें आवश्यक आहे. अपवादात्मक व्यक्ती उपयोगाच्या नाहीत. या केसमधील आरोपीना तांत्रिक मुद्द्यावर म्हणजे चार्ज बरोबर केला नव्हता या मुद्द्यावर निर्दोषी ठरविण्यांत आलें, पण लिखाण अश्लील आहे असेंही ठरविलें गेलें. ( १९५४ क्रि. लॉ. ज. १६२२ )

याच साली म्हणजे १९५४ साली मुंबई हायकोर्टांत बावडेकर व चैनानी न्यायमूर्तीसमोर एक खटला चालला. 'दांपत्य रहस्य' हें पुस्तक 'एलीस व मार्टीन कंपनीच्या मालकांनी प्रसिद्ध केलें होतें. पुस्तक फक्त विवाहितांसाठीच व त्याप्रमाणें प्रतिज्ञापत्रक घेऊन पुस्तक देण्यांत येई. या पुस्तकांत संभोगासनांचे फोटो व इतर मजकूर होता.

कोर्टाने ठरविलें कीं लैंगिक विषय हा अश्लील नव्हे. पण तो विषय हाताळण्यासाठी विकृत मनोवृत्तीस उद्दीपक अशी भाषा वापरली असेल तर लिखाण अश्लील होईल. सर्वसाधारण माणसांवर काय परिणाम होतो तें पहाणे आवश्यक आहे. कोर्टाने आक्षिप्त लिखाण अश्लील ठरविलें. [ ५७ बॉंबे लॉ रिपोर्टर ९५२ ]

१९५५ साली पंजाब हायकोर्टांत दुलात व बिशन नरेन न्यायमूर्तींसमोर खटला चालला. लुधियाना येथे 'मुनव्वर' नांवाचें मासिक आरोपी दीनानाथ प्रसिद्ध करीत असे. लैंगिक विषय व त्यासंबंधी गोष्टी असा मजकूर या मासिकाच्या अंकात होता. हिक्लीन केसमधील तत्त्व लावण्यात आलें आणि मजकुराची भाषा सौम्य व उद्दीपक नाही, या सदराखाली लिखाण आक्षेपार्ह नाही असें ठरविण्यात आलें. [ १९५६ क्रि. लॉ. ज. ४१५ ]

१९५६ साली मुंबई हायकोर्टांत एक खटला चालला. तो खटला परत 'दांपत्यरहस्य' पुस्तकाविषयी व न्या. बावडेकर व चैनानींसमोर चालला. यांत दोन्ही न्यायमूर्तांत मतभेद झाला व शेवटी प्रकरण न्या. तेंडुलकरांकडे गेलें. त्यांनी न्या. बावडेकरांसारखा निकाल दिला. व आरोपीना निर्दोषी ठरविलें. या पुस्तकांत जीं चित्रें होतीं त्यासारखीं इतरत्र आहेत, हा बचाव कोर्टाने मान्य केला नाही. हिक्लीन तत्त्व मान्य केलें पण त्याबरोबरच स्टेपल जजांनी सांगितल्याप्रमाणे चालू परिस्थितींत बदलता दृष्टिकोण लक्षात घेऊन श्लील-अश्लील याचा निर्णय करावा असें प्रतिपादन केलें. फक्त एखादा दुसरा भाग अश्लील मानला तर सबंध पुस्तक आक्षेपार्ह होत नाही. पण त्या भागाने लोकांचीं मनें विकृत होत असतील तर मात्र सर्व पुस्तक आक्षेपार्ह होईल. अश्लीलतेच्या कल्पना सर्व काली व सर्व देशात एकाच स्वरूपाच्या नाहीत. पुस्तकांतील वर्णन जर अश्लील नसेल तर पुस्तकाच्या स्पष्टीकरणार्थ दिलेलीं चित्रें अश्लील होऊ शकणार नाहीत. सर्व आनुषंगिक गोष्टींचा साकल्याने विचार करणे आवश्यक आहे. [ क्रिमिनल अपील ३७०-१९५६ ]

निकाल ३–१२–५६

१९५८ साली मद्रास हायकोर्टांत सोमसुंदरम् न्यायमूर्तींसमोर खटला चालला. सभापती हा आरोपी तामीळ साप्ताहिक 'सिनेमा नेसन'चा संपादक. या साप्ताहिकात कांही सिनेमा नट्यांचीं कुलंगडीं काढलीं होतीं. कोर्टाने ठरविलें कीं लिखाण सदभिरुचीस मारक असलें अथवा असभ्य असलें तरी तें अश्लील असतेच असे नाही. या साप्ताहिकांतील लिखाण फार तर अब्रुनुकसानीकारक होईल पण अश्लील नव्हे. मात्र प्रत्येक अश्लील लिखाण सदभिरुचीस मारक व असभ्य असतें यांत संशय नाही.

१९५९ साली अलाहाबाद हायकोर्टांत रॉय व सहाई या न्यायमूर्तींसमोर खटला चालला. ठाकूरप्रसाद व रामलगन हे दोन आरोपी. "असली कोकशास्त्र" हें पुस्तक आरोपीनी प्रसिद्ध केलें. हिंदी भाषेंत मजकूर असून कव्हर चित्र एका नग्न स्त्रीचें व किंमत ४ रुपये. या पुस्तकात लैंगिक विषय व संभोगाचे निरनिराळे प्रकार याविषयी माहिती होती. कोर्टाने हिक्लीन केसमधील तत्त्व लागू केलें. स्वल्प किंमत, उद्दीपक भाषा वगैरे बाबी लक्षात घेऊन

पुस्तक अश्लील ठरविण्यात आलें. या केसमध्ये बचाव असा होता कीं लेखक ख्यातनाम आहे. आणि शैली सहज समजण्याजोगी नाही; पण हा बचाव मान्य करण्यात आला नाही. ( १९९५ क्रि. लॉ. ज. ९ )

या वर्षी म्हणजे १९६१ सालीं कलकत्ता हायकोर्टात मुखर्जी व भट्टाचार्य या न्यायमूर्तीसमोर खटला चालला. प्रीय व मोहनलाल हे आरोपी. यानी तीन पुस्तकें 'Dark urge', 'Shame of Mary Quinn' आणि 'Find me in Fire' प्रसिद्ध केलीं. पहिल्या पुस्तकात एका विकृत माणसाने संभोगाचे वेळी बायकांवर केलेले क्रूर प्रकार, दुसऱ्या पुस्तकात बहीण भावाचा लैंगिक संबंध आणि तिसऱ्या पुस्तकात एका शिपायाचे लैंगिक संबंध या सर्वांचें वर्णन होतें. कोर्टाने ठरविलें कीं पुस्तक अश्लील असें ठरलें म्हणजे त्या इसमाचा हेतू गुन्हा करण्याचा होता हें सिद्ध होतें. यांत हेतूचा प्रश्न नाही. हिक्लीन केसचें तत्त्व आजही लागू करण्यास कांही हरकत नाही. आपल्या हिंदुस्थानातील कोर्टाचे जे निवाडे आहेत त्यांचा सारांश वरीलप्रमाणे आहे. [ १९६१ कलकत्ता १७७ ]

इंग्लिश कोर्टाचे कांही निवाडे सांगितलेच आहेत. त्याच संदर्भात आणखी तीन निवाडे सांगणे आवश्यक आहे. स्कॉटलंडमध्ये मॅक्गोवन विरुद्ध लँगम्यूर या केसमध्ये आरोपीने कांही फोटो विकण्यासाठी ठेवले होते. ते अश्लील होते पण तशाच तऱ्हेचे फोटो सार्वजनिक म्युझियम अथवा पब्लिक गॅलरीमध्ये लावलेले होते. कोर्टाने ठरविलें कीं, कोणत्या परिस्थितीत फोटो विकावयास ठेवले आहेत तें पाहून आरोपीस दोषी ठरविता येतें. पब्लिक गॅलरीमध्ये फोटो आहेत हा बचाव पुरेसा नाही.

रेक्स विरुद्ध स्ट्रोल या केसमध्ये आरोपीने नेकटाय विकावयास ठेवल्या होत्या. या नेकटायवर स्त्रियांचीं चित्रें स्तन उघडे असलेलीं होतीं. कोर्टाने ठरविलें कीं मासिकांत व वृत्तपत्रांत आणि म्युझियममध्ये अशीं दृश्यें नेहमी दिसू शकतात. त्यामुळे आरोपी दोषी होत नाही.

डी. एच् लॉरेन्स या इंग्लीश लेखकाने १९२८ साली Lady Chatterley's Lover ही कादंबरी लिहिली. या कादंबरीचें कथानक म्हणजे कॉन्स्टंस नांवाची बाई एका बॅरोनेटशी–Clifford Chatterley कडे लग्न लावते. हा इसम पहिल्या युद्धात जखमी होतो व त्यानंतर संभोगसुख घेण्यास अपात्र होतो. अशा परिस्थितीत या बाईचें मॅलोर्स नांवाच्या त्याच्या एका नोकरावर प्रेम जडतें. या प्रेमप्रसंगांचें आणि विशेषतः संभोगप्रसंगांचें अगदी उघडें नागडें वर्णन ठिकठिकाणी लेखकाने केलेलें आहे. सेंसॉर नियमाखाली हें पुस्तक इंग्लंडमध्ये अश्लील उतारे रद्द करून तयार झालेल्या आवृत्तीच्या स्वरूपात मिळत असे. आता अगदी अलीकडेच या पुस्तकासंबंधी इग्लंडमध्ये खटला झाला व ज्यूरीने मूळ पुस्तक अश्लील अथवा दोषार्ह म्हणून ठरविलें नाही. या पुस्तकाचें साहित्य या दृष्टीने मूल्य महत्त्वाचें आहे. लेखकाचा प्रधान हेतू सध्याच्या यांत्रिक युगांत माणसांमध्ये किती निराशा पसरली आहे, आणि विशेषतः वरचा वर्ग कसा

दुर्वल झाला आहे आणि स्त्रीपुरुषसंवंध कसे कृत्रिम व आरोग्याला अहितकारक झाले आहेत हें सर्व वर्णन करणे हाच होय. त्या दृष्टीने आंत आलेले अश्लील संदर्भ कथानकास आवश्यक आहेत असा सर्वांगीण विचार करून ज्यूरीने हा निकाल दिला आहे.

हिक्लीन केसमध्ये विकारांचें उद्दीपन हें मोजमाप ठरविलें गेलें. पण स्टेपल जज्जने तात्कालिक परिस्थिती आणि पुस्तकाचा प्रधान हेतू लक्षात घेतला पाहिजे असें मत-प्रदर्शन केलें. या दोहोंची सांगड १९५९ सालीं पार्लमेंटने इंग्लंडमध्ये जो कायदा पास केला त्या कायद्यात घातली गेली आहे. व या दृष्टीने ज्यूरीने जो निर्णय दिला तो चुकीचा दिसत नाही.

अमेरिकेमध्येही या पुस्तकाच्या अश्लीलतेसंबंधी प्रश्न न्यूयॉर्क येथे जज्ज ब्रायन पुढे निघाला होता. अमेरिकन कायद्यात जर एकादें पुस्तक अश्लील असेल तर तें पोस्टांतून पाठविण्याची वंदी पोस्ट मास्टर जनरलला करता येते. त्याप्रमाणे ही बंदी करण्यात आली. तो प्रश्न पुढे जज्ज ब्रायनपुढे उपस्थित झाला.

जज्ज ब्रायनने अमेरिकेत झालेले दोन खटले आधारभूत धरले. एक म्हणजे युनायटेड स्टेट्स विरुद्ध युलीसिस व दुसरा म्हणजे रोथविरुद्ध युनायटेड स्टेट्स. या दोन्ही खटल्यात असें नमूद आहे कीं अश्लीलता ही भाषणस्वातंत्र्याच्या अथवा उच्चारस्वातंत्र्याच्या हक्कामध्ये अंतर्भूत नाही. तत्कालिक परिस्थितीत सर्वसाधारण माणसावर मुख्यत्वेकरून विकारोद्दीपन करणारें लिखाण अथवा वस्तू अश्लील होय. एखादें लिखाण जर प्रामाणिक-पणे व कळकळीने लिहिलेलें असेल तर कांही ठिकाणी अश्लील भाग आहेत या मुद्द्यावरूनच तें लिखाण आक्षेपार्ह होत नाही. लिखाणाचा साकल्याने विचार करून त्याचा प्रधान हेतू समजावून घेतला पाहिजे.

जज्ज ब्रायन याने वरील तत्त्व लावून Lady Chatterley's Lover ही कादंवरी अश्लील नाही असें ठरविलें.

महत्त्वाची गोष्ट म्हणजे याच पुस्तकावर चीफ प्रेसिडेंसी मॅजिस्ट्रेटसमोर इकडे मुंबईंत खटला झाला. आरोपी गोकुलजी शामजी, रामजी उदेशी, जमनादास शामजी व वल्लभदास शामजी असे चौघे जण आहेत. त्यांचेकडे लेडी चॅटर्लीज लव्हर मूळ स्वरूपात सापडली. ती विक्रीसाठी होती. म्हणून फौजदारी कायद्याच्या २९२ कलमाखाली खटला भरला गेला. मॅजिस्ट्रेटने हिक्लीन केसचें तत्त्व लावून आरोपींना दोषी ठरविलें आहे. सध्या हायकोर्टांत त्याबद्दल अपील झालें आहे. आतापर्यंतच्या सर्व विवेचनाचा सारांश असाः-

इंग्लंडमध्ये व पाश्चात्य देशांत कामोत्तेजक व अशुद्ध मनोवृत्तींना उद्दीपन करणारें लिखाण अश्लील ठरविलें गेलें आहे. पूर्वी लिखाणात एखादा भाग जरी अश्लील असेल तर सर्व लिखाण अश्लील ठरविण्याकडे प्रवृत्ती असे. आता सर्व लिखाणाचा साकल्याने विचार करून प्रधान हेतू काय आहे तें पहाण्याकडे कल आहे. शास्त्रीय, कलात्मक व साहित्यिक मूल्यें असलेल्या कृती त्यांतील कांही भाग अश्लील म्हणून दोषार्ह होणार नाही.

आपल्याकडे हिक्लीन केसचें तत्त्व आजही आधारभूत आहे. कोर्टाचें मताधिक्य असें आहे कीं एखादा भाग जरी अश्लील असेल तर सबंध लिखाण दोषास्पद ठरविण्यात येईल.

आपल्याकडे अश्लील लिखाण म्हणून आरोप आला तर बचाव म्हणजे २९२ कलमात सांगितलेले अपवाद दाखविले पाहिजेत. हे अपवाद नसतील तर हिक्लीन केसचें तत्त्व लागत नाही. म्हणजे लिखाणाने सर्वसाधारण माणसाचें मन उद्दीपित होत नाही असा पुरावा केला पाहिजे. हा पुरावा करताना तज्ज्ञांच्या साक्षी देता येतात. नोकराने केलेल्या गुन्ह्या-बद्दल मालक जबाबदार नाही.

लिखाण अश्लील असेल तर हेतू चांगला असें म्हणून भागत नाही. लेखक प्रख्यात आहे अथवा प्राचीन साहित्याचा अनुवाद आहे अथवा धर्मग्रंथातले उतारे आहेत असाही बचाव उपयोगी पडत नाही. आपल्या लिखाणासारखे दुसरे लिखाण समाजात वावरत आहे हाही बचाव उपयोगी नाही. इतरांनी असें लिखाण लिहिलें त्याला उत्तर म्हणून आपणास हें लिखाण करावें लागलें, हाही बचाव उपयोगी नाही. हे सर्व बचाव शिक्षा कमी करण्याकडे उपयोगी पडतील. अश्लीलता एकाच मोजमापाने मापली जात नाही आणि भाषण अथवा लेखनस्वातंत्र्याच्या नांवाखाली पचली जात नाही. खाली दिलेले आठ नियम नेहमी लक्षात ठेवले पाहिजेत.

**नियम (१)** मोजमाप :—विकारांना उद्दीपित करणारें लिखाण अश्लील होय. सर्व-साधारण माणसाचें मत विचारात घेतलें पाहिजे.

**नियम (२)** कलाकृती :—देवालय अथवा रथांवरील शिल्पकृती अथवा चित्रें अश्लील नाहीत. नग्न चित्र फक्त नग्न या सदराखाली अश्लील नव्हे. कलाकाराने कोणत्या परिस्थितीत कोणत्या हेतूने कलाकृती काढली आहे व तिचें आकर्षण कोणत्या समाजास होईल हा सर्व परिणाम लक्षात घेऊन अश्लील अथवा शिष्टसंमत असा शेरा देता येईल.

**नियम (३)** वैद्यकीय ग्रंथ :—सामान्यपणे अश्लील संदर्भ असले तरी असल्या ग्रंथाचा शास्त्रीय उपयोग असल्याने हे ग्रंथ अश्लील नव्हेत पण वैद्यकीय ग्रंथ या घुरख्याखाली सामान्य माणसास उद्दीपित करण्याकरिताच लिखाण असेल तर तें आक्षेपार्ह आहे.

**नियम (४)** लैंगिक विषय :—या विषयांचें शास्त्रीय ज्ञान देण्याकरता लिहिलेले ग्रंथ अश्लील नव्हेत. पण कामोद्दीपन करण्यासाठी, लैंगिक कुतूहलाचा गैर वापर करण्यासाठी झालेलें लिखाण आक्षेपार्ह आहे.

**नियम (५)** धर्मग्रंथ :—यांत अश्लील संदर्भ असले तरी हे ग्रंथ अश्लील नव्हेत, पण धार्मिक वादविवाद खेळण्यासाठी केलेलं अश्लील लिखाण किंवा धर्मग्रंथातले अश्लील उतारेच तेवढे काढून ते प्रसिद्ध करण्यासाठी केलेलें लिखाण दोषार्ह आहे.

**नियम ( ६ )** प्राचीन साहित्यकृती अश्लील नव्हेत, पण त्याचा अनुवाद अश्लील ठरण्याचा संभव आहे.

**नियम ( ७ )** वृत्तांतः—केसचे वृत्तांत ज्यांत अश्लील भागांचें पुनर्मुद्रण आहे ते सर्व आक्षेपार्ह आहेत.

**नियम ( ८ )** हेतू चांगला आहे, लेखक प्रख्यात आहे, अशाच तऱ्हेचें लिखाण समाजात प्रसिद्ध झालें आहे, या लिखाणात फक्त काही भाग अश्लील आहे, शैली सर्वसाधारण माणसास न समजेल अशी आहे, अथवा किंमत फार ठेविली गेली आहे, वगैरे कोणत्याहि तऱ्हेचा बचाव चालणार नाही. पुस्तक सर्वांना मिळण्यासारखें नाही अथवा डॉक्टर वकील मानसशास्त्रवेत्ते वगैरे ठराविक लोकांसाठी हें पुस्तक प्रसिद्ध करणे आवश्यक होतें. हा बचाव कोर्टसंमत होऊ शकेल. अश्लीलता ही कायद्याचा प्रश्न नसून मुख्यतः पुराव्याचा प्रश्न आहे व साकल्याने परिणाम काय होणार हें पाहूनच अश्लीलतेचा निर्णय लावता येतो.

अश्लीलतेचा विचार करताना हा प्रश्न फक्त फौजदारी कायद्याच्या २९२ कलमाखालीच उद्भवला असें नाही. Press (objectionable matters) Act 1951 हा कायदा १९५१ साली पास झाला. त्या कायद्याप्रमाणे जर आक्षेपार्ह मजकूर असेल तर छापखान्यापासून अथवा वृत्तपत्राच्या मालकाकडून जामीन मागण्याचा सरकारास अधिकार आहे. अश्लील लिखाण हें 'आक्षेपार्ह मजकूर' या व्याख्येत समाविष्ट आहे. तेव्हा अश्लील काय व श्लील काय ते प्रश्न न्यायकोर्टांत या कायद्याखालीही उपस्थित झाले आहेत.

त्याचप्रमाणें पोस्टाचा कायदा Indian Post Office Act 1898 सन १८९८ मध्ये पास झाला. त्या कायद्याच्या कलम २० प्रमाणे कोणासही पोस्टांतून अश्लील पुस्तक अथवा अश्लील लिखाण पाठविण्याची बंदी आहे. त्या कलमाखालीही अश्लील आणि श्लील काय यासंबंधी न्यायकोर्टांत मुद्दे उपस्थित झाले आहेत. सर्व न्याय निवाड्यांची संक्षिप्त हकीगत व सारांश व त्यावरून निघणारे नियम यांचें वर्णन वर केलेच आहे.

55397

प्रा. गंगाधर गाडगीळ, एम्. ए.

# अश्लीलता व साहित्य

नियमन आणि स्वातंत्र्य या दोन तत्त्वांवर प्रत्येक समाजाची संघटना झालेली असते. समाज व्यक्तींचा बनलेला असतो आणि प्रत्येक व्यक्तीच्या काही निसर्गदत्त प्रेरणा असतात. या प्रेरणांना आविष्काराची संधी मिळणे आणि त्यांचें निदान काही प्रमाणात समाधान होणे व्यक्तीच्या आणि समाजाच्या अस्तित्वासाठी व विकासासाठी आवश्यक असतें. पूर्णपणे योजनाबद्ध स्वरूपांत या प्रेरणांचें समाधान करणे अशक्य दिसतें. त्यासाठी अगदी मर्यादित प्रमाणात का होईना पण स्वातंत्र्याची गरज असते. हें स्वातंत्र्य जसें आवश्यक असतें तसेंच प्रेरणांचें नियमन करणेही जरूर असतें. प्रेरणांचें असें नियमन केलें नाही तर व्यक्तीव्यक्तींत बखेडे माजतील, रक्तपात होईल, समाजांत अराजक माजेल, अर्थोत्पादन, परचक्रापासून संरक्षण, विद्याकलादिकांचा विकास वगैरे गोष्टी अशक्य होतील.

खरे म्हणजे समाजालाच नव्हे तर प्रत्येक व्यक्तीला देखील स्वतःच्या प्रेरणांचें नियमन करावें लागतें. कारण ह्या प्रेरणा पुष्कळदा परस्परविरोधी असतात, परस्परांशी स्पर्धा करणाऱ्या असतात. त्या गुण्यागोविंदाने एकत्र नांदायच्या असतील, त्यांपैकी प्रत्येकीचें आजच नव्हे तर पुढेही योग्य त्या प्रमाणात समाधान व्हायचें असेल व त्या परस्परपूरक ठरायच्या असतील तर त्यांचें नियमन करणें अपरिहार्य आहे. नव्हे प्रत्येक प्राणी उपजत बुद्धीनेच त्यांचें असें कांही प्रमाणात नियमन करतो म्हणून तो जिवंत तरी राहू शकतो. पण प्रत्येक व्यक्तीने केलेल्या आपल्या प्रेरणांच्या नियमनाचा प्रश्न येथे अप्रस्तुत आहे, म्हणून त्यांचा येथे फक्त उल्लेख करून पुढे जायला हवें.

प्रत्येक समाजांत जरी नियमन व स्वातंत्र्य या दोन्ही गोष्टी असल्या तरी काही समाजांच्या संघटनेत स्वातंत्र्याला केंद्रस्थान असतें तर काही समाज नियमनाधिष्ठित असतात. नियमनाधिष्ठित समाजात सामाजिक हिताला प्राधान्य असतें आणि व्यक्तीच्या हितापेक्षा समाजाचें हित हें अधिक महत्त्वाचें असें प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्षरीत्या मानलें जातें. त्यामुळे व्यक्तीकडे समाजहिताचें साधन या दृष्टीने पाहिलें जातें. आणि समाजाच्या हितानुसार व्यक्तीच्या जीवनाचें नियमन केलें जातें. पुष्कळदा असा युक्तिवाद केला जातो कीं समाजाचें हित आणि व्यक्तीचें हित यांत मुळी कधीही विरोध नसतोच. तीं एकरूपच असतात. तेव्हा समाजाचें हित साधलें कीं व्यक्तीचें हित आपोआपच साधतें. म्हणून समाजहिताच्या दृष्टीने व्यक्तीच्या जीवनाचें जें नियमन केलें जातें ते व्यक्तीला जाचक नसून हितकारकच असतें. समाजाचें हित कशात आहे तें ठरविण्याचा अधिकार व त्यासाठी लागणारें शहाणपण सर्व व्यक्तींच्या ठिकाणी आहे असें या नियमनाधिष्ठित समाजात मानलें जात नाही. अशा प्रकारच्या समाजांचा ( म्हणजे त्यांतील अधिकारारूढ वर्गांचा ) बहुधा एखादा धर्मग्रंथ असतो अगर एखादें तत्त्वज्ञान असतें. आणि समाजाचें हित कशांत आहे, तें त्या धर्मग्रंथाच्या वा तत्त्वज्ञानाच्या आधारें ठरवलें जातें. ह्या धर्मग्रंथाचा अगर तत्त्वज्ञानाचा अर्थ लावण्याचें किंवा जीवनातल्या प्रश्नांना त्यांतील तत्त्वें लागू करण्याचें काम त्या समाजातील अधिकारारूढ वर्ग करतो. आणि त्या वर्गाच्याच ठिकाणी हें कार्य करण्याची पात्रता आहे असें मानलें जातें. आणि म्हणून या समाजातील अधिकारारूढ वर्ग या समाजातील जीवनाचें सार्वांगीण नियमन करतो.

समाजाचें हित कशात आहे हें या समाजापुरतें निश्चित असल्यामुळे व व्यक्तीच्या सुखासाठी वा विकासासाठी स्वातंत्र्य आवश्यक आहे अशी भूमिका नसल्यामुळे, या समाजाच्या जीवनात लेखनस्वातंत्र्य अगर भाषणस्वातंत्र्य यांना स्थानच नसतें. लेखनाचें व भाषणाचें नियंत्रण ही या समाजाच्या जीवनातील नित्याची गोष्ट असते. सहाजिकच या समाजातील नियंत्रणांचा प्रश्न अश्लीलतेपुरता मर्यादित नसतो.

अशा प्रकारच्या समाजात अश्लील साहित्याबद्दल कोणती भूमिका स्वीकारली जाते, त्याचा विस्ताराने अभ्यास करता येण्यासारखा आहे. पण तो या लेखात करण्याचा माझा हेतु नाही. याचें एक कारण म्हणजे स्थलाभाव; दुसरें असें कीं आपला भारतीय समाज स्वातंत्र्याधिष्ठित आहे. आणि म्हणून अशा समाजाने अश्लीलतेबद्दल कोणती भूमिका घ्यावी याचा अभ्यास करणेच आपल्या दृष्टीने अधिक उपयुक्त आहे.

स्वातंत्र्याधिष्ठित समाजात व्यक्तिस्वातंत्र्य हें मूलभूत मूल्य मानलें जातें. प्रत्येक व्यक्तीला स्वतःचें हित अधिकात अधिक साधण्याची संधी देणे हें या प्रकारच्या समाजाचें उद्दिष्ट असतें. प्रत्येक व्यक्तीची प्रकृति इतरांपेक्षां भिन्न असते. आणि तिचीं जीवनविषयक मूल्यें देखील वेगळीं असण्याची शक्यता असते. सहाजिकच प्रत्येक व्यक्तीचें हित वेगळ्या प्रकारे साध्य होऊ शकतें आणि तें कोणत्याप्रकारें साध्य होईल तें ठरविणें व तसें तें साध्य

करणे ह्या गोष्टी त्या व्यक्तीला जितक्या उत्तम प्रकारे करता येतील तितक्या उत्तम प्रकारे इतर कोणालाही त्या करता येणे शक्य नसतें आणि समजा जरी कोणत्याही व्यक्तीला आपलें हित कशांत आहे तें नीटसें समजलें नाही, अगर तें साध्य करून घेता आलें नाही तरी स्वतंत्रपणे स्वतःचें हित शोधण्यात जो आनंद आहे तो अमोलिक आहे आणि तो कोणत्याही व्यक्तीपासून हिरावून घेणे इष्ट नाही. मग त्यामुळे समाजाचें व व्यक्तीचें पुष्कळसें नुकसान झालें तरी चालेल. पुन्हा एका व्यक्तीचें हित कशात आहे तें ठरविण्याचा अधिकार दुसऱ्या एखाद्या व्यक्तीस किंवा गटास दिला कीं त्याचा दुरुपयोग होण्याची शक्यता बरीच असते. म्हणून व्यक्तीला अधिकात अधिक स्वातंत्र्य देणे हें स्वातंत्र्याधिष्ठित समाजाच्या संघटनेचें मूलभूत तत्त्व असतें.

पुन्हा व्यक्तिस्वातंत्र्य हें समाजाच्या सर्वांगीण विकासाला पोषक असतें. स्वातंत्र्याच्या वातावरणात व्यक्तींच्या कर्तृत्वाला बहर येतो. स्पर्धेने व आपखुषीने केलेल्या सहकार्यामुळे त्याला अधिकच जोम चढतो. आणि त्यामुळे समाजाचें सामर्थ्य, धन, विद्या, कला, व संस्कृती या सर्वांचाच विकास होतो. या विकासाचें स्वरुप योजनाबद्ध व नियंत्रित नसल्यामुळे थोडी उधळमाधळ होणे अगर त्या विकासाला अनिष्ट वळण लागणे अगदी शक्य असतें. पण समाजजीवन नियंत्रित केल्यामुळे जे दुष्परिणाम होतात त्या मानाने हे तोटे काहीच नव्हेत.

स्वातंत्र्याधिष्ठित समाज जरी झाला तरी त्यांत नियमन हें असावें लागतेंच. कारण नियमनाशिवाय सामाजिक जीवन सुरळितपणे चालणे अशक्य असतें. पण नियमन जरी आवश्यक असलें तरी तें कमीत कमी असावें व जें असेल तें जाचक नसावें असा प्रयत्न स्वातंत्र्याधिष्ठित समाजात केला जातो. या समाजात प्रत्येक व्यक्तीला कांही मूलभूत हक्क दिलेले असतात. आणि समाजाचें अस्तित्वच जोपर्यंत धोक्यात आलेलें नसतें तोपर्यंत या हक्कांना जराही धक्का लावला जात नाही. या हक्कांच्या परिघाबाहेरचें जें व्यक्तीचें जीवन असतें तें समाज नियन्त्रित करीत असतो. परंतु हें नियमन समाजातील व्यक्तींच्या बहुमतानुसार होत असतें. म्हणजे तें जाचक झालेंच तर समाजातील अल्पसंख्य व्यक्तींना होतें. पुन्हा या समाजात असा एक संकेत असतो कीं ज्याचें बहुमत असेल त्यांनी अल्पसंख्यांच्या भूमिकेकडे सहानुभूतीने पाहिलें पाहिजे. अल्पसंख्यांचा ज्या गोष्टींना तीव्र व कडवा विरोध असेल त्या गोष्टी बहुमताच्या जोरावर केल्या जाऊ नयेत. ह्या संकेताचें पालन झालें तर सामाजिक नियमन व्यक्तींना जाचक ठरण्याची शक्यता पुष्कळच कमी होते.

भाषणस्वातंत्र्य व लेखनस्वातंत्र्य हे स्वातंत्र्याधिष्ठित समाजात प्रत्येक व्यक्तीचे मूलभूत हक्क असतात. प्रत्येकाच्या व्यक्तिमत्वाच्या आविष्कारासाठी व विकासासाठी अशा प्रकारचें स्वातंत्र्य आवश्यक असतें. त्याचप्रमाणे सामाजिक जीवनाचें नियमन कोणत्या प्रकारे व्हावें याबाबतचें मत व्यक्त करण्यासाठी व त्याचा प्रभाव इतरांवर

पाहण्यासाठी आणि आपल्या कोणत्याही हक्काचें अतिक्रमण होत असल्यास त्याबद्दल तक्रार करण्यासाठी या स्वातंत्र्याची आवश्यकता असते. म्हणून हें स्वातंत्र्य अत्यंत मोलाचें समजलें जातें.

या स्वातंत्र्यावर बंधनें दोनच प्रकारचीं असतात. दुसऱ्या व्यक्तीची बदनामी ( टीका म्हणजे बदनामी नव्हे ) अगर त्याला पूज्य वाटणाऱ्या गोष्टींची नालस्ती ( टीका म्हणजे नालस्ती नव्हे ) करण्यासाठी या स्वातंत्र्याचा उपयोग करता येत नाही. दुसरें म्हणजे चालू समाजव्यवस्था बेकायदेशीरपणे उध्वस्त केली जावी यासाठी चिथावणी देण्यासाठी अगर समाजाने आत्मरक्षणाकरिता गुप्त ठेवलेली माहिती इतराना देण्यासाठी या स्वातंत्र्याचा उपयोग करता येत नाही.

याचा अर्थ असा नव्हे कीं चालू समाजव्यवस्था सदोष आहे, ती बदलली पाहिजे आणि क्रांतीच्या द्वारेच तें होऊ शकेल अशी विचारप्रणाली मांडण्यास स्वातंत्र्याधिष्ठित समाजात बंदी असते. कार्ल मार्क्सने अशी विचारप्रणाली मांडलेली आहे. आणि तशी त्याच्या पुस्तकांवर ( आणि तशाच इतर अनेक पुस्तकांवर ) या समाजात बंदी नाही. उलट त्याच्या पुस्तकांचा तेथे काळजीपूर्वक अभ्यास केला जातो. अशा समाजविघातक विचारांच्या प्रसारावर बंदी न घालण्यास अनेक कारणें असतात. एक तर हे विचार म्हणजे एका व्यक्तीचा आत्माविष्कार असतो. आणि त्याच्या मार्गांत शक्यतो अडथळा न आणणे हें स्वातंत्र्याधिष्ठित समाजाचें ब्रीद असतें. दुसरें असें कीं समाजाचें हित कशांत आहे अगर आदर्श समाजरचना कोणती याबद्दल निर्णायक सत्य आपल्याला गवसलें आहे अशी या समाजाची भूमिका नसते. ह्या गोष्टी विचारमंथनाने कळतात आणि वेळोवेळी त्याबावत समाजांतील व्यक्तींनी बहुमताने निर्णय द्यायचा असतो. जें आज समाजविघातक वाटत असतें तें उद्या समाजतारक देखील ठरू शकतें. ह्याबाबत समाजातील व्यक्तींनी योग्य तो निर्णय घ्यायचा असेल तर सर्वांनी सर्व प्रकारचे विचार अगदी मोकळेपणाने व्यक्त करणे आवश्यक असतें. म्हणून समाजविघातक वाटणारे विचार देखील व्यक्त करण्यास स्वातंत्र्य देणे हें स्वातंत्र्याधिष्ठित समाज स्वतःच्या हिताचें समजतो. कुठच्याही स्वातंत्र्याचा दुरुपयोग होणे शक्यच नव्हे तर अपरिहार्यही असतें. तेव्हा या उच्चारस्वातंत्र्याचा व लेखनस्वातंत्र्याचा दुरुपयोग स्वातंत्र्याधिष्ठित समाजात होत असतो. पण हा दुरुपयोग थांबविण्यासाठी तें स्वातंत्र्यच काढून घेणे हें अधिक समाजविघातक असतें. पुन्हा लेखनस्वातंत्र्याचा कोणी दुरुपयोग करू लागला तर ती गोष्ट इतरांच्या निदर्शनास आणून तिचा तीव्र निषेध करण्याचें स्वातंत्र्य इतर व्यक्तींना असतें. आणि त्याचा उपयोग करून समाजविघातक विचारांचा बंदोबस्त करता येतो. त्यासाठी त्यांच्या प्रसारावर बंदी घालण्याची आवश्यकता नाही.

उद्या सगळ्यांनी सशस्त्र उठाव करू या अशा प्रकारची चिथावणी देण्यासाठी जर कोणी लेखन वा भाषणस्वातंत्र्याचा उपयोग करू लागला तर त्यावर अगर तशाच प्रकारचे इतर विचार व्यक्त करणाऱ्यांवर काय तो कायदा आपली वक्रदृष्टि फिरवितो.

स्वातंत्र्याधिष्ठित समाज वैचारिक साहित्याबद्दल जी भूमिका घेतो तीच ललितसाहित्या-बद्दलही घेतो. ललित साहित्यांत समाजविघातक विचार आहेत अगर समाजविघातक ठरतील अशा प्रसंगांचें वा घटनांचें (खून, व्यभिचार, चोऱ्या इत्यादिकांचें) चित्रण आहे, एवढ्यावरच त्या साहित्यावर बंदी घालण्यात येत नाही. एखाद्या कादंबरीत शेवटी सत्याचा, नीतीचा अगर सज्जनांचा जय झाला नाही अगर असत्य वगैरेंची निर्भर्त्सना केली नाही किंवा या गोष्टींची प्रशंसा केली म्हणून ती जप्त केली जात नाही. असें का केलें जात नाही याचें उत्तर वर वैचारिक साहित्याच्या संदर्भात दिलेलेंच आहे.

ललित लेखकावर बंधन असतें ते इतकेंच कीं त्याने कोणाची बदनामी करू नये व समाजविघातक कृत्यांना प्रत्यक्षपणे चिथावणी देऊं नये.

त्याच्यावर आणखीही एक बंधन असतें तें असें कीं त्याने अश्लील लिहू नये. यामागची भूमिका अशी दिसते कीं अश्लील साहित्य समाजविघातक असतें. प्रस्थापित समाजव्यवस्था मोडून टाकण्यासाठी बेकायदेशीर गोष्ट करा अशी चिथावणी देण्याऱ्या लिखाणासारखें समाजविघातक असतें. कारण तें वाचकांची कामवासना अतिरिक्त प्रमाणात चेतवितें. त्यांच्या लैंगिक प्रेरणांना विकृत व गलिच्छ स्वरूप येतें. शिवाय सर्वसाधारणपणे सामाजिक जीवनात ज्या गोष्टींची सामान्यपणे वाच्यता केली जात नाही अगर जे शब्द चारचौघांत वापरले जात नाहीत त्यांचा उपयोग या साहित्यांत केला जातो. त्यामुळे समाजधारणेसाठी आवश्यक असलेले सभ्यपणाचे संकेत ढिले होतात.

अश्लीलतेचें व तिच्या परिणामांचें वर केलेलें वर्णन योग्य आहे कीं नाही? साहित्य अश्लील असू शकतें का व त्यावर अशा प्रकारचे निर्बंध घालणें योग्य आहे का? या निर्बंधामुळे व्यक्तिस्वातंत्र्याची व साहित्याची हानी होऊ नये म्हणून कोणते उपाय योजा-यला हवेत? या साऱ्या प्रश्नांचीं उत्तरें देण्यासाठी लैंगिक प्रेरणेचें नियमन समाज कां व कसें करतो तें आपण पहिल्या प्रथम समजून घ्यायला हवें.

लैंगिक प्रेरणा ही माणसाची अगदी मूलभूत आणि प्रभावी प्रेरणा आहे. मानववंशाचें अस्तित्वच तिच्यावर अवलंबून आहे. व म्हणूनच निसर्गाने तिला इतकी प्रभावी केली असावी. अशा प्रेरणेचें नियमन समाजाने विशेष काळजीपूर्वक करावें हें सहाजिकच आहे. हें नियमन दोन हेतूंनी केलें जातें. एक असा कीं ह्या प्रेरणेची जोपासना होऊन वंशवर्ध-नाचें आणि जीवन अधिक सुखकारक व अर्थपूर्ण करण्याचें कार्य तिने करावें. दुसरा हेतु असा कीं या प्रेरणेने समाजविघातक स्वरूप धारण करू नये.

या हेतूंपैकीं दुसऱ्या हेतूकडे आपण अधिक लक्ष पुरवीत असलों तरी पहिला देखील तितकाच महत्त्वाचा आहे. आपण काळजीपूर्वक पाहिलें तर आपल्याला असें आढळून येईल. आपल्या समाजातील अनेक चालीरीतींचा व संकेतांचा उगम या पहिल्या हेतूंत आहे. मात्र एखाद्या समाजांत ब्रह्मचर्याला अवास्तव महत्त्व प्राप्त झालें व कामवासना ही

पापमय आहे अशी भूमिका त्या समाजाने घेतली तर या हेतूकडे दुर्लक्ष होतें. कामवासना दडपून टाकण्याचाच प्रयत्न हा समाज करू लागतो. त्यामुळे अर्थात ती दडपली जात नाही. तिला विकृत स्वरूप मात्र प्राप्त होतें. आपल्या भारतीय किंवा खरें म्हणजे हिंदु समाजावर कामवासना पापमय आहे, अशा विचारसरणीचा बराच पगडा आहे. आणि त्यामुळे लैंगिक प्रेरणेकडे आपण अतिरिक्त भीतीने आणि संशयाने पहात असतों. ती दृष्टिआड ठेवण्याचा प्रयत्न करीत असतों.

असो. कोणताही समाज लैंगिक प्रेरणेचें नियमन खालील पद्धतींनी करितो.

( १ ) अल्पवयी मुलामुलींनी कामवासना कृत्रिमरीत्या जागृत करणे व प्रौढांनी आपल्या कामेच्छेच्या पूर्तीसाठी त्यांच्याशी शरीरसंबंध ठेवणे इष्ट नसतें. म्हणून ह्या गोष्टींना समाजात बंदी असते.

( २ ) तारुण्यात ज्यांनी नुकतेंच पदार्पण केलें आहे अशा मुलींना तावडतोब मातृत्व प्राप्त होणे व नवतरुणांची कामवासना जागृत होतांच तिची पूर्ती होणे त्यांच्या शारीरिक व मानसिक विकासाच्या दृष्टीने इष्ट नसतें. असें झालें तर लहान मुलांची आबाळ होण्याची, वैवाहिक जीवनांत असंतोष निर्माण होण्याची फारच शक्यता असते. पुन्हा कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची वगैरे जबाबदारी तरुण माणसांवर फार लौकर पडली तर त्यामुळे त्यांच्या जीवनाच्या इतर अंगांच्या विकासांत बहुधा अडथळा निर्माण होतो. म्हणून अल्पवयीन तरुणतरुणींना विवाह करण्यास बंदी असते.

( ३ ) रक्ताचे संबंध असलेल्या व एकाच कुटुंबांत रहाणाऱ्या व्यक्तींना ( त्यांतील विवाहित व्यक्ती सोडल्यास ) एकमेकांविषयी लैंगिक आकर्षण वाटणें इष्ट नसतें. मुलाला आईविषयी, बापाला मुलीविषयी, भावाला बहिणीविषयी व एकत्र कुटुंबांतील दिराला भावजयीविषयी आकर्षण वाटू लागलें तर कुटुंबात भयंकर कलह माजतील आणि सुखाने व एकोप्याने कौटुंबिक जीवन जगणे अशक्य होईल. पुन्हा रक्ताचे संबंध असलेल्या व्यक्तींना एकमेकांपासून झालेली प्रजा निकृष्ट असते असा समज आहे. ( ह्यांना शास्त्रीय आधार आहे असें म्हणतात. पण मला त्याबद्दल निश्चित माहिती नाही. ) म्हणून अशा व्यक्तींना परस्परांविषयी आकर्षण देखील वाटू नये असें वातावरण समाजांत निर्माण केलेलें असतें. या बाबतींत कायदे व नियम असतात ते अर्थात वेगळेच.

( ४ ) भयंकर स्वरूपाचे सांसर्गिक व आनुवंशिक रोग ज्यांना झाले असतील त्यांनी प्रजोत्पादन करणे इष्ट नसतें. म्हणून या गोष्टीला समाज बंदी करतो.

( ५ ) स्त्रीला अगर पुरुषाला आकर्षित करण्याबाबत जर अनिर्बंधपणे स्पर्धा चालू दिली तर समाजात सारखे कलह होत राहतील. समाजाचा गाडा सुरळीतपणे चालणार नाही, म्हणून अविवाहित असेतोंच अशा स्पर्धेला वाव दिला जातो. ( तो देखील कांही समाजात. ) पुन्हा ज्यांना परस्परांशी लैंगिक संबंध ठेवायचे असतील त्यांनी विवाहाचें

बंधन स्वीकारलें पाहिजे असा समाजाचा दंडक असतो. विवाहिताला परस्त्रीशी किंवा परपुरुषाशी संबंध ठेवण्याची परवानगी नसते.

( ६ ) आधुनिक समाजात एका पुरुषाला अनेक स्त्रियांशी अगर एका स्त्रीला अनेक पुरुषांशी विवाह करून लैंगिक संबंध ठेवायला परवानगी नसते. कारण अशा प्रकारचे विवाह व्यक्तीच्या प्रतिष्ठेला व स्वातंत्र्याला बाधक असतात. त्यामुळे वैवाहिक जीवनाला हिणकसपणा येतो.

( ७ ) विवाहबंधन सहजासहजी तोडायला कोणताही समाज परवानगी देत नाही. लैंगिक जीवनांतील जोडीदार वारंवार बदलणे समाजधारणेच्या व कौटुंबिक सौख्याच्या दृष्टीने हितकारक समजलें जात नाही.

( ८ ) चारचौघात वावरताना आपल्या अंगप्रत्यंगांचें फाजील प्रदर्शन करणे, दुसऱ्याची कामवासना चेतवली जाईल असे हावभाव करणे, लैंगिक गोष्टींबद्दल फार मोकळेपणाने बोलणे अगर कांही विशिष्ट शब्द वापरणे आणि परस्परांविषयींच्या कामुकतेचें अतिरिक्त प्रदर्शन करणें हें निषिद्ध व बेकायदेशीर समजलें जातें. कारण असें केल्यामुळे नको तेथे नको त्या वेळी व नको त्या व्यक्तींची कामवासना चाळवली जाते. त्यामुळे लैंगिक स्पर्धा सुरू होण्याची अगर लैंगिक अनाचार होण्याची शक्यता असते. तसेंच अशा कृतीमुळे अगर बोलण्यामुळे लैंगिक जीवनाबद्दल थिल्लर व गलिच्छ मनोवृत्ती निर्माण होण्याची शक्यता असते.

( ९ ) निरनिराळ्या प्रकारच्या लैंगिक विकृती व्यक्तीच्या व समाजाच्या हिताला विघातक असतात. म्हणून लैंगिक प्रेरणेच्या विकृत आविष्कारावर समाज कडक निर्बंध घालतो.

लैंगिक जीवनाचें नियमन प्रत्येक समाज कांही अंशी वेगळ्या प्रकारे करतो. कारण प्रत्येक समाजाची परिस्थिती, परंपरा व मूल्यें वेगवेगळीं असतात. तेव्हा वरील प्रकारचें नियमन सर्वच बाबतीत सर्वच समाजात नेहमीच प्रचलित असतें असें मानणे अयोग्य ठरेल. कांही समाजात एका पुरुषाला अनेक पत्नी असणे किंवा एका स्त्रीला अनेक पती असणे अयोग्य समजलें जात नाही. कांही समाजात मामेबहिणीशी अगर चुलतबहिणीशी लग्न करण्यास परवानगी असते. कांही समाजात अल्पवयीन मुलांमुलींचीं लग्नें केलीं जातात व त्यांना यौवन प्राप्त झालें कीं तावडतोब शरीरसंबंध ठेवायची परवानगी असते. कांही समाजातील माणसें सदासर्वदा नग्नच असतात. कांही समाजात विवाहबंधन तोडणे जवळजवळ अशक्यच असतें. तर कांही समाजात तें फार सुलभ असतें. कामुकतेच्या प्रदर्शनास देखील निरनिराळे समाज कमीअधिक प्रमाणात परवानगी देतात. आणि पुष्कळदा एकाच समाजातले वेगवेगळे वर्ग अगर गट लैंगिक प्रेरणेचें वेगवेगळ्या प्रकारे नियमन करतात.

त्याचप्रमाणे प्रत्येक समाज आपले लैंगिक प्रेरणेचे नियमन कांही प्रसंगी व कांही बाबतीत सैल करतो; अगर या नियमनातून कांही पळवाटा ठेवतो. वेश्याव्यवसाय बहुतेक समाजात असतो. आणि जरी तो निषिद्ध मानला गेला तरी बेकायदेशीर मानला जात नाही. ज्या प्रकारचें कामुकतेचें प्रदर्शन अगर थट्टाविनोद अन्यप्रसंगी निषिद्ध समजला जातो, त्याला विवाहसमारंभात परवानगी असते. इतकेंच नव्हे त्यावेळी अशा गोष्टींना उत्तेजन दिलें जातें. बोलण्याचालण्यावर संमिश्र समाजात जेवढे निर्बंध असतात तेवढे फक्त पुरुषांच्या अगर स्त्रियांच्या समाजात नसतात. वैद्यकीय विद्यालयात नग्न माणसांची अगर त्यांच्या योनिभागांचीं चित्रें काढणे व त्या गोष्टींची चर्चा करणे निषिद्ध मानलें जात नाही. शिल्पकाराने नग्न पुतळा घडवलेला चालतो. चित्रकाराने नग्न व्यक्तीचें चित्र काढलेलं चालतें. ज्या प्रकारचीं शृंगारिक वर्णनें चारचौघांत बोलताना आपण करीत नाही ती कवींनी केलेलीं चालतात. होळीच्या दिवशी गलिच्छ व अश्लील गोष्टी बोलण्यास वा करण्यास मनाई नसते. आणि तमाशातील किंवा स्ट्रिप-टीजमधील मर्यादातिक्रमाकडे समाज बहुधा दुर्लक्ष करतो.

असें करण्यामागे बहुधा दोन प्रकारचे हेतु असतात. नियमनाच्या चौकटीत कोणतीही प्रेरणा पूर्णतया बसवणे शक्यही नसतें व इष्टही नसतें. प्रत्येक माणूस वेगळ्या प्रकृतीचा असतो आणि माणसाच्या प्रेरणांना लगाम घालणे नेहमीच फार अवघड असतें. तेव्हा माणसाच्या प्रेरणा उतू जाण्याची नेहमीच शक्यता असते. तेव्हा त्यांना असें उतू जाऊ देण्यास वाव ठेवणे समाजहिताच्या दृष्टीने आवश्यक असतें. पुन्हा समाजाचें नियमन पूर्णपणे योग्य स्वरूपाचें असतें असें नाही. त्यांत बदल होणे आवश्यक असतें. नियमनाच्या चौकटीला अपवादांच्या फटी असल्या तर असे बदल होणे सोपें जातें. समाजरचना उखडून न पडता मग असे बदल होऊ शकतात. तसेंच लैंगिक प्रेरणेचें नियमन करणे हें जसें समाजाचें उद्दिष्ट असतें, तसेंच ज्ञानाची वृद्धि करणे, कलांचा विकास करणे वगैरे इतर उद्दिष्टेंही समाजापुढे असतात. ह्या उद्दिष्टांमध्ये अनेकदा विरोध निर्माण होतो. असा विरोध निर्माण झाला कीं एका उद्देशाने घातलेले निर्बंध दुसऱ्या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी सैल करावे लागतात. स्त्रीपुरुषांच्या योनिभागांचीं चित्रें काढणे लैंगिक प्रेरणेच्या नियमनाच्या संदर्भात अयोग्य आहे. पण वैद्यकशास्त्राच्या अभ्यासासाठी तें आवश्यक आहे. तेव्हा अशीं चित्रें काढण्याबाबतचे निर्बंध वैद्यकविद्येच्या क्षेत्रापुरते सैल करावे लागतात.

पुन्हा स्वातंत्र्याधिष्ठित समाजरचनेत व्यक्तिस्वातंत्र्याला फार महत्त्व असतें. त्या स्वातंत्र्याचा दुरुपयोग होण्याची जरी शक्यता असली तरी त्याला धक्का पोहोंचू न देण्याची खबरदारी घ्यावी लागते. तेव्हा लैंगिक प्रेरणेचें सामाजिक नियमन व्यक्तींच्या मूलभूत हक्कांशी विसंगत असलें तर तें शक्य तितकें शिथिल करण्याचा प्रयत्न केला जातो.

लैंगिक प्रेरणेच्या नियमनाचें स्वरूप कसें असतें, त्याचा आपण आतापर्यंत अभ्यास केला. आता ह्या नियमनाचा साहित्याशीं कसा संबंध येतो तें आपण पाहिलें पाहिजे.

स्थूल मानाने पाहिलें तर साहित्यात निरनिराळया प्रसंगांचें व व्यक्तींचें चित्रण केलेलें असतें. तसेंच निरनिराळ्या वैचारिक भूमिका अगर मानसिक दृष्टिकोनही प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्षपणे साहित्याच्या द्वारे व्यक्त होऊ शकतात. सहाजीकच समाजाने निषिद्ध मानलेल्या कृतींचें किंवा स्वभावविशेषांचें चित्रण साहित्याच्या द्वारे होऊ शकतें. ह्या गोष्टी निषिद्ध असल्या तरी ( किंवा म्हणूनच ) आकर्षक आहेत. अगर निषिद्ध नसून चांगल्या आहेत. अशी मनोभूमिका साहित्याच्या द्वारे व्यक्त होऊ शकते. पुन्हा जरी ह्या गोष्टींचें प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष समर्थन साहित्याच्या द्वारे झालें नाही, तरी त्या गोष्टींकडे तें वाचकाचें लक्ष वेधू शकतें. त्याबद्दल त्यांना विचार अगर स्वप्नरंजन करावयाला प्रवृत्त करू शकतें. हें देखील अनिष्ट आहे असें समाजाला वाटलें तर तें अगदीच असमर्थनीय ठरणार नाही.

लैंगिक जीवनाविषयीच्या समाजाच्या नियमांचा भंग करण्यास लोकांस साहित्य प्रवृत्त करू शकतें. आणि म्हणून त्यावर निर्बंध घातले पाहिजेत अशी भूमिका समाजाला घेता येणे शक्य आहे; पण त्याचबरोबर भाषणस्वातंत्र्य व लेखनस्वातंत्र्य हे प्रत्येक व्यक्तीचे मूलभूत हक्क असतात. आणि त्यांच्यावर कमीत कमी निर्बंध घालण्याची स्वातंत्र्याधिष्ठित समाजाची प्रवृत्ती असते. तेव्हा ह्या हक्कांच्या संदर्भात ललित साहित्यातील अश्लीलतेचा व तिच्यावरील निर्बंधांचा आपण विचार करायला हवा.

प्रस्थापित नीतिकल्पनांना व समाजरचनेला विरोध करणारे विचार जरी समाज-विघातक वाटले तरी स्वातंत्र्याधिष्ठित समाज त्यांच्या प्रकटीकरणावर निर्बंध घालीत नाही. त्याच्या कारणांचें विवेचन आपण वर केलेंच आहे. ललित साहित्याबद्दल देखील समाज अशीच भूमिका घेतो. ललित साहित्य व अन्य प्रकारच्या कलाकृती ह्यांची निर्मिती मानवी मनाच्या एका उच्च व हितकारक प्रेरणेतून होते. आणि अशा प्रकारच्या कलाकृतींची निर्मिती ही मानवी व्यक्तिमत्त्वाच्या विकासासाठी अत्यंत आवश्यक असते, हें स्वातंत्र्या-धिष्ठीत समाजांना मान्य असतें. म्हणून वैचारिक क्षेत्राप्रमाणे कलेच्या क्षेत्रात देखील जास्तीत जास्त स्वातंत्र्य देणे आवश्यक मानलें जातें. कांही कलाकृती प्रस्थापित समाज-रचनेला विघातक असें चित्रण करतात अगर मनोभूमिका निर्माण करतात हें खरें; उदाहरणार्थ, एखादी कथा अगर कादंबरी व्यभिचार हा अनिष्ट नाही, विकृत प्रकारचा लैंगिक संबंध उच्च प्रकारचा आनंद देतो असें दर्शन अगर सूचित करू शकेल. परंतु तेवढ्या-वरून ती कथा अगर त्या प्रकारच्या कलाकृतींवर निर्बंध घातले जात नाहीत. समाजाच्या लैंगिक जीवनावरच्या निर्बंधांना विरोधी असें साहित्य समाज, निदान उदार व सुसंस्कृत समाज, अश्लील ठरवीत नाही.

स्थूलमानाने असें म्हणता येईल कीं, गुन्हेगारीचीं कृत्यें करण्यास अगर दंगेधोपे करण्यास चिथावणी देणारे विचार व्यक्त करण्यावर समाज ज्या भूमिकेवरून बंदी घालतो त्याच भूमिकेवरून अश्लील साहित्यावरही तो बंदी घालतो.

अश्लील साहित्याची व्याख्या स्थूलमानाने पुढीलप्रमाणे केली जाते. सर्वसामान्य माणसाला तत्कालीन सामाजिक संकेतांच्या संदर्भात जें लिखाण प्रामुख्याने लैंगिक गोष्टींविषयी गलिच्छ व विकृत वासना निर्माण करणारें वाटतें तें अश्लील मानावें अशी कायद्याची भूमिका आहे. जें साहित्य नग्नता, गुह्येंद्रियें व लैंगिक संबंध वगैरे गोष्टींविषयी गलिच्छ व विकृत वासना निर्माण करतें व या गोष्टींचीं वर्णनें अगर चित्रण शिष्टसंमत मर्यादांचा अतिक्रम होईल इतक्या उघडपणाने किंवा स्पष्टपणाने करतें तें साहित्य अश्लील असतें. ही व्याख्या अमेरिकन लॉ इन्स्टिट्यूट मॉडेल पीनल कोडमध्ये दिलेली आहे. आणि 'लेडी चॅटरलीज् लव्हर' या पुस्तकाबद्दल निर्णय देताना अमेरिकन कोर्टांतल्या न्यायमूर्तींनी तिचा उल्लेख केला आहे. ही व्याख्या देखील पूर्णपणे स्पष्ट नाही. ह्या व्याख्येनुसार एखादें पुस्तक अश्लील ठरवताना कोणाही न्यायाधीशाला स्वतःच्या कलानुसार वेगळा निर्णय द्यायला पुष्कळच वाव राहील. पुन्हा अश्लीलतेच्या कायदेपुस्तकांतल्या व्याख्या वेगवेगळ्या देशात वेगवेगळ्या आहेत. आणि अनेक देशांतल्या कायद्यात तर त्या फारच अस्पष्ट आहेत. पण आपल्याला इथे कायद्याचा कीस काढायचा नाही. तेव्हा वर दिलेली व्याख्या योग्य आहे असें धरून आपण पुढे जाऊ.

या व्याख्येनुसार अश्लील साहित्य हें मुख्यतः कामवासना जागृत करणारें, तिला चेतविणारें असतें. आता ज्या व्यक्तीकडून आपली कामवासना पुरी करून घेणे शक्य व इष्ट आहे अशी व्यक्ती समोर असता जर एखाद्या माणसाची कामवासना जागृत झाली तर त्यांत गैर कांहीच नाही. नव्हे वंशवृद्धीसाठी असें होणे आवश्यक असतें. पण अश्लील साहित्य वाचताना जेव्हा कामवासना चेतवली जाते तेव्हा तिच्या पूर्तीचा कोणताही मार्ग तें साहित्य उपलब्ध करीत नाही. अशा प्रकारे कामवासना जागृत होणे अनैसर्गिक असतें. पुन्हा अश्लील साहित्य ही कामवासना विकृत व गलिच्छ स्वरूपात जागृत करतें. साहजिकच अशा प्रकारे कामवासना प्रज्वलित झाली तर तिचें समाधान करण्याचा वाचक प्रयत्न करणे शक्य आहे. आणि त्यामुळे त्याच्या हातून समाजविघातक कृत्यें घडण्याची शक्यता आहे. बरे, असें अश्लील साहित्य वाचूनच जर एखाद्या माणसाचें समाधान होत असेल तर ती एक विकृतीच समजली पाहिजे आणि अशा विकृतीला उत्तेजन देण्याचें टाळलें पाहिजे. लैंगिक गोष्टींबद्दल चारचौघांत फार उघडपणे बोलणे किंवा गलिच्छ व असभ्य समजले जाणारे शब्द वापरणे हें अयोग्य समजलें जातें. अश्लील साहित्यात हा निर्बंध मोडला जातो आणि तें इष्ट नसतें.

अश्लील साहित्याबद्दल ही जी कायद्याची (म्हणजे समाजाची) भूमिका आहे तिच्या संदर्भात अनेक प्रश्न उपस्थित होतात. साहित्य हें कामवासना चेतवू शकतें व प्रेमविषय समोर नसताना तशी ती चेतविली जाणे गैर असतें असें येथे गृहीत धरलेलें आहे. पण ही भूमिकाच मुळी चुकीची आहे.

संस्कृत साहित्यशास्त्रकारांनी साहित्यापासून रसनिष्पत्ति होते असे म्हटलेलें आहे. नित्याच्या जीवनव्यवहारात ज्या प्रकारे भावना निर्माण होतात तशा त्या साहित्यात निर्माण होत नाहीत. नित्याच्या व्यवहारांत राग आला तर त्या रागाचें कारण नष्ट करायला मनुष्य प्रवृत्त होतो व तें रागाचें कारण नाहीसें झालें कीं ती भावना विसर्जन पावते. प्रेमभावना मनात निर्माण झाली कीं प्रिय व्यक्तीशी मीलन झाल्यावरच तिची पूर्ति होते. व्यावहारिक जीवनात निर्माण झालेल्या भावना सहेतुक असतात. माणसाला प्रत्यक्ष जीवनात वाटणाऱ्या कोणत्या तरी उणिवेतून वा अपेक्षेतून त्या निर्माण होतात. आणि ती उणीव दूर करण्यास किंवा अपेक्षा पूर्ण करण्यास त्या माणसास प्रवृत्त करतात. आणि तसें झालें कीं त्यांचें तात्पुरतें तरी का होईना पण समाधान होतें. ह्याउलट साहित्याच्या द्वारे ज्या भावना निर्माण होतात त्या वाचकांच्या वैयक्तिक जीवनव्यवहारातून निर्माण होत नाहीत. काल्पनिक पात्रांच्या जीवनव्यवहारातून त्या उद्भवतात आणि हीं पात्रें काल्पनिक आहेत याची वाचकाला सुरुवातीपासून अखेरपर्यंत पूर्ण जाणीव असते. इतकेच नव्हे तर ती असणे साहित्यापासून आनंद मिळविण्यासाठी आवश्यक असतें. ह्या प्रकारे साहित्याच्या वाचनाने ज्या भावना निर्माण होतात त्या अहेतुक असतात. व्यक्तीच्या जीवनांत कांही एक विशिष्ट कार्य करण्यासाठी त्या अस्तित्वात येत नाहीत. त्यामुळे त्यांच्या समाधानासाठी अमकी एक गोष्ट आपल्या व्यावहारिक जीवनात व्हावी अशी वाचकाची अपेक्षा नसते. त्या भावना, भावना म्हणूनच आनंददायक असतात. त्या भावनांचा अनुभव घेण्यातच वाचकाला समाधान होतें. म्हणूनच त्या व्यावहारिक अर्थाने भावना नसतात. त्या रसात्मक झालेल्या असतात. शृंगार अगर प्रेमभावना साहित्यात व्यक्त होते तेव्हा तिला देखील रसस्वरूप प्राप्त झालेलें असतें. तेव्हा साहित्यातल्या शृंगारामुळे व्यावहारिक जीवनात होतें त्या प्रकारचें कामोद्दीपन होत नाही. त्या शृंगारामुळे कामवासनेच्या पूर्तीसाठी वाचकाकडून कांही अयोग्य वर्तन होण्याची शक्यता नाही किंवा त्या कामवासनेला विकृत स्वरूप प्राप्त होण्याचीही शक्यता नाही.

रससिद्धान्त सदोष आहे असें जरी आज अनेकांचें मत असलें तरी वर निर्देशिलेलें त्या सिद्धान्तामागचें मूलतत्त्व आजही सर्वांना मान्य होण्यासारखें आहे. साहित्य हें भावनात्मक अनुभवांची सौंदर्यपूर्ण रचना करतें अगर अनुभवांचे आकार शोधण्याचा प्रयत्न करतें अशी भूमिका आज मांडली जाते. पण ह्या भूमिकेत देखील ही गोष्ट अभिप्रेत आहे कीं, साहित्याच्या द्वारे ज्या अनुभवाची आपल्याला प्रतीती येते तो अहेतुक असतो. व्यावहारिक जीवनात भावना अगर अनुभव जें कार्य करतात किंवा त्यांचें जें स्वरूप असतें तें स्वरूप त्यांना साहित्यात नसतें.

ललित साहित्याची वरील उपपत्ती मान्य केली तर मग तें शृंगारिक असलें तरी त्याचा अनिष्ट कामोद्दीपक परिणाम होत नाही हें देखील मान्य करावें लागेल; आणि मग कोणतेंही लिखाण साहित्य या पदवीला पात्र असलें कीं त्याच्यावर अश्लीलतेचा आरोप करताच

येणार नाही, अशी भूमिका घ्यावी लागेल. अर्थात इथे हें मुद्दाम नमूद केलें पाहिजे कीं, ललित साहित्य ह्या नांवाखाली खपणारें सगळेंच लिखाण कांही कलात्मक नसतें. तेव्हा अश्लीलतेचा प्रश्न निर्णयासाठी पुढे आला कीं संबंधित लिखाण कलात्मक आहे कीं नाही हें ठरविण्याचें काम कोर्टाला करावें लागेल.

माझ्या मते हीच भूमिका कोणत्याही स्वातंत्र्याधिष्ठित व सुसंस्कृत समाजाने घ्यायला हवी. पण प्रत्यक्षात मात्र ही भूमिका पूर्णांशाने कोणीही मान्य केलेली नाही. अमेरिकेसारख्या देशात ती पुष्कळशा अंशाने मान्य केलेली आहे. कारण तेथील कायद्याने हें तत्त्व मान्य केलें आहे कीं कोणत्याही साहित्यकृतीचा समग्रपणे विचार करून मगच ती अश्लील आहे कीं नाही तें ठरविलें पाहिजे. तिच्यातलें एखादें वाक्य अगर कांही भाग वेगळा काढून तो अश्लील ठरविणे गैर आहे. कोणत्याही साहित्यकृतीच्या परिणामात एकात्मता असते आणि तो एकात्म परिणाम ध्यानांत घेऊनच ती कृती अश्लील आहे कीं नाही ते ठरवायला हवें. अश्लीलतेबद्दल निर्णय देताना कोणतीही साहित्यकृती ही एक कलाकृती आहे ही गोष्ट विचारात घ्यायला हवी. या गोष्टीची कबूली वरील तत्त्वात अभिप्रेत आहे. त्याचप्रमाणे अमेरिकन कायद्यात असेंही म्हटलेलें आहे कीं कोणत्याही लिखाणाचा परिणाम प्रामुख्याने कामोद्दीपक असला व तें कामवासनेला विकृत व गलिच्छ स्वरूप देणारें असलें तरच तें अश्लील समजावें. पण प्रामुख्याने त्याचा परिणाम अन्य प्रकारचा असला तर त्यावर बंदी घालू नये. एखादें पुस्तक ही कलाकृती आहे असें तें वाचल्यावर जर प्रामुख्याने वाटलें तर त्यावर बंदी घालणें योग्य ठरणार नाही.

अश्लीलतेबद्दलची ही भूमिका अत्यंत उदार आहे. इतर अनेक देशांत इतकी उदार भूमिका स्वीकारली जात नाही. एखादें पुस्तक कलाकृती या नात्याने फार श्रेष्ठ असलें तरी तें अश्लीलही असू शकतें अशी भूमिका आपल्याकडे वादविवादात अनेकदा घेतली जाते. आणि आपला अश्लीलतेबद्दलचा कायदा अशी भूमिका घेणाऱ्या न्यायाधीशाच्या मार्गांत कोणताही अडथळा आणीत नाही.

ह्या अनुदार वाटणाऱ्या भूमिकेचें वेगवेगळ्या प्रकारे समर्थन करण्यात येतें. एक भूमिका अनेक शतकांपूर्वी प्लेटोने घेतली होती आणि आजही ती अनेकांना पटते. प्लेटोचें म्हणणे असें कीं कवी हे लोकांच्या भावना चेतवतात, त्यांचीं माथीं भडकवतात आणि मग थंड डोक्याने विचार करून निर्णय घेणे त्यांना अशक्य होतें. म्हणून कवींची समाजातून हकालपट्टी करावी असें त्याचें मत पडलें. त्याचे आजचे अनुयायी इतकी अतिरेकी भूमिका घेत नाहीत. पण ते म्हणतात कीं कवींनी लोकांचीं माथीं भडकवायचीं असतील तर त्यानी ती देशकार्य वगैरे सत्कारणासाठी भडकवावीं. त्यांच्या कामवासना भडकवून त्याना बेफाम करू नये. असें कामवासना भडकविणारें साहित्य कलेच्या दृष्टीने उच्च दर्जाचें असलें तरी निषिद्ध मानलें पाहिजे. त्यांवर बंदी घातली पाहिजे.

काही लोकांची भूमिका याहून थोडी वेगळी असते. खरें साहित्य हें माथीं भडकविणारें नसतें तर रसात्मक असतें. हें ते मान्य करतात पण त्याचबरोबर तें असेंही म्हणतात कीं साहित्य मानवी मनावर बरेवाईट संस्कार करू शकतें. जीवनाचें स्वरूप हें असें आहे अशी प्रतीती तें देऊ शकतें. अमकें बरें तमकें वाईट, अमकें आकर्षक तमकें तिरस्करणीय वगैरे प्रकारचे संस्कार तें मानवी मनावर करीत असतें. भावनात्मक अनुभवांच्या द्वारे हे संस्कार होत असल्यामुळे ते फार प्रभावी असतात. साहित्याविषयी बहुसंख्य लोकांना आकर्षण वाटत असल्यामुळे ते संस्कार समाजातल्या बहुसंख्य लोकांवर होतात. साहित्य असें प्रभावी असल्यामुळे त्याचे अनिष्ट संस्कार होणार नाहीत अशी काळजी घेतली पाहिजे. म्हणून अश्लील साहित्यावर निर्बंध घालणे आवश्यक असतें.

ह्या भूमिकेचें खंडन अनेक प्रकारे करता येणे शक्य आहे. एखाद्या साहित्यकृतींतील पात्रें व तिचा निवेदक अनेक प्रकारचे विचार व मतें व्यक्त करीत असतात. बऱ्यावाईटाच्या कांही कल्पना त्या साहित्यकृतीत अभिप्रेत असतात. कांही घटनांचा, क्रियांचा वा व्यक्तींचा गौरव तीत केलेला असतो किंवा त्यांचें आकर्षक स्वरूपांत चित्रण केलेलें असतें. पण हें जरी खरें असलें तरी कोणतीही साहित्यकृती तिच्यात अभिप्रेत असलेल्या या मूल्यांचा वाचकाने स्वीकार करावा असा आग्रह धरीत नाही. तिचें रसग्रहण करण्यासाठी या मूल्यांचा स्वीकार करण्याची आवश्यकता नसते. आणि खरें म्हणजे आपण त्या मूल्यांचा स्वीकार करीतही नाही. जें काल्पनिक विश्व एखाद्या साहित्यकृतीत निर्माण केलेलें असतें त्या विश्वाचा तीं मूल्यें हा एक भाग असतो. आणि त्या विश्वातल्या अनुभवांची प्रतीती येण्यापुरताच आपण त्या मूल्यांचा स्वीकार करतों. साहित्यकृतीचे मनावर संस्कार होतात. पण ते वेगळ्या प्रकारचे असतात. समाजाच्या बऱ्यावाईटाशी त्यांचा निश्चित स्वरूपाचा व प्रत्यक्ष संबंध नसतो. तेव्हा त्या संस्कारच्या भीतीने साहित्यकृतींवर बंधन घालण्याचें प्रयोजन नाही.

वरील भूमिका पुष्कळांना मान्य होणार नाही. आणि साहित्याचे संस्कार करण्याचें सामर्थ्य लक्षांत घेता, अश्लील साहित्यावर निर्बंध घालणे इष्ट आहे या भूमिकेला ते चिकटून रहातील. पण असें करणे इतकें सोपें नाही. कारण त्यांची भूमिका लेखन-स्वातंत्र्याच्या मूलभूत हक्कावर गदा आणणारी आहे. लोकांचीं माथीं भडकवून त्यांना गुन्हेगारी अगर दंगेधोपे करण्यास प्रवृत्त करण्यासाठी लेखनस्वातंत्र्याचा उपयोग करता येत नाही हें खरें; पण समाजाला अनिष्ट अगर विघातक वाटणारे विचार व्यक्त करण्याचें स्वातंत्र्य प्रत्येकाला असतें. स्वातंत्र्याधिष्ठित समाजात तें असलें पाहिजे. मग विचारांच्या क्षेत्रांत जें स्वातंत्र्य असतें तें साहित्याच्या क्षेत्रात कां नसावें ? साहित्य प्रत्यक्ष माथीं भडकवीत नसेल तर त्याच्या द्वारे कोणतेही संस्कार करण्याचें स्वातंत्र्य लेखकाला हवें.

ह्या युक्तिवादाला निर्बंधांच्या समर्थकांकडून पुढील उत्तर मिळेल. वैचारिक वाङ्मयापेक्षा ललित साहित्य अधिक प्रभावी असतें. तें बहुसंख्य लोकांवर संस्कार करू शकतें. आणि

त्यापैकी बहुतेकांना आपल्यावर होणारे संस्कार चिकित्सकपणे तपासून पहाण्याची कुवत नसते. विशेषतः अल्पवयी तरुणांवर तें फारच अनिष्ट परिणाम करू शकतें. म्हणून त्यावर थोडे का होईना पण निर्बंध घालणे आवश्यक असतें. अश्लील साहित्यापासून धोका फार असतो आणि त्यावर निर्बंध घातल्यामुळे आत्मप्रकटीकरणावर फारशा मर्यादा पडत नाहीत. म्हणून अश्लील साहित्यावर निर्बंध घालणे आवश्यक आहे.

हा युक्तिवाद सदोष आहे. लोक अज्ञ असतात, त्यांना फारसें कळत नाही, म्हणून त्यांच्यावर कुसंस्कार होऊ नये अशी खबरदारी घेणे आवश्यक आहे, हा युक्तिवाद अत्यंत धोकादायक आहे. ह्या युक्तिवादाला मान्यता दिली तर आपल्या भारतातील लोकशाही नष्ट करावी या भूमिकेपर्यंत आपण येऊन पोहोंचू. स्वातंत्र्याचा दुरुपयोग करू नये, कुसंस्कारांना आपण बळी पडू नये असें लोकांना शिकविण्याचा एकच मार्ग असतो. तो म्हणजे त्यांना स्वातंत्र्य देणे. पाण्यात उतरल्याशिवाय पोहायला जसें शिकता येत नाही त्यांतलाच हा प्रकार आहे. अज्ञ लोकांना स्वातंत्र्य द्यायचें नाही ही भूमिका एकदा घेतली कीं राज्यकर्ते लोकांना सतत अज्ञानातच ठेवू पहातात.

अज्ञ लोकांच्या बाबतीत जो युक्तिवाद वर केला तो कांही अंशी अल्पवयी तरुणांना देखील लागू पडतो. शिवाय अल्पवयी तरुणांना जें पचेल अगर त्यांच्यावर जें अनिष्ट संस्कार करणार नाही तेंच साहित्य प्रौढांनी देखील वाचलें पाहिजे हा मोठा जुलुम आहे. अल्पवयी तरुणांनी जर विशिष्ट प्रकारचें साहित्य वाचायला नको असेल तर त्यांच्या पालकांनी व समाजाने तें साहित्य त्यांच्या हातात पडू नये अशी व्यवस्था करावी. पण त्यासाठी साऱ्या समाजाच्या अनुभवविश्वाच्या व अभिरुचीच्या विकासाच्या मार्गात अडथळा आणणे अगदी गैर आहे. मोठ्या माणसांनी सिगरेटी ओढल्या तर लहान मुलें देखील त्या चोरून ओढतात. पण म्हणून मोठ्या माणसांनी सिगरेटी ओढू नये असा निर्बंध आपण घालत नाही. किंवा मुलें रस्त्यांत वेडीवांकडीं धावण्याची शक्यता असते म्हणून आपण रस्त्यावरची मोटरवाहतुक बंद करीत नाही. मग साहित्यासारख्या अत्यंत महत्त्वाच्या गोष्टींवर अल्पवयीन तरुणांच्या सोयीसाठी निर्बंध घालणे अत्यंत अनिष्ट आहे. कायद्याने देखील ही गोष्ट मान्य केली आहे. निदान अमेरिकन कायद्यात तरी साहित्य अश्लील ठरविताना चारचौघांसारख्या वाचकांवर त्याचा काय परिणाम होतो तें विचारात घ्यावें असें म्हटलेलें आहे. अल्पवयीन तरुण अगर मनोविकृतीने पछाडलेला मनुष्य हे प्रातिनिधिक वाचक नव्हेत. आणि त्यांच्या सोयीसाठी एखादें पुस्तक अश्लील ठरवणे अमेरिकन कायद्याला मंजूर नाही. कोणत्याही समाजातल्या कायद्याला हें मंजूर असता कामा नये.

अर्थात, विशिष्ट वयगटांतल्या तरुणांच्या अगर मुलांच्याकरिता जीं पुस्तकें लिहिलीं जातात त्यांची गोष्ट वेगळी. लहान मूल वा अल्पवयीन तरुण हे त्यांचे प्रातिनिधिक

वाचक असतात. आणि त्यांच्यावर होणारे परिणाम लक्षांत घेऊनच तीं पुस्तकें अश्लील आहेत कीं काय तें ठरवायला हवें.

पुन्हा विचार कमी प्रभावी असतात व साहित्य अधिक प्रभावी असतें हें मर्यादित अर्थानेच खरें आहे. समाजांतल्या अनेक क्रांत्या वैचारिक ग्रंथांमुळे झालेल्या आहेत. ह्या उलट अश्लील साहित्यामुळे दंगली माजल्या अगर अनाचार झाले अशीं उदाहरणें आढळत नाहीत. खरें म्हणजे अश्लील साहित्याचे समाजावर काय परिणाम होतात त्या बद्दलची माहिती कोणीतरी गोळा करायला हवी. त्या माहितीवरून बहुधा असें सिद्ध होईल कीं, कायदेशीर समजल्या जाणाऱ्या अनेक गोष्टींचे समाजावर जितके दुष्परिणाम होतात त्यांहून अश्लील साहित्याचे पुष्कळच कमी प्रमाणात होतात. टेलिव्हिजनच्या लहान मुलांवरच्या परिणामांच्या ज्या पहाण्या अमेरिकेंत झाल्या त्यांत असें आढळून आलें आहे कीं, मुलें गुन्हेगारीला प्रवृत्त होतात. याला टेलिव्हिजनपेक्षा घरांतलें वातावरणच अधिक जबाबदार असतें.

अश्लीलतेची एक चमत्कारिक व विकृत धास्ती मानवी समाजाने आणि विशेषतः आपल्या समाजाने घेतलेली आहे. खून, मारामाऱ्या, चोऱ्या या गोष्टी साहित्यात आल्या, साहित्याने माणसाला धर्मांध केलें तर त्याबद्दल आपण फारशी तक्रार करीत नाही. पण अश्लीलतेचा जरा वास आला तरी आपला समाज थिथरतो. मला तरी हें शहाणपणापेक्षा विकृतीचेंच लक्षण वाटतें.

आणि अश्लील लेखनावर बंदी घातली तर त्यामुळे माणसाच्या आत्मप्रकटीकरणावर फारशा मर्यादा पडत नाहीत, असें म्हणणे चुकीचें आहे. कारण लैंगिक प्रेरणा ही माणसाची एक मूलभूत आणि अत्यंत प्रभावी प्रेरणा आहे. माणसाच्या अनुभवविश्वात तिला फार महत्त्वाचें स्थान आहे. पुन्हा माणसाचे अनुभव संमिश्र स्वरूपाचे असतात. त्यामुळे अन्य प्रकारचे अनुभव व लैंगिक अनुभव ह्यांचें अनेकदा मिश्रण झालेलें असतें. तेव्हा अश्लीलतेवर निर्बंध घातले तर नुसत्या लैंगिकच नव्हे तर सर्व प्रकारच्या अनुभवांच्या अभिव्यक्तीवर त्यांचा अनिष्ट परिणाम होतो. आणि ह्या प्रत्यक्ष परिणामांइतकाच निर्बंध आहेत या गोष्टीचा अप्रत्यक्ष परिणाम अनिष्ट असतो. बोलताना हात हालवू नका असा निर्बंध एखाद्या वक्त्यावर घातला तर हाताच्या हालचालीमुळे त्याच्या व्याख्यानाला प्राप्त होणारी परिणामकारकताच केवळ नष्ट होत नाही तर त्याचें सारें व्याख्यानच बिघडण्याची शक्यता असते. अश्लीलतेवरच्या निर्बंधांचा असाच परिणाम होऊ शकेल.

कलापूर्ण साहित्यकृती अश्लील असू शकते व ही अश्लीलता समाजविघातक असते ह्या गोष्टी जरी आपण क्षणभर मान्य केल्या तरी त्यामुळे अश्लील साहित्यावर नेहमीच निर्बंध घातले पाहिजेत असें सिद्ध होत नाही. कारण लैंगिक प्रेरणेचें नियमन करणे हें जसें समाजाचें उद्दिष्ट आहे त्याचप्रमाणे साहित्याच्या विकासाला व त्याच्या द्वारे होणाऱ्या आत्म-

प्रकटीकरणाला जास्तीत जास्त वाव देणे, हें देखील समाजाचें एक महत्त्वाचें उद्दिष्ट असतें. आणि या दोन उद्दिष्टांत विरोध असला तर पहिल्या उद्दिष्टासाठी दुसऱ्या उद्दिष्टाचा नेहमीच बळी दिला पाहिजे असें मानणे सयुक्तिक होणार नाही. जेव्हा जेव्हा असा विरोध आढळून येईल तेव्हा तेव्हा नफ्यातोट्याचें गणित मांडून कुठच्या उद्दिष्टाला प्राधान्य द्यायचें तें ठरविणे अधिक योग्य ठरेल. असें गणित मांडलें तर अश्लीलतेचे दुष्परिणाम लक्षांत घेऊन देखील लॉरेन्सची 'लेडी चॅटर्लीज् लव्हर' ही कादंबरी समाज प्रसिद्ध होऊ देईल. आणि त्या कादंबरीहून कमी अश्लील असलेल्या पण कमी प्रतीच्या कादंबरीवर बंदी घालण्यात येईल. प्रत्यक्षात कोणताही समाज असें करीत नाही. (याला तात्त्विक व व्यावहारिक कारणें आहेत.) पण म्हणून या भूमिकेमागच्या तत्त्वाचें महत्त्व कमी होत नाही.

वरील विवेचनावरून पुढील निष्कर्ष निघतात. [ १ ] लेखनस्वातंत्र्य हा प्रत्येक व्यक्तीचा मूलभूत हक्क आहे. आणि त्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. म्हणून त्याच्यावर कमीत कमी निर्बंध घातले जावे. [ २ ] लैंगिक प्रेरणेचें नियमन करणे समाजाच्या दृष्टीने आवश्यक असतें आणि म्हणून अश्लीलतेवर निर्बंध घालणे सयुक्तिक आहे. [ ३ ] कलापूर्ण साहित्यकृती अश्लील असूच शकत नाही. तेव्हा तिच्यावर निर्बंध घालण्याची आवश्यकता नाही. [ ४ ] ही भूमिका ज्यांना मान्य नसेल त्यांना साहित्यांतील अश्लीलतेवर निर्बंध असावे असें सयुक्तिकपणे म्हणता येईल हें खरें, पण त्यांच्या भूमिकेचें अन्य प्रकारे खंडन करणे शक्य आहे. [ ५ ] जें साहित्य कलापूर्ण नाही म्हणजे साहित्यच नाही त्यांत अश्लीलता असेल (शास्त्रीय वाङ्मय यांतून पुन्हा वगळायला हवें) तर त्यावर बंदी घालण्यास हरकत नाही, नव्हे ते आवश्यकही आहे.

जें शास्त्रीय नाही व ललितही नाही अशा साहित्यावर समाजाने बंदी घालण्यास प्रत्यवाय नसला–नव्हे तें आवश्यक असलें तरी अशी बंदी घालताना अनेक व्यावहारिक प्रश्न उपस्थित होतील. त्यांचा त्रोटकपणे विचार करून हें विवेचन मी संपविणार आहें.

अश्लील लिखाणावर बंदी घालताना तें शास्त्रीय अगर कलापूर्ण आहे कीं नाही हें आधी सरकारी अधिकाऱ्यांना व नंतर न्यायाधीशांना ठरवावें लागेल. ह्या बाबतीत निर्णय घेणे आणि विशेषतः ललित साहित्य कलापूर्ण आहे कीं नाही हें ठरविणें फार अवघड आहे. कारण कलात्मकतेचे सर्वमान्य निकष नाहीत आणि कोणतेही निकष एखाद्या साहित्यकृतीला लावणे फार अवघड आहे. पुन्हा साहित्यात जेव्हा एखादा नवा प्रवाह निर्माण होतो तेव्हा तो कलात्मकच नाही अशी त्याच्यावर टीका होत असते. त्यामुळे हें नवें साहित्य अश्लीलतेच्या कायद्याच्या कचाट्यांत सांपडण्याची फार शक्यता असते.

अश्लीलतेची माझी व्याख्या न स्वीकारता वर दिलेली अमेरिकन कायद्यातील व्याख्या स्वीकारली तरी अनेक बाबतीत संदेह निर्माण होऊ शकेल. दा० चार चौघांसारखा वाचक

कोणता व चालू सामाजिक संकेत कोणते याबद्दल निश्चित निर्णय घेणे कठीण जाईल. आणि कायद्याचा कडकपणा पुष्कळसा न्यायाधीशाची मनोवृत्ती व त्याच्या भोंवतालचें सामाजिक वातावरण यांवर अवलंबून राहील.

एखाद्या देशात वेगवेगळे सामाजिक गट असले व प्रत्येकाच्या लैंगिक प्रेरणेच्या नियमनाबद्दलच्या प्रथा वेगवेगळ्या असल्या तर त्या समाजात अश्लीलतेवर बंदी घालणे फार अवघड जाईल. चारचौघांत पुरुषाने स्त्रीचें चुंबन घेणे एका गटात शिष्टसंमत असेल, पण दुसऱ्या गटात तें निषिद्ध असेल. अशा परिस्थितीत व्यावहारिक जीवनात श्लील काय व अश्लील काय तें ठरविणे फार अवघड जाईल. आणि व्यावहारिक जीवनाच्या संदर्भात जो घोटाळा होईल तोच साहित्याच्या क्षेत्रांत देखील होऊ शकेल.

अमके शब्द अश्लील अगर अमक्या प्रकारच्या प्रसंगांचें चित्रण अश्लील अशा प्रकारचे निर्बंध घालणे फारसें फायद्याचें नसतें. कारण ते शब्द व ते प्रसंग टाळून देखील भरपूर अश्लीलता निर्माण करता येते. सेन्सॉरचे नियम असून देखील चित्रपटांत भरपूर अश्लीलता असते हें मुद्दाम सांगायला नको.

ज्यांना अश्लील लिहून पैसे मिळवायचे असतात ते आपले व्यवहार कायद्याच्या चौकटीत राहून देखील चालू ठेवतात. किंवा ते आपले व्यवहार चोरटेपणाने करतात. प्रामाणिकपणे लिहिणारा व अनुभवांचीं वेगळीं क्षेत्रें पादाक्रांत करू पाहणारा प्रामाणिक साहित्यिक मात्र नेमका कायद्याच्या कचाट्यात सांपडतो. उदा०, मर्ढेकर. असें झालें म्हणजे अश्लीलतेच्या कायद्यामागचा हेतूच विफल होतो. म्हणून ह्या कायद्याची अंमलबजावणी फार समंजसपणे केली पाहिजे.

मर्यादित प्रमाणात व विशिष्ट परिस्थितीत अश्लीलता ही safety valve सारखी असते. अशा अश्लीलतेकडे काणा डोळा करणेच शहाणपणाचें असतें. कायद्याविषयीचा लोकांचा आदर व भीति कमी न होऊ देता हें करणे फार अवघड आहे. तमाशा, strip tease, floor shows वगैरे गोष्टी safety valve सारख्या असतात. मात्र त्यांची प्रमाणाबाहेर वाढ होऊ देता कामा नये.

समाज हा परिवर्तनशील असतो. तेव्हा काल जें अश्लील समजलें जात होतें तें आज समजलें जाईलच असें नाही. अश्लीलतेवरचे निर्बंध इतके कडक असू नयेत कीं, त्यामुळे हें आवश्यक परिवर्तन अशक्य होईल.

स्थूलमानाने सोळा ते पंचवीस या वयगटातले तरुण व तरुणी अश्लील साहित्य चोरून मारून वाचतात. हें पूर्णपणें थांबवणे शक्यही नाही व इष्टही नाही. चांगलें काय व वाईट काय याविषयी त्यांच्या कल्पना शिक्षणाने स्पष्ट झाल्या असल्या व त्याबाबत विचार करून निर्णय करण्याइतका त्यांच्या बुद्धीचा विकास झाला असला तर या वाचनाचे दुष्परिणाम होण्याची शक्यता फार कमी.

# ३९

ज्या समाजात माणसाच्या लैंगिक प्रेरणेच्या निरोगी विकासाला व पूर्तीला योग्य तो वाव मिळतो व ज्यांत माणसाच्या इतर प्रेरणांचें योग्य प्रमाणात समाधान होऊन त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होऊ शकतो, त्या समाजात अश्लीलतेबद्दलचें आकर्षण निर्माण होण्याची फारशी शक्यता नसते. ह्याउलट रोगट व दरिद्री समाजाने कितीही कायदे केले तरी तेथे अश्लीलतेची व अश्लील साहित्याची चलती असते.

लैंगिक विकृतीकडे, (अश्लील साहित्याची आवड ही अशी विकृतीच) गुन्हा म्हणून न पहाता रोग म्हणून पहाणे अधिक समंजसपणाचें आहे.

• • •

# अश्लीलता : परिसंवादातील चर्चा

[ दि. ९ व १० एप्रिल १९६२ रोजी अश्लीलतेसंबंधी डॉ. प्रा. इरावती कर्वे, प्रा. गंगाधर गाडगीळ व ॲ. सुशील कवळेकर यांच्या याच पुस्तिकेत सुरवातीला छापलेल्या प्रबंधांच्या संदर्भात प्रा. वि. ह. कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेने चर्चा झाली. या चर्चेत प्रा. वा. ल. कुलकर्णी, प्रा, ग. प्र. प्रधान व बॅ. विठ्ठल नरहर गाडगीळ यांनी जे विचार व्यक्त केले ते खाली देण्यात येत आहेत. **संपादक** ]

## प्रा. वा. ल. कुलकर्णी

ललित लेखक व इतर कलावन्त यांचें स्वातंत्र्य नियंत्रित करू पाहणारे प्रसंग वरचेवर येतात. ह्या संबंधात सभासंमेलनातून ठराव आणले जातात, शासनसंस्थेकडे अर्ज विनंत्या करण्यात येतात आणि कायद्याचीही कास धरली जाते. कला व वाङ्मय यांच्या संबंधात अश्लीलत्वाच्या कल्पनेचा विचार करिताना अनेकदा असेंच दिसून येतें. ह्या बाबत विचार होत असता एका गोष्टीकडे पुष्कळदा दुर्लक्ष होतें असें मला वाटतें. कला व साहित्य यांचा जन्म जीवनापासूनच होत असला, जीवनच त्यांना अन्नरसाचा पुरवठा करीत असलें तरी त्यांची सृष्टी एक अपर सृष्टी आहे. ही सृष्टी म्हणजे जीवनाची केवळ प्रतिकृती नसून अनेक सर्जनशील मनांनी जीवनाधारेच निर्मिलेली एक प्रतिसृष्टी आहे. ही प्रतिसृष्टी स्वायत्त आहे, स्वयंशासित आहे. तिच्या संबंधी विचार करिताना तिची स्वायत्तता, तिचें स्वयंशासितत्व ह्याकडे दुर्लक्ष होऊ देता कामा नये. ती लौकिक सृष्टी नव्हे. ती अलौकिक आहे. तिचें हें अलौकिकत्व कधीही नजरेआड करिता कामा नये.

तिची प्रकृती, तिचें प्रयोजन, तिची अन्तर्व्यवस्था, तिचीं मूल्यें ह्यांकडे दुर्लक्ष करून तिच्यासंबंधी विचार करणें अनिष्ट आहे. साहित्य व कला यांच्या व्यवहारांचें नियंत्रण करू पाहणाऱ्या संस्थांनी ह्या गोष्टीचा गंभीरपणें विचार केला पाहिजे. ह्या संस्थांनी केलेले ठराव किंवा कायदे जर ह्यांकडे दुर्लक्ष करून केले गेले तर ते कला व साहित्य यांच्या खऱ्या खुऱ्या विकासाला मारक वा प्रतिबंधक ठरल्याशिवाय राहणार नाही.

त्यात ज्याप्रमाणें कलेचें व साहित्याचें नुकसान आहे तसेच समाजाचेही नुकसान आहे. कारण आपल्या कांही अत्यंत महत्त्वाच्या आत्मिक भुका भागविण्यासाठीच समाजाने, कला आणि साहित्य यांची ही अपर सृष्टी निर्मिलेली आहे. तिची जोपासना केलेली आहे. ह्या सृष्टीची वाढ, तिचा विकास, तिच्या प्रकृतीस अनुसरून होऊ देण्यातच समाजाचें अंतिम हित आहे. ह्या सृष्टीचें नियंत्रण करू पाहणारे कायदे तिच्या विकासाच्या आड येणार नाहीत ह्याची दक्षता सतत घेतली पाहिजे. मग कायदे करण्याचा प्रयत्न कोणीही केलेला असो–तो प्रयत्न एखाद्या टीकाकाराने केलेला असो, शासनसंस्थेने केलेला असो, साहित्य संमेलनासारख्या एखाद्या सभेने केलेला असो वा कायदेमंडळाने केलेला असो. म्हणूनच तिच्या संबंधात निर्माण होणारा प्रत्येक प्रश्न हा तिच्या प्रकृतीचा व प्रयोजनाचा, तिच्या अन्तर्व्यवस्थेचा व मूल्यांचा विचार करून मग सोडविला पाहिजे.

अश्लीलत्वाचा प्रश्न हा एक त्याच स्वरूपाचा वरचेवर उद्भवणारा प्रश्न आहे. त्या संबंधात विचार करितांना ज्या गोष्टी लक्षात बाळगणें आवश्यक आहेत असें वाटतें त्या पुढील निबंधात स्पष्ट केल्या आहेत :

# वाङ्मय आणि अश्लीलताः एक तात्त्विक विचार.

माझ्यासमोर ललितकृती म्हणून अवतरणारी एकादी कृती ही अश्लील आहे असें जेव्हा मला वाटते तेव्हा तिच्या संबंधात पुढील पर्याय संभवतातः

( अ ) ती कृती खरोखरच अश्लील असते. किंवा ( ब ) मला जाणवणारी तिची अश्लीलता ही सदर कृतीत नसून तिच्याकडे पाहण्याच्या माझ्या दृष्टीत असते.

सारांश, सदर कृतीत मला जाणवणारी अश्लीलता हे एक रसविघ्न आहे. हे रसविघ्न काव्यगत आहे कीं रसिकगत आहे हा येथे महत्त्वाचा प्रश्न आहे.

हे रसविघ्न जेव्हा काव्यगत असते तेव्हा त्याचें स्वरूप काय असते व ते रसिकगत असते तेव्हा त्याचें स्वरूप काय असते हे आपणास प्रथम पहावयाचे आहे, व ते पहिल्याच्या बाबतीत काव्यनिर्मितीची आणि दुसऱ्याच्या बाबतीत कलास्वादाची प्रक्रिया लक्षात घेऊन पाहावयाचे आहे.

काव्यगत अश्लीलतेचे स्वरूप काव्यनिर्मितीची प्रक्रिया लक्षात घेऊन पाहिल्यास कसे दिसते? काव्यनिर्मितीच्या प्रक्रियेतच कांही दोष उत्पन्न झाल्याने हें काव्यगत रसविघ्न संभवतें काय? तें तसें संभवत असल्यास ज्या दोषांमुळे तें संभवतें ते दोष कोणते?

हे दोष लक्षात येण्यासाठी आपण एक प्रश्न स्वतःस विचारू. एखादा अनुभव हा कलाविषय केव्हा होतो? त्या अनुभवातील व्यक्तिगत व खाजगी भाग गळून पडल्या-शिवाय तो कलारूप घेऊ शकत नाहीः म्हणजे त्याशिवाय त्याची अभिव्यक्ती ही कलाभि-व्यक्ती ठरू शकत नाही असें आपण म्हणतों. अनुभव हा कलारूप घेऊ शकला आहे

कीं नाही हें आपणास कळते कसे ? अर्थात, समोर असलेल्या कलाकृतीमधूनच. त्या कलाकृतीच्या परिशीलनामधूनच आपणास हे जाणवावयास हवे. हे परिशीलन करीत असताच जें व्यक्त होत आहे त्यांत कांही खाजगी, व्यक्तिगत भाग डोकावत आहे काय ह्याची परीक्षा आपलें मन करीत असतें. ज्या प्रमाणात हा खाजगी, व्यक्तिगत भाग त्यात डोकावू लागतो त्या प्रमाणात व्यक्त होऊ पाहणाऱ्या अनुभवाला 'अनुभवत्व' येत नाही, हें आपणास जाणवू लागतें. त्याला एक प्रकारचें शबलत्व येत आहे, त्यात अप्रस्तुत, अनावश्यक, कलार्थाने परिहार्य असा भाग अवतरत आहे ह्याची जाणीव आपणास होऊ लागते. ह्यामुळे जे व्यक्त व्हावयाला हवे त्याऐवजी इतरच अप्रस्तुत गोष्टींकडे आपलें लक्ष जात आहे हेही आपल्या ध्यानात येतें. आपल्या डोळ्यापुढे एक अनुभव 'अनुभव' म्हणून येत नाही. त्यांत इतर गोष्टींचा, अप्रस्तुताचा अंतर्भाव होत आहे व त्यामुळे त्या अनुभवाचे सत्य दूषित होत आहे, तें शबलित होत आहे, झांकळून जात आहे हें जाणवू लागतें. खरोखर अनुभवाला 'अनुभवत्व' येणें म्हणजे तरी काय ? तो अनुभव एक अनुभव म्हणून त्याच्या यथार्थ रूपात प्रगट होणें, जणू शब्दामधून, रंगरेषामधून, पाषाणामधून त्याने स्वतःस साकार करणें, सरूप करणें. हें होण्यासाठी त्याला अप्रस्तुताचा अल्पसा भागही चिकटता कामा नये. ज्या मनाला आलेला तो अनुभव त्या मनापासूनही तो तत्त्वतः वेगळा झाला पाहिजे. त्या मनाचे तत्संबंधींचे मनोविकार त्यात मिसळून तो विकृत होता कामा नये; हे सर्व मनोविकार गळून पडल्यावर त्या अनुभवाचें एक अनन्यसाधारण अनुभव ह्या दृष्टीने जें यथार्थरूप त्या मनाला जाणवलें पाहिजे, तें रूप व्यक्त होऊ शकलें पाहिजे. त्या अनुभवाला असें रूप प्राप्त होत नाही तोपर्यंत त्याला ' अर्थ ' प्राप्तच होणार नाही. कलादृष्ट्या ' अनुभवत्व ' येणार नाही.

अश्लीलतेच्या संदर्भात आपण ज्या अनुभवांचा विचार करतों त्यांना वर सूचित केलें तसें ' अनुभवत्व ' प्राप्त होणे सोपे नसते; त्या अनुभवांचा अलिप्तपणें विचार करणें, त्यांचा ' अर्थ ' लक्षांत घेणें, त्यापासून तत्त्वतः का होईना दूर होऊन त्यांचें रूप न्याहाळणें, त्या यथार्थरूपांची प्रतीती घडणें ही गोष्ट कठीण असते आणि त्या रूपांची तशीच अविकृत अभिव्यक्ती घडविणें हें तर त्याहीपेक्षा कठीण आहे हें लक्षात येतें. ह्या अनुभवांचें स्वरूपच असें असतें कीं, त्यांच्या चिंतनातून तत्संबंधीचा खाजगी व व्यक्तिगत भाग गळून पडणें सोपें नसते, तो भाग त्यांना सतत चिकटून येण्याचीच एकसारखी शक्यता असते, त्यामुळे त्यांच्या चित्रणात एक प्रकारची विकृती निर्माण होण्याची भीती असते. मला वाटतें, ज्या कृती अश्लील ठरतात, त्या कृतीत अशीच विकृती डोकावत असते. जो अनुभव त्या कृतींतून व्यक्त होऊ पाहत असतो, त्या अनुभवाबरोबरच त्या अनुभवाशी संलग्न असलेला परंतु कलाभिव्यक्तीच्या दृष्टीने अप्रस्तुत, असंबद्ध असलेला लेखकाच्या मनाचा वासनात्मक भागही तेथे व्यक्त होत असतो; म्हणूनच अशा वेळी एका अर्थपूर्ण अनन्यसाधारण अनुभवाचें दर्शन घडण्याऐवजी त्याचे ( विशिष्ट हेतूने )

प्रदर्शन होत आहे, त्यांतून लेखकाची वासना डोकावत आहे, हे रसिकाला जाणवू लागते, सदर ललित–कृतीच्या सान्निध्यात त्याला कलासमाधी साधत नाही, कलानंद प्राप्त होत नाही. साहित्यशास्त्रीय परिभाषेत बोलावयाचें म्हणजे ह्या ललित–कृतीत, जी अनुभवसृष्टी निर्माण होत असते, तिला खऱ्या अर्थाने, 'अलौकिकत्व' प्राप्तच होत नाही. ती सर्वार्थाने 'लौकिकच' म्हणजे खाजगीच राहते. तिचें लौकिकत्व नाहींसेंच होत नाही. त्यामुळे ह्या सृष्टीत मनाने प्रवेश करणारा रसिकही लौकिक सृष्टीला विसरू शकत नाही; त्याच्याही आस्वादामध्ये वासनात्मक भाग डोकावू लागतो. तो कलानंदाला पारखा होतो.

कलानिर्मितीची प्रक्रिया लक्षात घेऊन, एखाद्या ललित–कृतीत जाणवणाऱ्या अश्लील-त्वाचें केलेलें वरील विवेचन जर यथार्थ असेल, तर त्यावरून एक निष्कर्ष आपोआप निघतो; तो असा कीं, सदर ललित–कृती ही ललित–कृती ह्या दृष्टीने नेहमीच कनिष्ठ दर्जाची ठरते. एखादी श्रेष्ठ दर्जाची ललित–कृती अश्लील असू शकते, असे जे पुष्कळदा सुचविलें जातें, ते कलानिर्मितीच्या प्रक्रियेसंबंधीच्या अज्ञानामुळे होय, असें मला वाटतें. कलानिर्मितीची प्रक्रिया लक्षात घेऊन विचार केला कीं, 'अश्लील ललित–कृती' हा खरें म्हणजे 'वदतो-व्याघात' आहे, हें लक्षात येतें. कोणतीही कलाकृती ही खरोखर कलाकृती ह्या अभिधानाला पात्र असेल, तर ती अश्लील असणें शक्य नाही, हें जसें खरें तसेंच ती अश्लील असेल तर कलाकृती ह्या अभिधानास पात्र नाही हेंही तितकेंच खरें. कोणतीही खरीखुरी कलाकृती ही अश्लील असूच शकत नाही. ती ज्या अनुभवाला गोचर करिते तो अर्थपूर्णच असतो; त्याचे अनन्यसाधारण रूपच तद्वारा व्यक्त होत असतें; त्याच्या अभिव्यक्तीत कोण-त्याही प्रकारच्या अप्रस्तुताचा, अनुचिताचा, अनावश्यकाचा यत्किंचितही भाग डोकावत नसतो. 'एक अनुभव' या दृष्टीने त्याला लक्षणीय 'अर्थ' प्राप्त झालेला असतो; रसिकाला त्याची प्रतीती येते ती त्याच्या अर्थासह, त्याखेरीज अन्य गोष्टींकडे त्या वेळी रसिकाचें लक्ष जातच नाही. असें जेव्हा होत नाही, तेव्हा ती अ–कला ठरते 'अश्लील कलाकृती' ही खरोखर अ–कलाच असते. ती अश्लील असल्यास कलाकृती ह्या पदवीला पात्रच ठरू शकत नाही.

आता आपण अगदी प्रारंभी उल्लेखिलेल्या दुसऱ्या पर्यायाकडे वळूः हा पर्याय म्हणजे एखादी ललितकृती ही कलाकृती ह्या अभिधानास पात्र असताही म्हणजे कलानिर्मितीच्या प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा दोष निर्माण न होता तिचा अवतार झालेला असूनही जेव्हा ती वाचकांच्या दृष्टीने कांही वेळा अश्लील ठरविली जाते तेव्हा खरोखर काय घडत असतें? ह्या प्रश्नाचा विचार आपणास कलास्वादाची प्रक्रिया लक्षात घेऊन करावा लागणार आहे; कारण येथे जर दोष निर्माण होत असेल तर तो ह्याच प्रक्रियेत निर्माण होत असणार हें उघड आहे. हा दोष कोणता तेंच नेमकें आपणास पाहावयाचें आहे. कलास्वादाच्या प्रक्रियेचें एक महत्त्वाचें लक्षण आपण हें मानतों कीं ज्या मनामध्ये ही प्रक्रिया घडत असते ते मन

ही प्रक्रिया घडत असताना त्याच्या समोर असलेल्या ललितकृतीतील विश्वाशीं कधीच संपूर्ण तादात्म्य पावत नाही. हें विश्व कल्पनेचें विश्व आहे, तें 'अलौकिक' आहे, तें एका अनन्यसाधारण अनुभवाचें एका मनाला जाणवलेलें वास्तव प्रकट करीत आहे ह्याची जाण तें मन कधीच विसरत नाही. जो एक अनन्यसाधारण अनुभव त्याच्या समोर सदर ललितकृतीच्या द्वारा प्रकट होत असतो त्या अनुभवाचें तें कितपत यथार्थ वास्तव आहे ह्याची परीक्षा तें मन करीत असतें; नाही असें नाही; परंतु ह्याचा अर्थ तें त्या अनुभवाशी तादात्म्य पावतें असा नव्हे. समोर असलेल्या ललितकृतीमधून अभिव्यक्त होणाऱ्या अनुभवाचें वास्तव न्याहाळीत असता त्यापासून स्वतःला थोडें दूर ठेवून त्याचा आस्वाद घेणें, त्याचा अर्थ लक्षात घेणें, त्याचा अनन्यसाधारण धर्म (quality) आस्वादणें, त्याची रसनात्मक प्रतीती घेणें हेंच त्या मनाचें एकमेव कार्य असतें; ह्या कार्यामध्येच तें रंगलेलें असतें. स्वाभाविकच हें मन जेव्हा समोर असलेल्या ललितकृतीतून व्यक्त होणाऱ्या अनुभवाचा प्रत्यक्ष 'अनुभवच' घेऊ लागतें त्या वेळी तें रसिकाचें मन उरत नाही, तर तें प्रत्यक्ष जीवन जगणाऱ्या एका सामान्य माणसाचें मन बनतें. स्वतःला नकळत अलौकिकाच्या पातळीवरून तें लौकिकाच्या पातळीवर उतरलेलें असतें. अशा वेळीं सदर ललितकृतीच्या सान्निध्यात स्वतःला रसिक म्हणविणारा हा दुबळा माणूस रसास्वाद घेण्यास स्वतःला न कळत अक्षम ठरत असतो व रसास्वादाऐवजी तो त्या ललिकृतीच्या सान्निध्यात अजाणता प्रत्यक्ष जीवनच जगू लागलेला असतो. कोणतीही कलाकृती खऱ्या रसिकाच्या मनात स्वार्थपर भाव निर्माण करूच शकत नाही. ललितकृतीमधून व्यक्त होऊ पाहणाऱ्या अनुभवाचा आस्वाद घेणाऱ्या मनात स्वार्थपर भावांचा लेशही नसतो. हें मन प्रत्येक अनुभवाचें जणू केवळ सौंदर्य न्याहाळीत असतें, सत्य जाणीत असतें. त्याने लिप्त होत नसतें. कमलपत्रावरील दंवाच्या थेंबासारखें ह्या मनाकडून आस्वादिल्या जाणाऱ्या सदर अनुभवाचें स्वरूप असतें. त्यांत असून त्यापासून अलिप्त. म्हणूनच त्याचा 'आस्वाद' घेत असता, सदर मनात कोणत्याही स्वरूपाचा स्वार्थपर भाव निर्माण होत नाही; परंतु ज्या मनाला हें जमत नाही, त्याच्या बाबतीत मात्र ह्या उलट स्थिती असते. तेथे आस्वादाची प्रक्रिया बंद पडून प्रत्यक्षानुभूतीचीच क्रिया सुरू होत असल्यामुळे, अशा प्रकारच्या प्रत्यक्ष अनुभूतीशी संलग्न असणारे सगळे स्वार्थपर भावही तेथे आपोआपच जन्माला येऊ लागतात; वासना चाळवल्या जाऊ लागतात; दिवास्वप्नात रंगण्याकडे, स्वप्नरंजनाकडे प्रवृत्ती होऊ लागते. हें सर्व जें स्वभावतः अलौकिक त्याला 'लौकिक' समजल्यामुळे व त्याच्याशी संपूर्ण 'तादात्म्य' पावल्यामुळे निर्माण होत असतें. ही दुबळीक असते. हा प्रेक्षक नग्न स्त्रीच्या चित्रात चित्र पाहत नाही. एका विशिष्ट अनुभवाचें वास्तव, त्या अनुभवाचें सौंदर्य वा सत्य पाहू शकत नाही. ते त्याला जमत नाही. तो केवळ नग्न स्त्री पाहतो व त्याच अनुभवात मशगूल होतो. अशा माणसाच्या संदर्भांत ते चित्र अश्लील ठरण्याचीच भीती असते, परंतु अशा माणसाच्या संदर्भांत काय अश्लील

ठरेल याचा नियमच नसतो. अशा माणसाची तंद्री शेक्सपियरचें वा कालिदासाचें एखादें नाटक पाहताना देखील कोठें, कशा प्रकारें लागेल, तो कशाने दिवास्वप्नात रंगून जाईल, त्याच्या वासना कशामुळे चाळवल्या जातील, हें कसें सांगावें ? परंतु आपल्या विवेचनाच्या दृष्टीने एवढें खरें कीं ज्या क्षणी स्वतःला रसिक म्हणविणाऱ्या ह्या माणसाचें मन ललित-कृतीमधून व्यक्त होऊ पाहणाऱ्या एखाद्या अनुभवाचें एक अनन्यसाधारण अनुभव म्हणून असणारें सत्य आणि सौंदर्य आस्वादण्यास अक्षम ठरतें आणि त्याऐवजी त्या अनुभवाशी तादात्म्य पावून त्यातच मशगूल होतें व दिवास्वप्नात रंगून जातें, त्या वेळीं त्या मनाच्या दृष्टीने ती ललित-कृती अश्लील ठरण्याची भीती असते. निदान हे मन लक्षात घेऊन, एखाद्या ललित-कृतीच्या सान्निध्यातील त्याच्या प्रतिक्रिया लक्षात घेऊन जे लोक सदर ललितकृतीसंबंधी विचार करू पाहतात त्यांच्या दृष्टीने ती अश्लील ठरण्याची शक्यता असते.

एखादी ललितकृती निश्चित अश्लील असते तेव्हा आणि एखादी कलाकृती अश्लील नसूनहि अश्लील आहे असें वाटतें तेव्हा नेमकें काय घडत असतें ह्याचा, पहिल्याच्या बाबतीत कलानिर्मितीची व दुसऱ्याच्या बाबतीत कलास्वादाची प्रक्रिया लक्षात घेऊन आपण तात्त्विक दृष्टया विचार केला. ह्या तत्त्वविचारातून जो एक निष्कर्ष निघतो तो असा कीं, एखाद्या कलाकृतीत अश्लीलता अवतरत असताना आणि एखाद्या कलाकृतीत मुळात नसलेली अश्लीलता स्वतःला रसिक म्हणविणाऱ्या व्यक्तीच्या नजरेत अवतरत असताना म्हणजे ह्या दोन्ही वेळीं जे रसविघ्न निर्माण होते त्याच्या बुडाशी एकच एक समान कारण असतें; व तें म्हणजे अनुभव कलार्थाने 'आस्वाद्य' न होणें, त्याला कलार्थाने 'आस्वाद्यता' न लाभणें. एकीकडे आपल्याच अनुभवापासून दूर सरकून त्याचें स्वरूप व सौंदर्य न्याहाळता येत नसल्यामुळे तो कलाविषय होण्यास पात्र ठरू शकत नाही, त्याला कलार्थाने 'अनुभवत्व' येत नाही, तो 'आस्वाद्य' ठरत नाही व म्हणूनच त्याच्या अभिव्यक्तीत आगंतुक गोष्टींना स्थान मिळत आहे. ती अभिव्यक्ती विकृत ठरत आहे असें दिसत आहे; तर दुसरीकडे कलाकृतीच्या द्वारा डोळ्यांसमोर तरळणाऱ्या अनुभवापासून थोडेंसें दूर सरकून त्याचे सत्य व सौंदर्य न्याहाळू न शकल्या-मुळे, त्यातच स्वतः गुरफटून जाण्याकडे मनाची प्रवृत्ती असल्यामुळे तो अनुभव कलार्थाने 'आस्वाद्य' ठरेनासा होत आहे, त्याच्या आस्वादप्रक्रियेत भलत्याच गोष्टी शिरत आहेत, ती आस्वाद-प्रक्रिया गढूळली जात आहे असें दृश्य दिसत आहे. दोन्ही प्रक्रियांमध्ये एकच दोष घुसतो आहे. तो दोष म्हणजे कलार्थाने अत्यावश्यक ठरणाऱ्या 'स्व-'च्या विस्मृतीचा अभाव. एकीकडे 'स्व' ची कलार्थाने विस्मृती पडू शकत नसल्यामुळे अनुभवाला कलारूपच प्राप्त होऊ शकत नाही. तो लौकिक पातळीवरून 'अलौकिका' च्या पातळीवर जाऊच शकत नाही, त्याच्या अभिव्यक्तीत ठिकठिकाणी लेखकाचा 'स्व' डोकावल्याखेरीज राहत नाही व त्यामुळे ती त्या अनुभवाची अविकृत अभिव्यक्ती होऊच शकत नाही; तर दुसरीकडे रसिक ह्या दृष्टीने जे मन कलाकृतीच्या सान्निध्यात 'अलौकिका'च्या पातळीवर राहायला हवे ते स्वतःला नकळत एकसारखें लौकिकाच्या

पातळीवर घसरतें आहे, 'स्व'मध्येच मशगूल झाल्यामुळे, त्यातच गुरफटून गेल्यामुळे कलाकृतीमधून व्यक्त होऊ पाहणाऱ्या अनुभवाकडे अलिप्तपणें पाहून त्याचें सौंदर्य आस्वादण्याचें भानच त्याला उरत नाही. दोन्हीकडे 'अश्लीलता' डोकावते ती मनाच्या दुबळेपणामुळे; एकीकडची दुबळीक कलानिर्मिती करू पाहणाऱ्या मनाची. हे मन स्वार्थपर भावांपासून आलिप्त राहू शकत नसल्यामुळे कोणत्याही अनुभवाचें यथार्थरूप लक्षातच घेऊ शकत नाही. दुसरीकडची दुबळीक कलास्वाद घेऊ पाहणाऱ्या मनाची. हें मन 'स्व' मध्येच गुरफटून गेलेले असल्यामुळे त्याच्या बाबतीत कलाकृतीतून व्यक्त होऊ पाहणाऱ्या कोणत्याही अनुभवाला कलार्थाने आस्वाद्यमानताच लाभत नाही.

वाङ्मय आणि अश्लीलता ह्यांच्या परस्पर संबंधाचा कलानिर्मितीची आणि कलास्वादाची प्रक्रिया लक्षात घेऊन विचार करीत असता वरील गोष्टी लक्षात आल्या. अश्लीलतेची सूचना हे एक रसविघ्न कसें आहे व ते काव्यगत आहे असें सिद्ध झालें तर सदर कृती ही अ–कला कशी ठरते व ते रसिकगत आहे असें सिद्ध होताच स्वतःला रसिक म्हणविणारी व्यक्ती ही अ–रसिक कशी ठरते, तिच्या पदरात आनंद पडत असला तरी तो काव्यानंद कसा नसतो हें आपण पाहिलें. ही सदर प्रश्नासंबंधीची केवळ तात्त्विक भूमिका आहे. कलेच्या प्रकृतीचा आणि प्रयोजनाचा विचार केला असता लक्षात येणारी ही भूमिका आहे. ह्या भूमिकेची मदत घेऊन अश्लीलतेच्या संदर्भात एखाद्या ललितकृतीची परीक्षा करणें सोपें आहे असें सुचविण्याचा येथे हेतु नाही; ही परीक्षा अत्यंत अवघड आहे असेंच प्रस्तुत लेखकाचें मत आहे; कारण ही परीक्षा शेवटी "कला कीं अ–कला" ह्या प्रश्नाचें उत्तर देण्याचाच प्रयत्न करीत असते व एखाद्या ललितकृतीच्या संदर्भात ह्या प्रश्नाचें अचूक उत्तर देणें सोपें नसतें. परंतु हे खरें असलें तरी एखाद्या प्रश्नाबाबतची तात्त्विक भूमिका प्रथम समजून घेणें केव्हाही इष्ट असतें; ती भूमिका निर्दोष ठरल्यास विशिष्ट कृतीच्या संदर्भात तिचा अवलंब कसा करावयाचा तें ठरविता येतें. येथे केवळ त्याच दृष्टीने ह्या तात्त्विक भूमिकेचा आराखडा मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

श्री. वा. ल. कुलकर्णी यांनी आपल्या विवेचनाच्या ओघात आणखी पुढील विचार व्यक्त केले.

( १ ) कला व साहित्य यांच्या संबंधात सामान्य वाचकाची साक्ष ही निर्णायक समजली जाऊ नये. ह्या संबंधात सहृदयाची साक्ष महत्त्वाची समजली जावी. कलेची व साहित्याची सृष्टी ही एक अपर सृष्टी आहे हें मान्य असेल तर ह्या सृष्टीची ज्याला अधिक अचूक ओळख झालेली आहे, अशाच व्यक्तीची साक्ष ही तिच्याबाबत उपकारक ठरेल.

( २ ) जीवनातूनच जन्माला आलेली कला जीवनाचे कांही धर्म बरोबर घेऊन आली आहे. जीवन ही एक अखंड गतिमान् आणि अखंड विकासशील अशी वस्तु आहे. कला ही देखील अशीच चिद्वस्तु आहे. तिच्यासंबंधी विचार करिताना हे तिचे स्वरूप नजरेआड करून चालत नाही. त्यामुळेच ती नियमात चपखल बसत नाही. तिच्या संबंधाचे आडाखेबंद ठोकताळे बांधता येत नाहीत. तिचे स्वरूप तर समजाऊन घ्यावेंसें वाटतें व तें संपूर्णतया कधीच आकलन होत नाही; म्हणूनच कला व वाङ्मय यांच्या

क्षेत्रात नेहमीच मतभेद आढळतात; हे मतभेद होणें त्यांच्या जीवंतपणाचें द्योतक आहे; निर्जीवाबद्दल मतभेद नसतात. त्याचे आडाखे बसविता येतात. जेथे जेथे जीवंतपणा अधिक तेथे तेथे मतभेदाला वाव अधिक हा सृष्टीचा नियमच आहे. तेव्हा कला-वाङ्मयाच्या क्षेत्रात सहृदयामध्ये मतभेद आढळतात. म्हणून त्यांच्या साक्षींकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. त्यांना वाट पुसतच कायद्याने वाटचाल केली पाहिजे.

( ३ ) अश्लील कृती आणि फसलेली कलाकृती ह्यांत आपण भेद केला पाहिजे. श्रीमती वसुंधरा पटवर्धन यांची 'अंधार' ही कथा फसलेली असेल परंतु ती अश्लील कृती नव्हे. अशा प्रकारचें कथालेखन फसण्याचा संभव असतो. ही तारेवरची कसरत आहे. अशा कथांमधून जे अनुभव व्यक्त होऊ पाहत असतात त्यांना कलारूप येणें सोपे नसते. 'लोलिता'चें लेखन ही सोपी गोष्ट नव्हे. अशा प्रकारचें लेखन करिताना कलानिर्मितीच्या प्रक्रियेत यत्किंचितही दोष डोकावू न देणें, ही कला साधना अथ-पासून इतिपर्यंत साधणें ही एक अत्यंत कठीण गोष्ट आहे. सरळ उंचच उंच कडा चढून जाणें उत्तम पर्वतारोहण करणारांनाही कठीणच जातें; येथे मधूनच पायांचा आधार सुटण्याची, थोडा फार तोल जाण्याची भीती असते, शक्यता असते. अशा वेळी सहृदयाने ही कृती फसली कां याचा विचार केला पाहिजे. तिच्याकडे सहानुभूतीने पाहिलें पाहिजे. तिचा सार्वजनिक धिक्कार करिता कामा नये. असा धिक्कार झाला तर कलावन्त असाध्य तें साध्य करायला धजावणारच नाहीत. धोके पतकरायला तयार होणार नाहीत. कला-वाङ्मयाच्या क्षेत्रात ( एवढेच नव्हे तर जीवनाच्या सर्व क्षेत्रात ) धोके पतकरल्या-शिवाय व धोके पतकरणारे सतत जन्माला आल्याशिवाय प्रगती होत नाही. तेव्हा अश्लील कृती म्हणजे अ-कला आणि फसलेली कलाकृती यांना कृपा करून एकाच मापाने तोलू नये.

( ४ ) एखाद्या कलाकृतीसंबंधी विचार करिताना केवळ तिच्या निर्मितीमागील हेतूचा विचार करून भागणार नाही. मूळ हेतू उदात्त असूनही प्रत्यक्ष कलानिर्मितीच्या प्रक्रियेत दोष निर्माण झाल्यामुळे ती अ-कला झालेली असण्याचा संभव आहे. म्हणूनच तिच्या निर्मितीहेतूचा वेगळा विचार करणें अनिष्ट आहे. ती ज्या स्वरूपात आपल्यासमोर येते त्या स्वरूपाचा एकदम एकसंध विचार हा येथे प्रस्तुत विचार. तिच्या हेतूचा, तिच्या प्रयोजनाचा किंवा तिच्या संबंधीच्या कोणत्याही बाबींचा विचार ह्या विचारातूनच उद्भवला पाहिजे; ह्या विचाराशीच संबद्ध पाहिजे.

( ५ ) कला आणि वाङ्मय यांच्यातील अनिष्ट प्रवृत्तींचें नियंत्रण शेवटी समाजाची कला-वाङ्मयासंबंधीची अभिरुचीच करू शकते. ही अभिरुची तयार करण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत. एखाद्या समाजाच्या लायकीप्रमाणें जसे त्यांस सरकार मिळतें तसेच त्याच्या अभिरुचीप्रमाणें त्याला वाङ्मयही मिळतें. समाजाची ही वाङ्मयीन अभिरुची कोणत्या पातळीवर आहे हें लक्षात घेण्याचा अभ्यासपूर्वक प्रयत्न झाला पाहिजे; व ह्या अभिरुचीस इष्ट वळण कसें लाविता येईल, याचा विचार झाला पाहिजे. ह्या संबंधात टीकाकारांवरील जबाबदारी फार मोठी आहे. ● ●

# प्रा. ग. प्र. प्रधान.

वाङ्मयाचा एक विद्यार्थी या भूमिकेवरून मी अश्लीलतेसंबंधी कांही विचार मांडणार आहे. कोणत्याही ललित कृतीचा विचार करताना मुख्यतः सौंदर्यनिर्मिती साधण्यात कलावंत किती यशस्वी झाला याचा विचार केला पाहिजे. ही सौंदर्यनिर्मिती त्या कलाकृतीतील विविध घटकांचा जो एकसंध परिणाम आपल्या मनावर होतो त्यामधून साधली जाते. ज्या कलाकृतीत कलावंत असा एकसंध परिणाम साधू शकत नाही त्या कलाकृतीतील कांही घटक सौंदर्यपूर्ण असले तरी ती अयशस्वी झाली असेच मानावें लागेल. या दृष्टीने विचार करताना अश्लीलता ही कुरूप असते, कलाकृतीच्या एकसंध परिणामास ती बाधक ठरते म्हणून मला ती आक्षेपार्ह वाटते. एखाद्या गंभीर प्रमेयप्रधान नाटकात एखादे विदुषकी पात्र पाच मिनिटें प्रेक्षकांना हसवून गेलें व त्या पात्राचा कलाकृतीशी कांही संबंध नसला तर त्या पात्राचें अस्तित्व कुरूप, विसंवादी आहे असेंच म्हणावे लागेल. ज्या साहित्यात अश्लीलता असते त्या साहित्यामुळे आपली कामवासना चाळवली जाते. अश्लीलतेमुळे अन्य सौंदर्यास पोषक असणाऱ्या घटकांचा आपल्या मनावर सुसंगत असा परिणाम होत नाही. आपल्या मनातील भावनांना सौंदर्याचा स्पर्श होण्याऐवजी आपल्या मनातील वासना विशिष्ट अश्लील वर्णनाभोंवती रुंजी घालू लागते. सौंदर्यास विघातक ठरणाऱ्या या अश्लीलतेचा प्रत्येक रसिक निषेधच करील.

परंतु अश्लीलतेचा विचार केवळ तात्त्विक दृष्टीने करून चालणार नाही. कांही उदाहरणें घेणें आवश्यक आहे. 'लेडी चाटर्लीज लव्हर' या डी. एच् लॉरेन्स या ख्यातनाम लेखकाच्या कादंबरीबाबत खूपच काहूर उठलेले आहे, हें सर्वांना विदित आहेच. मला स्वतःला ही कादंबरी अश्लील वाटत नाही. परंतु या कादंबरीबाबत विद्यार्थ्यांची प्रतिक्रिया काय होते यासंबंधी मला मोठें कुतुहल होते. एम्. ए. च्या काही विद्यार्थ्यांची प्रतिक्रिया मी मुद्दाम अजमावून पाहिली. एक विद्यार्थी मोठा रसिक वाचक होता व त्याचें वाचनही चांगलें विस्तृत होतें. त्याला ही कादंबरी वाचल्यावर काय वाटलें असें मीं विचारले असता तो म्हणाला, "ज्या संवदेनांचे वर्णन साधारणतः अश्लीलच असेल असें आपण गृहित धरतो त्या संवेदनाही उदात्त वाटल्या. "To Lawrence, flesh is as sacred as religion" हा विद्यार्थी माझ्यावर वजन मारण्याकरिता केवळ असे बोलत आहे कां अशी मला शंका आली. पण त्याच्याबरोबर थोडी अधिक चर्चा केल्यावर खरोखरीच त्याला त्या कादंबरीतील सौंदर्याचा स्पर्श जाणवला होता व लॉरेन्सने जी या कलाकृतीत लय निर्माण केली आहे त्या लयीने तो मुग्ध झाला होता, अशी माझी खात्री पटली. याच्या उलट दुसरा एक विद्यार्थी मला मोकळेपणाने म्हणाला, " या कादंबरीचा कितीतरी भाग कंटाळवाणा आहे. कांही विशिष्ट वर्णनें सोडली तर Lawrence makes sex-life look very dull-या विद्यार्थ्याने संबंध कादंबरी वाचलीच नाही. मात्र संदर्भातून बाजूला काढल्यावर उत्तान

वाटणारी वर्णने पुनः पुनः वाचली होती. वाङ्मयाचे अध्यापन करणाऱ्या एक विवाहित अध्यापिका या कादंबरीसंबंधी म्हाणाल्या, " विद्यार्थीदशेत मी ही कादंबरी वाचली तेव्हा त्यांतील कांही वर्णनांनी माझ्या भावना चाळवल्या गेल्या व कादंबरीच्या अन्य भागाऐवजी त्या वर्णनातच माझे मन दीर्घ काळ गुंतून पडले. आता १०–१२ वर्षांनी मीं ती कादंबरी पुन्हा वाचली त्यावेळी त्या वर्णनात मला कांही विशेष वाटलें नाही. उलट Sex वरच्या अन्य चटोर कादंबऱ्यापेक्षा लॉरेन्सची कादंबरी अगदी वेगळी आहे हें समजलें. "

मी या तीन वाचकांचा उल्लेख केला त्यावरून आपल्या हें लक्षात आले असेल कीं अश्लीलतेचा व्यक्तिनिरपेक्ष विचार करता येणार नाही. जीवनातील कांही अनुभव नसलेल्या, अपक्व मनाच्या मुलामुलींचें विकृत कुतुहल ज्यामुळे जागृत होईल तें वर्णन प्रौढ विवाहित स्त्रीपुरुषांना सामान्य वाटेल अशीच अनेकदा शक्यता असते. अश्लीलतेचा विचार करताना समाजनिरपेक्ष राहणेंही योग्य ठरणार नाही. कोणत्याही समाजातील अभिरुची, स्त्री–पुरुष संबंधाकडे पाहण्याची त्या समाजाची दृष्टी यां वरूनही त्या समाजात कोणत्या गोष्टी अश्लील ठरू शकतील हें सांगता येईल. व्हिक्टोरिआच्या अमदानीत इंग्लंडमध्ये जो दांभिकपणा रूढ होता त्यामुळे हार्डीच्या कांही कादंबऱ्याही त्यावेळच्या कांही संभावितांना अश्लील वाटल्या. याच्या उलट युद्धकाळात लिहिल्या गेलेल्या हेमिंग्वेच्या कादंबऱ्यावर अश्लीलतेचा आक्षेप घेतला गेलेला नाही.

अश्लीलतेचा विचार व्यक्तिसापेक्ष व समाजसापेक्ष असावा हें योग्य असलें तरी आणखीही एक कसोटी लावली पाहिजे असें मला वाटते. एखाद्या साहित्यकृतीच्या वाचनाने प्रौढ व्यक्तीस आपल्या प्रौढत्वाचा विसर पडून १६ व्या वर्षाच्या मुलामुलीं-प्रमाणें लैंगिक जीवनाबद्दल कुतुहल अगर आसक्ती वाटली तर ती साहित्यकृती अश्लील आहे असें मानलें पाहिजे. कांही माणसें चाळिशी उलटली तरी बऱ्याच बाबतीत १६ वर्षाच्या मुलांसारखीच असतात हें खरे. पण अशा व्यक्ती बहुतेक अपवादात्मक असतात. सर्व साधारणतः पस्तिशी उलटलेल्या स्त्रीपुरुषांच्या लैंगिक वर्णनाबद्दलच्या प्रतिक्रियात विकृती अगर अपरिपक्वता नसते. कलाकृतीतील सौंदर्याचा संपूर्ण आविष्कार कसा झाला आहे हें,जाणत्या रसिक वाचकांना जाणवते. परंतु कांही कथा अगर कादंबऱ्या अशा असतात कीं अशा परिपक्व मनाच्या व्यक्तींच्या भावना चाळवल्या जातात, वासना उद्दीपित होतात आणि सौंदर्याचा आस्वाद घेण्याऐवजी त्याचें मन चटोरपणाने विशिष्ट वर्णनातच गुंतून पडते. ज्या लेखकांना सौंदर्यनिर्मिती साधत नाही, ते लेखक वाचकाचे मन अशा रीतीने ओढून घेण्याचा प्रयत्न करितात व मानवी मनात लैंगिक आकर्षणही प्रबल प्रेरणा असल्यामुळे ते यशस्वीही होतात. पण मन कशा रीतीने जिंकलें गेलें हें पाहिले पाहिजे. सौदर्यामुळे मन मुग्ध होणें व विकारवशतेने मन मुग्ध होणें यांत मूलभूत फरक आहे; आणि या गोष्टीचा विचार करताना लेखकाचा हेतू काय आहे हें लक्षात घ्यावें लागतें व त्याच्या कृतींतील विविध घटकांचें विश्लेषण करावे लागते. स्त्रीपुरुषांची

अनुरक्ती अगर मीलन यांचें वर्णन लेखक कोणत्या हेतूने व कोणत्या रीतीने करतो यावरून ती कलाकृती अश्लील आहे किंवा नाही ते ठरविता येते. डी. एच्. लॉरेन्सच्या एका गोष्टींत खाणीतून काम करून घरी आलेल्या एका कामगाराला त्याची वायको अंग चोळून आंघोळ घालते असें वर्णन आहे. पण हे वर्णन मुळीच उत्तान वाटत नाही. तेथे त्या कामगाराच्या वर्णनात एक वाक्य येते, "The skin now was fresh, clean and crisp" त्या सर्व वर्णनात लॉरेन्सने कोठेही विकृत सूचकतेचा अवलंब केलेला नाही. त्यात वर्णन केलेल्या शारीरिक संवेदना निर्मळ आणि निरागस वाटतात. याच्या उलट श्री. माडखोलकरांच्या 'शाप' अगर 'नागकन्या' या कादंबऱ्यात कांही वर्णनें अशा रीतीने केलेलीं आहेत कीं त्या कादंबरीतील अन्य भावाविष्कार अगर समरप्रसंग यांच्याशी त्यांचा कांहीही संबंध न राहता केवळ वाचकाच्या मनाला त्या क्षणीच्या वासनेच्या तांडवाने बेहोष करावे हा हेतू स्पष्टपणें जाणवतो. तें वर्णन अशा रीतीने केलेलें असतें कीं कलाकृतीचा एकसंध परिणाम न होता एका भडक पट्ट्यावरच वाचकाचें मन खिळून राहते. अश्लील वर्णनें अर्थातच आक्षेपार्ह आहेत. सदभिरुची व सौंदर्यनिष्ठा हे दोनही निकष लावल्यावर अशी अश्लीलता त्याज्य ठरते.

यावर एक असा युक्तिवाद केला जातो कीं याचा सर्वस्वी दोष लेखकाला देणें योग्य होणार नाही. कारण अश्लीलतेबद्दल वाचकाच्या मनाला वाटणारें आकर्षण किती प्रबल आहे याचाही विचार केला पाहिजे. मला हा युक्तिवाद मान्य नाही. सर्वसामान्य वाचकाच्या मनाच्या मर्यादा लक्षात घेऊनही असें मला वाटतें कीं श्रेष्ठ कलाकृतीच्या वाचनाने या वाचकाची सुप्त सौंदर्याभिरुची जागृत होते, त्याच्या मनाला पंख फुटतात व कलाकृतीचा आस्वाद घेताना तो कलावंत बनतो. परंतु असें होण्याऐवजी त्याच्या मनाचा एकच कोपरा चाळवला गेला आणि सौंदर्यचिंतनाऐवजी वैषयिक वर्णनाचाच आस्वाद त्याचें मन मिटक्या मारीत घेऊ लागलें तर त्या लेखकाच्या कृतीतच कांहीतरी दोष आहे हें खास. वाचकाच्या मनावरील वासनेचा पगडा हा आपण गृहितच धरला पाहिजे परंतु ही वासना विकृत रीतीने उद्दीपित करण्याचा बुद्धिपुरस्सर प्रयत्न लेखकाकडून झाला तर तो आक्षेपार्ह आहे याचा विसर पडून चालणार नाही. अश्लीलतेला कलात्मक रूप देताच येणार नाही. कलाकृतीत विविध घटकांची मिळून एक आकृती ( Form ) निर्माण होते व तिचा संपूर्ण परिणाम वाचकाच्या मनावर होतो. याच्या उलट ही सौंदर्यनिर्मिती साधण्याचें सामर्थ्य ज्या लेखकात नसतें त्याना कांही उन्मादक वर्णनें करून वाचकांच्या वासना चाळवण्यात यशस्विता वाटते. सौंदर्यपूर्ण आकृती निर्माण करण्यापेक्षा एका तुकड्यात वाचकाला लुब्ध करून ठेवावयाचे व अशा मनस्थितीत आपल्या कृतीतील अन्य कुरूप घटकांकडे त्याचें दुर्लक्ष करावयाचें अशी या लेखकांची धडपड असते. अशा साहित्यकृती वाचताना मी वर सांगितल्याप्रमाणें, अभिरुचिसंपन्न व परिपक्व मनाच्या वाचकाच्या मनातही अप्रगल्भ मनास साजेशा संवेदना निर्माण होतात. पण या संवेदनांचा पगडा दूर होताच अश्लीलता सौंदर्यनिर्मितीस कशी बाधक

असते याची जाणीव होते. कलवंताला कोणत्याही रीतीने सौंदर्यनिर्मिती करण्याचे स्वातंत्र्य आहे असा युक्तिवाद करून या अश्लीलतेचें समर्थन करणें कधीच योग्य ठरणार नाही. समाजात विकृत कुतुहल निर्माण करणाऱ्या या साहित्यावर निर्बंध घालणेंच उचित ठरेल.

साहित्यातील अश्लीलतेसंबंधी हे कांही विचार मांडल्यावर अन्य कलांतील विशेषतः चित्रकला व शिल्पकला यांतील अश्लीलतेसंबंधी एक विचार मीं मांडू इच्छितो. प्रत्येक कलेच्या विशिष्ट प्रकृतीप्रमाणें श्लील अगर अश्लील या संबंधीच्या संकेतात फरक पडणें अपरिहार्य आहे. वाङ्मयात स्त्री अगर पुरुषाच्या शरीराचें वर्णन करताना त्या व्यक्तीच्या वेशभूषेचें वर्णनही करता येते. कारण तें वर्णन आल्याने शरीराच्या अंगोपांगांच्या वर्णनात उणेपणा येत नाही. परंतु चित्रात अगर शिल्पकृतीत शरीर-सौष्ठवाचें दर्शन घडविताना ती व्यक्ती नग्नच दाखवावी लागेल. त्या व्यक्तीच्या शरीरावर अवगुंठण असेल तर ज्या गोष्टी लेखकाला शब्दातून सूचित करता येतील त्या सूचित करणें चित्रकाराला अगर शिल्पकाराला शक्य होणार नाही. दृश्यकला व श्राव्य-कला यामधील फरक लक्षात घेतला म्हणजे या दोन कलाक्षेत्रात संकेत वेगळे कां आहेत हें लक्षात येऊ शकेल. पण हा संकेतातील फरक असला तरी अश्लीलतेचा विचार करताना, कलाकृतीचा एकसंध परिणाम व कलावंताचा हेतू या निकषांच्या बाबतीत साहित्य व अन्य कला यांत मात्र फरक करून चालणार नाही. अभिरुचि-संपन्न रसिक-मनाला कोणत्याही कलेंतील अश्लीलता दुःसहच वाटेल. ● ●

## बॅ. विठ्ठल नरहर गाडगीळ.

साहित्य हा जर समाजाचा आरसा असेल तर कायदा हा एखाद्या जुन्या छायाचित्रा-सारखा आहे. साहित्यात तत्कालिन समाजाच्या भावना, वासना आणि कामना प्रतिबिंबित झालेल्या असतात. तर कायद्यात कमीतकमी वीसपंचवीस वर्षापूर्वीचें समाजाचे तत्त्वज्ञान आणि दृष्टिकोन गोठवला गेलेला असतो. व्यक्ती तीच असते, परंतु तिच्यात इतका बदल झालेला असतो की, त्या जुन्या छायाचित्रातून ती ओळखून काढता येत नाही. असेच कायद्याचेही होते. समाज झपाट्याने बदलतो, परंतु कायदा बदलत नाही. हिंदुस्थानातील अश्लीलतेच्या कायद्याच्या बाबतीत तर ही गोष्ट विशेष प्रकर्षाने आढळून येते.

तसं पाहिलें तर हिंदुस्थानात अश्लीलतेबद्दल सात कायदे आहेत. १८७६ साली पास झालेला 'ड्रॅमॅटिक परफॉमनन्स ॲक्ट' या कायद्याने अश्लील नाटक किंवा तत्सम कार्यक्रम करण्यास बंदी घालण्याचा अधिकार सरकारला देण्यात आलेला आहे आणि या कायद्याचा भंग करणाऱ्यास तीन महिने कारावास आणि दंड अशी शिक्षा आहे. १८७८ च्या

'सी कस्टमूस ॲक्ट' या कायद्याने अश्लील लिखाण आयात करण्यास बंदी आहे आणि हा कायदा मोडल्यास कस्टम अधिकारी तें लिखाण जप्त करू शकतात आणि जप्त मालाच्या किंमतीच्या तिप्पट किंवा एक हजार रुपये दंडही करू शकतात. १८८८ च्या 'पोस्ट ऑफीस ॲक्ट'ने पोस्टाने अश्लील लिखाण पाठविण्यास बंदी घालण्यात आली. १९१८ चा 'सिनेमॅटोग्राफ ॲक्ट' या कायद्यात १९५२ साली बदल करण्यात आला आणि सेंसारबोर्डास चित्रपटातील अश्लील भाग काढून टाकण्याचा अधिकार देण्यात आला.

स्वातंत्र्यानंतर १९५१ साली 'प्रेस ऑबजेक्शन मॅटर ॲक्ट' हा कायदा पास झाला. या कायद्यान्वये अश्लील लिखाणाबद्दल संपादक, मुद्रक आणि प्रकाशक यांच्याकडून अनामत रक्कम मागण्याचा अधिकार न्यायालयाना मिळाला. पुन्हा गुन्हा घडल्यास रक्कम जप्त करणे, छापखाना जप्त करणे किंवा सहा महिने कारावास आणि दोन हजार रुपये दंड अशा कडक शिक्षाही या कायद्याने देता येतात. मात्र या कायद्यान्वये होणाऱ्या खटल्यात वृत्तपत्र आणि मुद्रणव्यवसायातील पांच जणांच्या ज्यूरीसमोर खटला चालावा अशी मागणी करण्याचा हक्क आरोपीस देण्यात आलेला आहे. अर्थात ज्यूरींचा निर्णय न्यायाधीशावर बंधनकारक नाही. ज्यूरीशी मतभेद झाल्यास न्यायाधीश सर्व खटला हायकोर्टाकडे पाठवू शकतो. याशिवाय वृत्तपत्राचे पूर्वीच्या आणि नंतरच्या अंकातील लिखाण पुरावा म्हणून दाखल करण्याचा हक्कही आरोपीस देण्यात आलेला आहे. १९५४ च्या 'ड्रग्ज आणि मॅजिक रेमिडीज ॲक्ट' या कायद्याने लैंगिकविषयक औषधाच्या जाहीरातीस बंदी घालण्यात आली आहे.

परंतु हे सर्व कायदे पुस्तकातच आहेत, कारण या कायद्यान्वये खटले क्वचितच भरले जातात. सातवा कायदा मात्र याहीपेक्षा महत्त्वाचा आहे. कारण या कायद्यान्वये अनेक खटले भरले जातात. हा कायदा म्हणजे इंडियन पिनल कोडाचीं २९२ ते २९४ हीं कलमे. १२ सप्टेंबर १९२३ साली हिंदुस्थानने अश्लीलताविरोधी आंतरराष्ट्रीय करारावर सही केली आणि या करारानुसार ही कलमे १९२५ साली इंडियन पिनल कोडात अंतर्भूत करण्यात आली. या कलमातील तरतुदींचा उल्लेख श्री. क्वळेकर यांनी आपल्या निबंधात केलेला आहे. आश्चर्याची गोष्ट अशी आहे कीं, या सातही कायद्यात अश्लीलतेची व्याख्या कोठेही केलेली नाही !

हा कायदा पास होऊन जवळ जवळ ३७ वर्षे झाली. परंतु त्यात बदल झालेला नाही. एक महायुद्ध होऊन गेले, देशाला स्वातंत्र्य मिळाले, सामाजिक तत्त्वज्ञानात आणि वाङ्मयीन मूल्यात आमूलाग्र आणि मूलभूत स्थित्यंतरे झाली, परंतु ही कलमे आहेत तशीच आहेत ! अजूनही आमचा कायदा जवळ जवळ शंभर वर्षांपूर्वी इंग्लडमध्ये झालेल्या एका खटल्यात ठरलेली अश्लीलतेची व्याख्या आणि कसोटी अंधपणे मान्य करतो. खुद्द इंग्लडमध्ये ती बदलण्यात आली. अमेरिकेतील कांही राज्यात तर ती त्याज्य ठरली. परंतु आपला कायदा अजूनही ती प्रमाणभूत मानतो.

ही 'हिकलीन' कसोटी काळाने सदोष ठरविली आहे. "ज्यांच्या मनावर विकृत परिणाम होऊ शकतो आणि ज्यांच्या हातात तें लिखाण पडण्याचा संभव आहे त्यांच्या मनावर काय परिणाम होईल" ही कसोटी फसवी आहे. कारण तरुणाच्या मनावर वाईट परिणाम अश्लील साहित्यामुळे होतो असे म्हणण्याला पुरावा नाही. उलट 'न्यूयॉर्क स्कूल ऑफ सोशल हायजिन' या संस्थेने केलेल्या पहाणीत वाचनाऐवजी समाजातील इतर गोष्टींमुळेच तरुणांवर विकृत परिणाम होतात, असे आढळून आले. "ज्यांच्या मनावर वाईट परिणाम होतो" अशा व्यक्ती म्हणजे नेमक्या कोणत्या व्यक्ती? रोगट मनाच्या व्यक्तीला साध्याही विषयात अश्लील आशय आढळतो हा अनुभव आहे. अश्लील लिखाणामुळे वाईट परिणाम होतात हे जर खरे असेल तर खेड्यातील निरक्षर माणसे अश्लीलतेपासून अलिप्त आहेत असे मानावे लागेल. परंतु तसा अनुभव नाही! सर्वसाधारण मनुष्यावर काय परिणाम होईल असे म्हणावे तर 'सर्वसाधारण" मनुष्य म्हणजे कोण–शहरातला कीं खेड्यातला, साक्षर कीं निरक्षर, मध्यमवर्गीय कीं उच्च वर्गीय, तरुण की वयस्कर?

आणि समजा असा सर्वसाधारण मनुष्य सापडला तरी त्याच्या मनावर काय परिणाम होईल हे शोधून काढायला कांही वस्तुनिष्ठ उपाययोजना उपलब्ध आहे का? म्हणजे शेवटी हे काम न्यायाधीशावरच सोपवायचे आणि कोणत्याही देशातील न्यायाधीशाना ही गोष्ट जमलेली नाही. ज्या काळी इंग्लंडमध्ये व्हिक्टोरियन सोवळेपणाचा पगडा होता त्यावेळी तेथे एमिल झोलाचें लिखाण प्रसिद्ध करणाऱ्या प्रकाशकावर खटले होत होते. आणि फ्रान्समध्ये त्याचा गौरव होत होता. आणि त्याच सुमारास मराठी किंवा अर्धनग्न स्त्रीचे चित्र अश्लील नसते असा निर्णय न्या. मू. रानड्यांसारखे न्यायाधीश आपल्या हायकोर्टात देत होते. या उलट ज्या सुमारास इंग्लडमध्ये 'लेडी चॅटर्लिंज लव्हर' ही कादंबरी अश्लील नाही असे ठरले त्याच सुमारास आपल्या हायकोर्टाने ती अश्लील ठरविली. उडीया भाषेतील दिनसुंदरी या कवयत्रीचें काव्य राधेच्या वक्षःस्थळांचे वर्णन असूनही अश्लील नाही असे कलकत्ता हायकोर्टाने १९११ साली ठरविले, तर १९१५ साली तेलगू भाषेतील श्रीनंद याने लिहिलेले 'विदीनाटकम्' हे काव्य याच कारणासाठी मद्रास हायकोर्टा ने अश्लील ठरविलें!

आणि हें अपरिहार्य आहे. कारण न्यायाधीश कितीही प्रामाणिक असले तरी ती माणसेंच आहेत. त्यांचे जीवनविषयक तत्त्वज्ञान आणि मूल्यें कळत नकळत त्यांच्या निर्णयात प्रतिबिंबित होणें स्वाभाविक आहे. सर आयव्हर जेनिंग्जने म्हटल्याप्रमाणें "A judge's mind is not a legal slot machine न्यायाधीशाची नोकरीच अशी आहे कीं त्याला समाजात मोकळेपणाने वावरता येत नाही. लोकात मिसळून लोकमनाचा अंदाज घेणे त्याला शक्य नसते. समाजिक बदलांचा ठाव घेणे अशक्य असते. म्हणून समाजापासून सर्वसामान्यतः अलिप्त असणाऱ्या आणि कित्येकदा

साहित्याशी मुतराम संबंध नसणाऱ्या न्यायाधीशांवर समाजाने काय वाचावे आणि लेखकांनी काय लिहावे हे ठरविण्याची जबाबदारी टाकणे अयोग्य आहे. यांत लेखन-स्वातंत्र्याला तर धोका आहेच परंतु कायद्याच्या प्रतिष्ठेलाही बाध येण्याचा संभव आहे.

अश्लीततेसंबधीचे हिंदुस्थानातील कायदे आणि हायकोर्टांनी दिलेले निर्णय यांचा विचार केला तर कांही गोष्टी स्पष्ट होतात. केव्हा कोणतें लिखाण अश्लील ठरतें याबद्दल शाश्वती नाही. तज्ज्ञाना आणि साहित्यिकाना आरोपीच्या बाजूने साक्ष देता येत असली तरी लेखकाच्या हेतूचा विचार केला जात नाही. कोणत्या परिस्थितीत लिखाण लिहिलें गेलें याचा विचार होत नाही. बुद्धिपुरःसर अश्लील लिहिले आहे किंवा नाही हे ठरविण्यात येत नाही. देशातील बहुसंख्य लोक निरक्षर आहेत. वाङ्मयाचें प्रकाशन आणि प्रसार लोकसंख्येच्या मानाने अत्यल्प आहे, १९२५ सालानंतर भारतीय समाज आमूलाग्र बदलला आहे इत्यादि गोष्टींचा विचार तर मुळीच होत नाही.

कायद्याने समाजसुधारणा होते किंवा नाही हाच मुळात विवाद्य प्रश्न आहे. परंतु कायद्याने हें शक्य आहे असें गृहीत धरले तरी कायद्याचा योग्य वापर आणि अंमल-बजावणी होत आहे असे म्हणता येणार नाही. म्हणून या कायद्यात कांही महत्त्वाचे बदल घडवून आणणे आवश्यक आहे. लेखकाचा हेतू व उद्देश यांचा विचार झाला पाहिजे. 'हिकलीन' कसोटी त्याज्य ठरविली नाही तरी तिच्यात देशकालपरिस्थित्यनुरूप बदल केला पाहिजे. व्यक्तिस्वातंत्र्य आणि लेखनस्वातंत्र्य यांच्या संदर्भातच अश्लीलतेच्या खटल्यांचा निर्णय केला पाहिजे. 'प्रेस ऑबजेक्शनेबल ॲक्ट' या कायद्याने आरोपीस दिलेल्या हक्काप्रमाणें अश्लीलतेच्या सर्व खटल्यात साहित्यिकांची ज्यूरी मागण्याचा हक्क लेखकास मिळाला पाहिजे आणि ज्यूरींचा निर्णय न्यायाधीशावर बंधनकारक असला पाहिजे. प्रातिनिधिक साहित्यसंस्थातर्फे अशा ज्यूरींची एक यादी न्यायालयांकडे पाठवावी आणि या यादीतून ज्यूरीची निवड व्हावी. म्हणजेच या कायद्यात शाश्वती निर्माण होईल. असे झाले नाही तर डी. एच लॉरेन्सने म्हटल्याप्रमाणें उद्याचें अभिजात वाङ्मय आज अश्लील ठरविणे येवढेंच कायद्याचें कार्य होईल ! ● ● ●

---

55391.
11.11.76

संपादक

वा. रा. ढवळे

अश्लीलता : एक परिसंवाद

डॉ. इरावती कर्वे

ॲड्. सुशील कवळेकर

प्रा. गंगाधर गाडगीळ

प्रा. वा. ल. कुळकर्णी

प्रा. ग. प्र. प्रधान

बॅ. विठ्ठल नरहर गाडगीळ

Library IIAS, Shimla
MR 176.8 K 149 A
00055397

मुंबई मराठी साहित्य संघ
डॉ. भालेराव मार्ग, मुंबई ४